शनिवार
१९ डिसेंबर १९७०
चाळीस पैसे

# माणूस



## स्वागतार्ह रहमानी राजकारणाला भुट्टोंच्या जहरी हिंदद्वेषाचा छेद जाण्याचा धोका दृष्टिआड करून चालणार नाही.

राजकीय चित्र
बदलून टाकणाऱ्या
पाकिस्तान – निवडणुका

बुधवार, १९ डिसेंबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : पंचेचाळिसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

◻ ' साहित्य संमेलन की साहित्यिक संमेलन ' हा जो लेख मी लिहिला त्यात एक शब्द चुकीचा छापला गेल्याने संपूर्ण अर्थ बदलत आहे. मी लिहिले, ' पण फिर्यादी पक्ष प्रत्युत्तराबावत सामधाम होता, ' छापले गेले– ' पण फिर्यादी पक्ष प्रत्युत्तराबावत सावधान होता. ' ' सामधाम ' ह्याचा अर्थ यथातथा.

**५ डिसेंबर १९७०** **सौ. मंदाकिनी गोगटे**, मुंबई.

## अहवाल की मळमळ ?

' **मा**णूस 'च्या ५ डिसेंबरच्या अंकात ' साहित्य संमेलन की साहित्यिक संमेलन ?' या नावाचा खारच्या साहित्य संमेलनाचा अहवाल आला आहे. त्यात अनेक चुकीची विधाने असल्याने हे लिहीत आहे. स्वागताध्यक्ष श्री. बाळ सामंत यांनी असे विधान केले होते, की ' श्री. वि. स. खांडेकर किंवा प्रा. फडके यांच्यासारख्या साहित्यश्रेष्ठींना उद्घाटनाला बोलवावे असे आम्हांला वाटत होते. पण प्रकृतीच्या

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.**

अस्वास्थ्यामुळे ते येऊ शकत नाहीत. ही दोन नावे सोडली, तर साहित्याखेरीज इतर क्षेत्रात असूनही साहित्याबद्दल नितांत प्रेत असलेले महाराष्ट्राचे अतिशय लोकप्रिय नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांचेच नाव आहे. या वाक्याचा विपर्यास आपल्या अहवाल–लेखिका सौ. मंदाकिनी गोगटे यांनी केला आहे. हे बाळ सामंतांचे अज्ञान की हुशारीची पावलं असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. ना. यशवंतरावांची प्रशंसाच जर बाळ सामंतांना करायची असती, तर त्यांनी फडके–खांडेकरांचा उल्लेख केला नसता. त्यामुळे मंदाकिनीबाईंचा शेरा म्हणजे त्यांची हुशारी कसली ? अज्ञानच ते असे म्हटले पाहिजे.

स्वागताध्यक्षांनी 'साऱ्यांना कौतुकाचे गालबोट' लावले असे या बाई म्हणतात. गालबोट कशाला म्हणतात हे आम्ही बायकांना सांगावे काय ? सुंदर चेहऱ्याला दृष्ट लागू नये म्हणून गालाला काजळाचे बोट पुसले तर ते गालबोट होईल. सामंतांनी भरपूर प्रशंसेच्या भाषणात एकदोन निंदेची वाक्ये म्हटली असती, तर त्यांना गालबोट म्हणता आले असते, पण 'कौतुकाचे गालबोट' कसे होईल ?

विनोदी लेखकांवर स्त्रियांची फिर्याद 'भोंगळ' झाली असे सौ. मंदाकिनीबाईंनी म्हटले आहे. आमचा कार्यक्रम प्रत्येकाला 'आवडलाच पाहिजे', असा आमचा आग्रह नाही. पण या कार्यक्रमाचा अहवाल लिहिताना बाईंनी ज्या चुका केल्या आहेत आणि जी अहंकारी मल्लीनाथी केली आहे, त्यांची काही उदाहरणे देतो. बाळ सामंतांनी म्हटले की संपादिका आपल्याला फोन करून लेख मागतात. त्यावर या सौ. मंदाकिनीबाई गोगटे या संपादिका आहेत. (होय, या संपादिका आहेत– 'बागेश्री' नावाच्या वार्षिकाच्या. भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीप्रमाणे खप १५४१, फुकट वाटण्यासाठी ३५९.) बाळ सामंतांनी फोनचा उल्लेख करताच बाईंना आपल्या घरी अलीकडेच फोन आल्याचे आठवले. म्हणून त्या म्हणतात, 'हे ऐकल्यावर बाकीच्या तिघा विनोदी लेखकांनी आपापल्या घरी फोन घ्यायचे ठरवून टाकले. संपादिकेचा फोन बापडा येवो न येवो. पण तो येतो म्हणून शेखी तर मारता येईल !'

या एकाच वाक्यात बाईंनी किती विधाने गृहीत धरली आहेत, पाहा. पहिले गृहीत तत्त्व असे, की घरी फोन असणे हे फार मोठे मानाचे चिन्ह असते. म्हणजे मंदाकिनीबाईंच्या घरी फोन आहे आणि श्री. वि. स. खांडेकर किंवा श्री. र. वा. दिघे यांच्या घरी फोन नाहीत याचा अर्थच असा की गोगटेबाई या दोन्ही साहित्यिकांहून श्रेष्ठ आहेत ! अहो बाई, शेक्सपीयर नावाचा एक लेखक होता आणि त्याच्याही घरी फोन नव्हता हो ! पण 'बागेश्री'च्या संपादिकेचा फोन त्याला कधी न आल्यामुळे बिचाऱ्याचे आयुष्य फुकट गेले.

फोनचा हा उल्लेख 'फिर्यादी'त आला तेव्हा सबनीस, बुवा, मंत्री, सामंत व काळे असे पाच लेखक रंगमंचावर होते. त्यांपैकी सामंत वगळले, तर चार लेखक

उरतात. पण बाई म्हणतात की, उरलेले 'तीन' विनोदी लेखक. पाचातून एक उणा गेला, तर चार उरतात, तीन नव्हे. पण बाईंचे अंकगणित हे त्यांच्या विनोद बुद्धीच्याच मार्गाने जात असावे. आता 'फोन आल्याची शेखी' मिरवण्याबद्दल या बाई स्वतःला काय राणी एलिझाबेथ किंवा जॅकेलीन केनेडी समजतात काय? की त्यांचा फोन आला असे कुणी म्हटले रे म्हटले, की समाजात सर्वजण अगदी कौतुकाने दबून जावेत? ज्या लेखकांच्या घरी फोन नाही असे आपण गर्वाने ध्वनित करता, त्यांच्या कचेरीत फोन आहेत आणि एखाद्या संपादिकेला त्या फोनवर लेख मागता येत नाहीत काय? मग आपल्या घरी फोन आहे म्हणजे घरांतल्या फडताळात हिंग-जिऱ्याच्या डब्यांत कोहिनूर हिरा ठेवल्यासारखी मिजास कशाला दाखवता?

पाच-सहा वर्षांपूर्वी मी 'किर्लोस्कर'मध्ये 'अखेरची शिकार' नावाची गंभीर कथा लिहिली होती. वास्तविक, खारच्या संमेलनाचा आणि त्या कथेचा काहीही संबंध नव्हता. पण बाईंनी वड्याचे तेल वांग्यावर काढून लिहिले आहे, 'रमेश मंत्रींची 'किर्लोस्कर'मधली गंभीर कथा वाचूनही लोक लोक खदखदून हसत होते.' ही कथा म्हणजे महाराष्ट्राचे महान्, त्यागी शिक्षणतज्ज्ञ बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या आत्महत्येची कथा होती. ती कोणाला आवडली असेल अथवा आवडली नसेल. पण एखाद्या ज्येष्ठ माणसाच्या आत्महत्येची कथा वाचून जर मंदाकिनीबाईंना खदखदून हसू येत असेल, तर मानसशास्त्रज्ञांना एक नवा विषय मिळाला असेच म्हटले पाहिजे.

'माणूस'मधील या वृत्तांतात श्री. वि. आ. बुवा यांच्या साक्षीचा किंवा फिर्यादीच्या वकिलाचा उल्लेख नाही. त्याबद्दल बाईंना विचारता त्यांनी सांगितले, "मी सगळा कार्यक्रम ऐकलाच नाही, मी लवकरच घरी गेले." आता कमाल आहे की नाही? जे काम आपल्यावर सोपवले आहे, ते पूर्ण करायचे नाही, ज्या सभेचा वृत्तांत लिहायची जबाबदारी आहे त्या सभेला शेवटपर्यंत हजरच राहायचे नाही आणि अप्रस्तुत शेरेबाजी मात्र करायची, हा अहवाल की मळमळ? कोणत्याही फिर्यादीचा महत्त्वाचा भाग म्हणजे त्याचा निकाल. पण त्या वेळी गैरहजर राहून या बाईंनी त्या निकालाचाच निकाल लावला आहे! एप्रिल १९७० मध्ये या फिर्यादीचा पहिला कार्यक्रम साहित्य संघात झाला, तेव्हा सौ. मंदाकिनीबाई निमंत्रण नसताना आल्या होत्या आणि जागा न मिळाल्याने त्यांना परत जावे लागले होते. त्यावर उतारा म्हणून तर त्यांनी हा आपल्या मताने हुशार अहवाल लिहिला नसेल? पण तसे नसावेच. एवढी मोठी संपादिका आणि शिवाय घरात खरोखरचा फोन असलेली. असे सूड भावनेने का बरे लिहील?

१२ डिसेंबर, १९७० **रमेश मंत्री**



अरुण गोसावी

# थंडीतल्या शेकोट्या

मुंबईचा मुलायम हिवाळा आता कुठे ऐन जोमात येऊ लागला आहे. म्हणजे दुपारी अजून चांगले कडक ऊन असतेच. पण संध्याकाळी बरा गारवा येतो. रात्री उपनगरांमध्ये अंगावर पांघरूण हवेसे वाटणारी थंडी पडते. पहाटे रजईत छान झोप लागते आणि सकाळ प्रसन्न वाटते. मुंबईच्या हिवाळ्याची ही मर्यादा झाली. अजून बससाठी धावले की अंगाला घाम येतोच. नाही असे नाही. पण हवा शीतल आहे. मुंबईच्या कोणत्याही ऋतूत अंगावर गरम कपडे घालण्याची आवश्यकता नसते. ऐन हिवाळ्यातदेखील डेक्कन क्वीनने येणारे प्रवासी पुण्याहून येताना गरम स्वेटर, त्यावर कोट, मफलर, कानटोपी अशा कडेकोट बंदोबस्तात निघतात. पण घाट उतरला की या मंडळींना घाम फुटू लागतो. दादरला डेक्कन क्वीन टकली की नेहमी पँट–मॅनिलात वावरणाऱ्या मुंबईकरांना हा गरम वेष हास्यास्पद वाटतो.

पण मुंबईतही कधीमधी गरम कपड्यांचे शौक करता येतात. अशी थंडी पडायला लागली की ठेवणीतले गरम कोट, कोटचा स्वेटर्स काढून अंगावर घालून मिरवायचे. आतून अंगाला घाम येत असला तरी पर्वा नाही. एरवी हे गरम कपडे वापरायचे कधी ? कायमचेच कपाटात ठेवून द्यायचे ?

आणखीही एक जात अशी असते की जी नेहमीच मुंबईत गरम कपड्यांनी वावरत असते. बंद गळा, त्यावर टाय कसलेला, त्यावर कोट. वातानुकूल घरात राहून वातानुकूल ऑफिसात काम करणाऱ्या आणि वातानुकूल हॉटेलांमध्ये जेवणाऱ्या आणि वातानुकूल मोटारींमधून फिरणाऱ्या बड्या मंडळींना हे शोभून दिसते. पण भर ऑक्टोबर किंवा एप्रिल-मेमध्ये ऐन मध्यान्ही संपूर्ण सुटाबुटातून घामाच्या नद्या वाहवत फिरणारी मंडळी बघितली की कीव येते. मुंबईत हिवाळ्यातदेखील टाय बांधला की गळ्याला घाम येतो. मग इतर वेळचे काय विचारता ! पण मुंबईतले एक लाखावर लोक तरी रोज टाय-कोट घालून वावरणारे असतील. बिच्चारे ! करणार काय ? मोठ्या शहराचे, मोठेपणाचे, जवळ पैसे असल्याचेही काही कंपल्शन्स असतातच. अंगावर पुरेसे वस्त्र नाही, डोक्यावर

चांगलासा निवारा नाही, वगैरे तक्रारी करणाऱ्या मुंबईकरांनी आपल्या दुःखाचे फारसे कौतुक करू नये. भर मुंबईच्या हवेत रोज अंग दडपून टाकणारे कपडे बांधून आणि गळा आवळून स्वतःवर जाणीवपूर्वक शारीरिक अत्याचार करणाऱ्या या बघ्या लोकांचे दुःख त्यापेक्षा मोठे आहे.

पण सध्या आता सीझन आहे. त्यामुळे संध्याकाळी आणि रात्री थिएटर्सवर गर्दी करणाऱ्यांमध्ये रंगीबेरंगी गरम कपडे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. फॅशनेबल क्लब्स आणि गुळगुळीत हॉटेलांचे काय विचारता! सायबेरिया आणि आर्क्टिक खंडांतल्या लोकांनीही धडे घ्यावे असे जाडजूड कपडे घालून इथे लोक येतात. चामड्याची जॅकेट्स्, फरच्या कॉलरी, टोप्या, रंगीबेरंगी मफलर्स, लोकरी हातमोजे आणि काय काय. त्यांच्याकडे बघून असे वाटते की कमीत कमी एखाद्या दिवशी तरी मुंबईत चिकार थंडी पडावी आणि असे कपडे घातलेले श्रीमंत स्त्री-पुरुष बघितल्यावर त्यांची कीव न यावी.

खरे म्हणजे मुंबईच्या थंडीपेक्षा पुण्याची थंडी काही फार कडक नसते. पण मुंबईच्या लोकांना पुण्याच्या थंडीचे कोण कौतुक! परवा एक गृहस्थ पुण्याला जाणार होते. पेपर्स बघून ते उद्गारले, छे, पुण्याला कोण जातोय? मुंबईला सध्याच १८ डिग्रीज सेंटीग्रेड. कोण थंडी! आणि पुण्याला ६ डिग्रीज. म्हणजे मुंबईच्या तिपटीने थंडी! त्या मुंबईकराने हुडहुडी भरल्यासारखा मानेला हिसडा दिला आणि पुण्याला जाण्याचा बेत रद्द केला!

मुंबईच्या या हिवाळी हवेत खरं तर शेकोट्या पेटविण्याची गरज भासत नाही. तरीही या सुमारास राजकीय शेकोट्या पेटवल्या जातातच. राज्यसरकारी कर्मचाऱ्यांच्या संपाच्या शेकोटीची ऊब बऱ्याच कामगार संघटनांनी आणि शिवसेनेने काही काळ घेतली. आता ती शेकोटी विझली तरी कापूस प्रकरण तापते आहेच. आता या प्रश्नावर विधानसभेत बोंबाबोंब होणारच. गिरणी कामगारांच्या बोनस-प्रकरणी मुंबईत जे घडले त्याचेही कोलीत विरोधी पक्षांना मिळणारच. पार्श्व-संगीतासारखा सीमाप्रश्नाचा विस्तव सतत जळत असतोच.

मुंबई महानगरपालिकेची स्वतंत्र शेगडी असतेच. बेस्ट-जनरल मॅनेजर प्रकरणी महानगरपालिकेची केवढी हास्यास्पद स्थिती व्हावी! महानगरपालिकेने मारे ठराव करून लालवाणींना हाकलून देण्याचा निर्णय घेतला. कायदेशीर मत मागविले तर कळविण्यात आले की, कॉर्पोरेशन लालवाणींवर कोणताही कायदेशीर इलाज करू शकत नाही! सरकारने परत बोलावले म्हणून लालवाणी सन्मानाने परत गेले. नाहीतर ते कॉर्पोरेशनच्या मानगुटीवरच बसते. परंतु एवढी झालेली मानहानी महानगरपालिका सदस्यांना पुरेशी वाटत नाही असे दिसते. प्रकरण एवढ्यावरच सोडून देण्याचा नगरपित्यांचा इरादा दिसत नाही. त्यांनी आता संपूर्ण लालवाणी प्रकरणात चौकशी मंडळ नियुक्त करण्याची मागणी करण्यासाठी

महानगरपालिकेची खास सभा बोलविली आहे. लालवाणींनी नगरपालिकेतील राजकीय नेत्यांवर जे आरोप केले त्यामुळे ही मंडळी भलतीच चिडली आहेत आणि लालवाणींचा पुरा नक्षा उतरविण्याच्या तयारीत ते आहेत.

या म्युनिसिपल शेगडीत परवा आणखी एक काडी पडली. आतापर्यंत रेशनच्या धान्यात लोखंड, माती वगैरे सापडली होती. पावांमध्ये झुरळे निघाली होती. पण पावांमध्ये काचेचे आणि ब्लेडचे तुकडे सापडण्याचे प्रसंग बहुतकरून फारच क्वचित येत असावेत. घाटकोपरच्या एका म्युनिसिपल प्राथमिक शाळेत मुलांना खायला दिलेल्या पावांमध्ये चक्क या वस्तू मिळाल्या. लोखंडाचे चणेच काय पण काचेचे आणि ब्लेडस्‌चे तुकडेदेखील मुंबईची मुले पचवू शकतात हे सिद्ध करण्यासाठी केलेला हा प्रयोग होता की काय न कळे. पण त्यामुळे घाटकोपरात एकच घबराट पसरली. हे पाव खाऊन काही मुले मेल्याच्या अफवा पसरल्यामुळे तर एक शाळाच ओस पडली.

साहजिकच नगरपिते या प्रकरणी भयंकर तापले आहेत. सर्व शाळांमधील पावांचा पुरवठा तात्काळ स्थगित करण्यात आला आहे. ज्या बेकरीतून हे पाव जातात त्यांचे म्हणणे असे की पाव तयार करण्याची पद्धतच अशी आहे की आत दुसरा कोणता पदार्थ जाण्यास वावच नाही. या प्रकरणी काहीतरी 'काळे बेरे' असल्याचा त्यांना संशय आहे आणि या रहस्याचा शोध घेण्यासाठी ही बाब आता सी. आय. डी. कडे सोपविण्यात आली आहे.

## नको . . . या विषयावर एक ओळही नको . . .

महाराष्ट्र आणि म्हैसूर यांच्या सीमेवरील वादग्रस्त विभागांचा प्रश्न हाता-तोंडाशी सुटायला आला. म्हणता म्हणता वाट दिसत नाही. 'आला रे आला 'च्या चालीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक आणि महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष वसंतरावदादा पाटील यांनी आजपर्यंत अनेकवार ' सुटलाऽऽरे सुटला 'ची हाकाटी दिली आहे. पण अजून या समस्येवरचा एकही तोडगा आवाक्यात आलेला दिसत नाही. मुख्यमंत्र्यांनी कैक वेळा निश्चित दिवस सांगून अमुक एका तारखेच्या आत प्रश्न सुटेलच असे सांगून स्वतःचे हसे करून घेतले आहे. मागच्या पंधरवड्यात तर वसंतदादा पाटलांनी एका भल्या पहाटे बातमीदारांना दिलासा दिला की, येत्या चार दिवसांत प्रश्न सुटण्याचा मार्ग दिसेल. चौथ्या दिवसाचा सूर्य सुरक्षितपणे उजाडला, पण या ' मार्गा 'वर प्रकाश पडला नाही. त्यामुळे वसंतदादांवर ' आता काहीतरी करावे लागेलच ' असे सांगलीतून सांगण्याची पाळी आली. याच वसंतदादांनी मागच्या वर्षी लोकसभेसमोर धरणे धरण्याचा किंवा लोकसभा बंद पाडून

इंदिराजींची अडवणूक करण्याचा मार्ग सुचविला होता. पण तो फुसका ठरला. मध्ये इंदिरा गांधींनी आपले स्पेशल दूत मुंबई-बंगलोरला पाठवून जोरदार ड्रामा निर्माण केला होता. पण तोही पोकळ फार्स ठरला. विधानसभेचे पावसाळी अधिवेशन विरोधी पक्षीयांनी बोंबाबोंब करून बंद पाडले होते. त्यातूनही काहीच निष्पन्न निघाले नाही. शिवसेनेने तर नोव्हेंबर १९६९ ची 'डेड लाईन' देऊन 'करू किंवा मरू'ची प्रतिज्ञा केली होती. १९७० सालच्या नोव्हेंबरमध्ये शिवसेनेच्या अजेंड्यावर अधिक महत्त्वाचे प्रश्न असल्याने या विषयाला स्थान मिळणे शक्य नव्हते. उपोषणाचे प्रयत्न झाले. एकदा तर सेनापती बापटांनी या प्रयत्नात इतर लोकांच्या तोंडाला फेसही आणला होता. धमक्या झाल्या, बोलणी झाली, दंगे झाले. थोडक्यात काय की महाराष्ट्राने आपल्या हातातले सारे पत्ते खाली टाकले. पण डाव आला नाही. एकच एक्का उरला आहे, काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामा देण्याचा. पण एक्का आहे हुकूम नाही, अशी स्थिती झाली आहे.

मागे वसंतराव नाईकांनी अनेकवार सांगितले आहे की हीच वेळ प्रश्न सोडविण्याची आहे. १९७० च्या आत जर काही तोडगा निघाला नाही तर प्रश्न सुटणे कठीण आहे--वगैरे. आता १९७० च्या शेपटाचा शेवटचा भागही चालला आहे आणि ७१ ची शिंगे दिसू लागली आहेत पण प्रकाश कोठे दिसत नाही. भात्यामधील सर्व बाण संपलेल्या योद्धयाप्रमाणे महाराष्ट्र काँग्रेस आता हतबल झाली आहे.

आतापर्यंत विरोधी पक्षांनी जोर धरला होता. म्हणजे मोर्चे वगैरे आणणे, विधानमंडळाचे अधिवेशन बंद पाडणे. पण मोर्चा आणायला खर्च फार येतो कारण माणसे बेळगावहून आणावी लागतात. सीमा-प्रश्नावर मुंबईतली माणसे येतात होय ! राजकीय प्रश्नांशिवाय मुंबईत इतर कुणाला सीमाभागाचे सोयरसुतक आहे आणि अधिवेशने बंद पाडूनही काही भागत नाही. आमदारांचे हप्ते मात्र बुडतात. त्यामुळे विरोधी पक्षांनीही आता कच खाल्लेली दिसते आहे. या नागपूरच्या विधानमंडळाच्या अधिवेशनापूर्वी मुंबईत झालेल्या विरोधी पक्ष-नेत्यांच्या बैठकीत बरीच बाचाबाची झाली होती. शेतकरी-कामकरी पक्षाचा आग्रह की सीमाप्रश्नावर पहिल्याच दिवसापासून अधिवेशन बंद पाडले पाहिजे. तर प्र. सो. पा., सं. सो. पा., कम्युनिस्ट वगैरेंचा याला विरोध होता. अधिवेशन बंद पाडून तरी काय फायदा ? महत्त्वाच्या इतर प्रश्नांची त्यामुळे चर्चाही करता येत नाही. असा त्यांचा पवित्रा होता. याचा अर्थ सीमाप्रश्न आता कमी महत्त्वाचा झाला आहे असे नाही हे सांगण्याची घाई.

विरोधी पक्षांचेही बरोबर आहे. सीमाप्रश्नाच्या नावावर किती दिवस इतर प्रश्न दाबून ठेवणार ? कापसाचा तुटवडा, दुष्काळी कामे, सरकारी नोकरांचा प्रश्न

पृष्ठ ५९ वर

राजकीय चित्र बदलून टाकणाऱ्या

# पाकिस्तान-निवडणुका

वा. दा. रानडे

नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीने पाकिस्तानचे राजकीय चित्रच पार बदलून टाकले आहे. प्रौढ मतदान पद्धतीनुसार पाकिस्तानात झालेल्या या पहिल्याच सार्वत्रिक निवडणुका. मतपेटी हे जनतेच्या हातातील केवढे मोठे शस्त्र आहे हे भारतातील १९६७ च्या निवडणुका, सिलोनमध्ये गेल्या वर्षी झालेल्या निवडणुका आणि पाकिस्तानातील आताच्या निवडणुका यांनी पुन: एकदा दाखवून दिले आहे.

निवडणूक निकालाचा सर्वांत महत्त्वाचा विशेष म्हणजे शेख मजीबुर रहमान यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीगने मिळविलेले डोळे दिपविणारे यश. नॅशनल असेंब्लीत या पक्षाने केवळ पूर्व पाकिस्तानातील विजयाच्या जोरावर निर्णायक बहुमत मिळविले आहे. नॅशनल असेंब्लीच्या एकूण लोकनियुक्त जागा ३००. त्यांपैकी २९१ जागांच्या निवडणुका ७ डिसेंबरला झाल्या. त्यात या पक्षाने १५१ जागा जिंकल्या. वादळग्रस्त नऊ मतदारसंघातील निवडणुका नंतर होणार आहेत. त्या सर्व जागाही हाच पक्ष मिळवील असे आतापर्यंतच्या निकालावरून दिसते. असेंब्लीत तेरा जागा स्त्रियांसाठी राखीव असतात. त्यांपैकी बहुसंख्य जागांवर आपल्या पक्षाला पाठिंबा देणाऱ्या स्त्रियांचीच निवड हा पक्ष घडवून आणू शकेल. याचा अर्थ पक्षाची एकजूट कायम टिकली तर इतर पक्षांच्या पाठिंब्यावर अवलंबून राहण्याची अवामी लीगला आवश्यकता नाही. अवामी लीगचे नेते रहमान यांना पक्षाच्या या सामर्थ्याची जाणीव आहे. पश्चिम पाकिस्तानातील पक्षांशी युती करण्याचा तुमचा विचार आहे काय, असे 'एका परदेशी वार्ताहरा'ने विचारताच 'आमच्या पक्षाने निर्विवाद बहुमत मिळविले आहे' एवढेच उत्तर त्यांनी दिले.

रहमान यांचा युतीला व संयुक्त आघाडीला विरोध आहे याचे कारण युतीवा

कटू अनुभव पूर्व पाकिस्तानमधील १९५८ मधल्या संयुक्त सरकारच्या काळात त्यांना आलेला आहे.

युतीच्या विरोधाचा अर्थ सहकार्यालाही विरोध असा नाही. समान कार्यक्रम असलेल्या पश्चिम पाकिस्तानातील पक्षांशी ते सहकार्य करतील. असे पक्ष कोणते ? पश्चिम पाकिस्तानात बहुसंख्य जागा मिळविलेल्या भुट्टोंच्या जनता पक्षाशी त्यांचे कितपत जमेल ? बँकांचे राष्ट्रीयीकरण वगैरे समाजवादी कार्यक्रम भुट्टो यांनीही पुरस्कारला आहे हे खरे; पण पूर्व पाकिस्तानला पूर्ण स्वायत्तता ही रहमान यांच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची मागणी आहे. भुट्टोंनी त्यास उघड विरोध केलेला नाही पण उघड पाठिंबाही दिलेला नाही. त्यांनी या प्रश्नावरील आपली भूमिका संदिग्ध ठेवली आहे याचे कारण रहमान यांच्याशी आपणास तडजोड करावी लागेल याची त्यांना जाणीव असावी. पूर्व पाकिस्तानात रहमान आणि पश्चिम पाकिस्तानात भुट्टो यांनी प्रभावी चळवळी उभारल्यानेच आयूब यांना सत्ता सोडावी लागली हे खरे; पण या चळवळी समांतर होत्या. त्यांच्या नेत्यांत सहकार्य नव्हते. भुट्टो आज रहमान यांच्याशी वाटाघाटी करण्याची तयारी दर्शवीत असले तरी भुट्टोंबाबत पूर्वी आलेला अनुभव रहमान विसरलेले नाहीत. भुट्टो यांनी मार्च १९७० मध्ये डाक्क्यास भेट दिली होती. त्या वेळी रहमान यांची भेट घेण्याचेही त्यांनी टाळले. पूर्व पाकिस्तानच्या स्वायत्ततेचा प्रश्न राजकीय नेत्यांनी आपसात सोडवावा, घटनासमितीपुढे तो आणू नये असे मत त्या वेळी त्यांनी व्यक्त केले होते. भुट्टो याच मताला चिटकून राहणार असतील तर रहमान यांच्याशी त्यांचे सहकार्य होणे कठीण आहे. वायव्य सरहद्द प्रांतातील बादशहा खानांचे चिरंजीव वलीखान यांचा गट, सिंधमधील जी. एम्. सय्यद यांचा गट प्रांतिक स्वायत्ततेचा पुरस्कार करणारा आहे. त्यांच्याशी रहमान यांचे अधिक सहकार्य होऊ शकले असते पण या दोन्ही गटांना निवडणुकीत फारच थोडचा जागा मिळाल्या आहेत.

रहमान यांच्या अवामी लीगने पूर्व पाकिस्तानात १५३ पैकी १५१ जागा जिकल्या हा लोकशाही निवडणुकांच्या इतिहासातील एक विक्रमच म्हणावा लागेल. त्याचबरोबर पश्चिम पाकिस्तानात एकही जागा या पक्षास मिळाली नाही ही त्याच्या यशाची मर्यादाही लक्षात घेतली पाहिजे. भुट्टो यांच्या पक्षाच्या बाबतीतही हेच म्हणता येईल. पश्चिम पाकिस्तानात त्यांनी बहुसंख्य जागा मिळविल्या पण पूर्व पाकिस्तानात एकही जागा त्यांच्या पक्षास जिंकता आली नाही. पाकिस्तानच्या दोन्ही भागातील जनतेचा ज्याला चांगला पाठिंबा आहे असा एकही पक्ष आज पाकिस्तानात नाही हे या निवडणुकीने स्पष्ट झाले आहे.

## धार्मिक पक्षांचा धुव्वा

निवडणुकीत उलेमांचे वर्चस्व असलेल्या जमाते इस्लाम व इतर पक्षांचा, तसेच मुस्लीम लीगचा धुव्वा उडाला. जमाते इस्लाम पक्षास फक्त चार जागा

मिळाल्या. मुस्लीम लीगचे तीन तुकडे झाले होते. त्यांपैकी एकालाही दहापेक्षा अधिक जागा मिळाल्या नाहीत. कायूमखान यांच्या मुस्लीम लीगला ९, मिया दौलताना यांच्या लीगला ७, तर आयूबखानांच्या मुस्लीम लीगला अवघ्या दोन जागा मिळाल्या. पाकिस्तानी जनतेवरील कट्टर धर्माधिष्ठित राजकारणाचा पगडा कमी झाला आहे असे यावरून दिसत असले तरी धर्माला आवाहन न करता पूर्णपणे धर्मनिरपेक्ष राजकारणाचा पुरस्कार कोणताही पाकिस्तानी पक्ष अजून करू लागलेला नाही. समाजवाद इस्लामविरोधी आहे, असा फतवा ३३ उलेमांनी काढला होता त्याला उत्तर म्हणून आपला समाजवाद इस्लामी मुशावरतवरच (समता) आधारलेला आहे असा प्रचार भुट्टोंनी केला. 'कुराण किंवा सुन्ना यांना विरोधी असा कोणताही कायदा करण्यात मी सहभागी होणार नाही' असे निःसंदिग्ध अभिवचन अवामी लीगचे नेते शेख मजीबुर रहमान यांनी दिले हे या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे. पाकिस्तानी जनतेवर धार्मिक आवाहनाचा प्रभाव अजून आहे पण त्यातील कडवेपणा, धर्मांधपणा कमी होत चालला आहे असाच निवडणूक निकालांचा अर्थ लावता येईल.

निवडणुका झाल्या, पुढे काय? पाकिस्तानात खऱ्या लोकशाही राजवटीची सुरुवात आता होणार आहे काय या प्रश्नांचे उत्तर एवढ्यातच देता येणे कठीण आहे. नव्याने निवडून आलेल्या प्रतिनिधींपुढील पहिले कार्य घटना बनविण्याचे आहे. त्यासाठी त्यांना १२० दिवसांची मुदत अध्यक्ष याह्याखान यांनी दिलेली आहे. या मुदतीत घटना तयार झाली नाही तर घटनासमिती ते विसर्जित करतील. घटनासमितीने तयार केलेल्या घटनेस याह्याखानांनी मान्यता दिली पाहिजे. त्यांनी मान्यता देण्याचे नाकारले तर घटना आपोआप रद्द होईल. याचा अर्थ घटनासमिती सार्वभौम नसून अंतिम निर्णयाधिकार याह्याखानांनी स्वतःकडे ठेवले आहेत. लोकप्रतिनिधींनी तयार केलेल्या घटनेस मान्यता द्यावयाची की नाही हे एका व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून ठेवणे हेच मुळात लोकशाहीविरोधी आहे. पाकिस्तानच्या राजकारणावरील आपली अंतिम पकड सोडावयास लष्कर आणि लष्करी नेते अजून तयार नाहीत असाच याचा उघड अर्थ आहे. म्हणजे यापुढचा झगडा लोकप्रतिनिधी विरुद्ध लष्कर यांच्यांत असून त्यात लोकप्रतिनिधी कितपत यशस्वी होतात यावर पाकिस्तानातील लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे.

लोकांनी निवडलेली घटनासमिती पूर्णपणे सार्वभौम आहे. अध्यक्ष याह्याखानांचे याबाबतीत कोणतेही अंतिम अधिकार आम्ही मान्य करणार नाही, त्यांनी दिलेल्या मुदतीत घटना तयार करण्याचा शक्यतो प्रयत्न केला जाईल. पण पूर्ण विचारांती घटना तयार करण्यास एवढी मुदत पुरेलच असे नाही. तेव्हा घटनासमितीला यासाठी लागेल तेवढी मुदत दिली पाहिजे. तसेच घटनासमितीने तयार केलेली घटना अंतिम आहे, याह्याखानांनी तिला मान्यता दिली पाहिजे. काही कलमे

# अवामी लीगचा कार्यक्रम

पाकिस्तानच्या निवडणुकीत अभूतपूर्व विजय मिळविलेल्या शेख मजीबुर रहमान यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीगचा सहा कलमी कार्यक्रम :

१. लाहोर ठरावाच्या पायावर पाकिस्तानचे खऱ्या अर्थाने संघराज्य स्थापण्याची तरतूद घटनेने केली पाहिजे. सरकार संसदीय स्वरूपाचे असले पाहिजे. प्रौढ मतदानाने निवडलेल्या विधिमंडळाच्या हाती अंतिम सत्ता असली पाहिजे.

२. संघराज्य सरकारकडे दोन विषय राहतील : संरक्षण व परराष्ट्र-संबंध. इतर सर्व विषय घटक राज्यांकडे असतील.

३. घटनेचे, तसेच प्रादेशिक एकसंघतेचे रक्षण करण्यासाठी राज्यांना निमसरकारी, लष्करी किंवा प्रादेशिक सेना उभारण्याचा अधिकार असला पाहिजे.

सर्व मूलभूत, मोठे उद्योगधंदे, बँका, विमा कंपन्या, दळणवळणाची सर्व साधने आणि परराष्ट्र व्यापार यांचे राष्ट्रीयीकरण केल्यानेच देशाचा भक्कम पायावर जलद विकास होईल व पूर्व पाकिस्तानच्या जनतेच्या प्राथमिक गरजा भागविता येतील, असे अवामी लीगला वाटते.

४. परराष्ट्र धोरण स्वतंत्र व अलिप्त राहील. कोणाबद्दलही पूर्वग्रह न बाळगता सर्वांशी मैत्रीचे संबंध ठेवण्यात येतील.

५. पाकिस्तानात (अ) एकतर दोन वेगळी चलने – ज्यांचे सहज रूपांतर करता येईल अशी – सुरू करावी किंवा (ब) सबंध देशासाठी एक चलन असावे. पूर्व पाकमधून पश्चिम पाककडे भांडवलाचा ओघ जाऊ नये यासाठी घटनेत परिणामकारक तरतुदी करण्यात याव्यात.

कर बसविण्याचे पूर्ण अधिकार राज्यांना असावेत. संघराज्य सरकारला हा अधिकार असणार नाही, पण आवश्यक खर्च भागविण्यासाठी राज्यांच्या करातून त्यांना वाटा मिळेल. राज्यांच्या करांचे विशिष्ट प्रमाण ठरवून हा संघराज्य निधी उभारण्यात यावा.

६. परराष्ट्र व्यापार : (१) प्रत्येक घटक राज्यासाठी परराष्ट्र व्यापाराचा वेगळा हिशेब ठेवावा. (२) परराष्ट्र व्यापारातून मिळालेले परकीय चलन राज्यांकडेच वापरण्यास दिले जावे. (३) संघराज्य सरकारची परदेशी चलनांची गरज राज्यांना विशिष्ट प्रमाणात रक्कम देऊन भागवावी. (४) देशी वस्तूंची वाहतूक राज्याराज्यांत कोणताही कर न आकारता केली जाईल. (५) राज्यांना परदेशांत व्यापार प्रतिनिधी नेमण्याची व राज्याच्या हिताच्या दृष्टीने व्यापारीकरार करण्याची मोकळीक असावी.

त्यांना मान्य नसतील तर त्यांनी दुरुस्त्या सुचवाव्या, त्यांचा विचार घटनासमिती क ील व निर्णय घेईल. तो याह्याखानांनी मान्य केला पाहिजे, अशी आपली भूमिका घटनासमितीने सुरुवातीलाच स्पष्ट केली पाहिजे. पाकिस्तानचे लोक-तिनिधी हे धैर्य कितपत दाखवितात हे आता पाहावयाचे आहे.

याह्याखानांशी यशस्वी झगडा द्यावयाचा तर लोकप्रतिनिधींची एकजूट टिकली पाहिजे. पूर्व विरुद्ध पश्चिम असा संघर्ष निर्माण झाला तर ही एकजूट टिकणार नाही. त्याचा फायदा घेऊन याह्याखान आणि त्यांचे लष्कर पाकिस्तानी राजकारणावर आपली पकड पुनः घट्ट बसवतील. पूर्व-पश्चिम संघर्ष दोन्ही बाजूंच्या नेत्यांनी वाटाघाटी करून लोकशाही तत्त्वावर मिटविला पाहिजे. पूर्व पाकिस्तान हा लोकसंख्येच्या दृष्टीने मोठा घटक असूनही स्वातंत्र्यानंतर गेली तेवीस वर्षे पश्चिम पाकिस्तानचे वर्चस्व त्या प्रदेशावर होते. त्याची प्रतिक्रिया म्हणून पश्चिम पाकिस्तानवर पूर्व पाकिस्तानचे वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करता कामा नये. लोकसंख्येच्या प्रमाणात जागा असल्याने नॅशनल असेंब्लीत पूर्व पाकिस्तानला बहुसंख्य जागा आहेत आणि त्या निरनिराळ्या पक्षांत विभागल्या गेलेल्या नसून अवामी लीग या एकाच एका पक्षाने फक्त दोन जागा सोडून बाकी सर्व जागा जिंकल्या आणि केवळ पूर्व पाकिस्तानमध्येच नव्हे तर सबंध नॅशनल असेंब्लीत निर्णायक बहुमत मिळविले आहे. मनात आणले तर हा पक्ष आपल्या बहुमताच्या जोरावर पश्चिम पाकिस्तानवर वर्चस्व प्रस्थापित करू शकेल. पण यातून पूर्व-पश्चिम संघर्ष वाढत जाईल. पूर्व पाकिस्तानला अनुकूल घटना पश्चिम पाकवर लादण्याचा प्रयत्न झाला तर पश्चिम पाकचे नेते त्यास विरोध करतील. ही घटना आम्हांला मान्य नाही, याह्याखानांनी तिला मान्यता देऊ नये, असे दडपण ते त्यांच्यावर आणतील. आपली पकड पुनः बसवायची आलेली संधी याह्याखान दवडणार नाहीत.

हा धोका टाळावयाचा असेल तर पूर्व व पश्चिम दोन्ही भागांना मान्य होईल अशी घटना तयार करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. त्यासाठी उभयमान्य अशी काही तत्त्वे प्रथम ठरली पाहिजेत. पूर्व पाकिस्तानची स्वायत्ततेची मागणी त्यात मान्य झाली पाहिजे. संरक्षण व परराष्ट्र धोरण हे दोनच विषय संघराज्य सरकारकडे असावेत. बाकी सर्व बाबतींत घटकांना स्वायत्तता असावी अशी रहमान यांची मागणी आहे. यामुळे केंद्र सरकार दुबळे होईल, अशी भीती पश्चिम पाकच्या नेत्यांना वाटते. सबंध देशाचा एकसूत्री विकास घडवून आणावयाचा असेल तर आर्थिक नियोजन हा विषय केंद्र सरकारकडेच असला पाहिजे. तेव्हा संरक्षण, परराष्ट्रधोरण, यांच्या जोडीला आर्थिक नियोजन हा विषय केंद्राकडे देण्यास पूर्व पाकिस्तानने तयार झाले पाहिजे. केंद्र सरकारात पश्चिम पाकच्या नेत्यांचे वर्चस्व

पृष्ठ ६२ वर

# नांदेडचे वार्तापत्र

देवदत्त तुंगार

## नांदेडची हालहवाल

यंदा मराठवाड्यातील धान्यपरिस्थिती चिंताजनक आहे. अतिवृष्टीने पिके बुडाली. कापूस, ज्वारी हातची गेली. शेतकरीवर्ग हवालदिल आहे. ग्रामीण भागातील परिस्थिती चिंताजनक झाली असून गुन्हेगारी व 'नक्षलवादी' प्रवृत्ती वाढण्याची भीती जाणकारांना वाटत आहे. ठिकठिकाणी दुष्काळी परिषदा होत आहेत. दुष्काळ 'जाहीर' करण्यासाठी आवश्यक असलेली 'कागदोपत्री' माहिती गोळा करण्याचे 'सरकारी काम' धीम्या गतीने चालू आहे. पावसाने झोडपले व राजाने (किंवा नवऱ्याने!) मारले तर दाद फिर्याद तरी कुठे करायची हा निदान पूर्वार्धातील प्रश्न आजही अनुत्तरीतच आहे.

## ७२ ची चाहूल

१९७२ च्या सार्वत्रिक निवडणुकीची पूर्वतयारी सुरू झाली आहे. महाराष्ट्रात व विशेषतः मराठवाड्यात इंदिरा–सर्कसमधील मंडळीच बहुतांशाने विजयी होईल असा रागरंग दिसतो. विरोधी पक्षांतील शैथिल्य आणि फाटाफूट यांचा फायदाही इंडिकेट (महाराष्ट्रापुरती यंडिकेट) गटाला फायद्याचा ठरणार यात शंका नाही. नांदेड जिल्ह्यातील उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे श्री. नागोराव जाधव यांनी व बिलोली तालुक्यातील १२ प्रमुख कार्यकर्त्यांनी पक्षसदस्यत्वाचे राजीनामे दिल्याने उजव्या कम्युनिस्ट पक्षाला 'गळती' लागली आहे. अर्थात त्यामुळे पुरोगामी राष्ट्रवादी विचाराच्या लोकांना फारसे समाधान वाटण्यासारखे काही नाही. कारण उजव्या कम्युनिस्ट पक्षाचा त्याग करून हे लोक डाव्या कम्युनिस्ट पक्षात गेले आहेत. उजवा आणि डावा कम्युनिस्ट पक्ष म्हणजे भारतीय समाजपुरुषाला जडलेला राजयक्ष्मा आणि कर्करोग होय. एक रोग कमी होऊन दुसरा बळावला तरी पेशंटची स्थिती चिंताजनकच असते. जनसंघ आणि समाजवादी या पक्षांची ताकद वाढली तर या पार्श्वभूमीवर ती स्वागतार्ह घटना ठरेल. तूर्त तशी काही चिन्हे दिसत नाहीत एवढे खरे!

## वैदिक सेवाश्रमाचा वार्षिकोत्सव

नांदेडचे एक प्रसिद्ध आर्यसमाजी कार्यकर्ते श्री. शिवराम जिंदम यांनी वाजेगाव येथे दोन वर्षांपूर्वी 'वैदिक सेवा आश्रम' संस्था स्थापन केली आहे. वानप्रस्थी बनून ते आता 'शिवमुनी' झाले आहेत. लाखो रुपयांची संपत्ती त्यांनी त्यासाठी दान केलेली आहे. वैदिक सेवाश्रमाचा दुसरा वार्षिकोत्सव नुकताच उत्साहाने साजरा झाला. हैदराबादहून पंडित नरेन्द्रजी, अलिगडहून पंडित विश्वबंधूजी इत्यादी

प्रमुख नेते आले होते. ख्रिस्तीकरणाचा वाढता जोर, अराष्ट्रीय प्रवृत्ती आणि हिंदु-समाजामधील फुटीरता यांबद्दल चिंता व्यक्त करून पं. नरेन्द्रजींनी सुसंघटित हिंदु-समाजाची आवश्यकता प्रतिपादली. आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती हे भारताच्या थोर ऋषी-परंपरेतील महान ऋषी होते व त्यांनी भारताच्या धार्मिक व सामाजिक अवनतीच्या काळात १०० वर्षांपूर्वी आर्यसमाज स्थापन करून देशोन्नती केली असे पंडित विश्वबंधू यांनी सांगितले. त्यांची दोन प्रवचनेही झाली. भारतीय संस्कृतीत 'कमला'चे महत्त्व त्यांनी प्रतिपादिले व संसारात सर्व व्यवहार करीत असताना कमलपत्राप्रमाणे राहावे असे आवाहन केले. 'रामायणा'सारखी उदाहरणे देऊन 'इतिहास जंगलातच घडतो' हे रामाच्या व राणा प्रतापच्या उदाहरणांवरून दिसते असे सांगितले. श्री. शेषराव वाघमारे यांनी 'हिंदुत्वाचा अस्सल अर्क' म्हणजे आर्यसमाज असे प्रतिपादन करून सामाजिक सुधारणा व दलितांचा उद्धार यांसारखी कामे सरकारपेक्षा आर्यसमाजासारख्या संस्थाच अधिक यशस्वीपणे करू शकतात म्हणून आर्यसमाज वाढविला पाहिजे, असे सांगितले. श्री. केतकरांच्या ज्ञानकोशातील 'आर्यसमाजा'बद्दलची माहितीही त्यांनी या वेळी दिली.

मराठवाड्यातील आर्यसमाजी कार्यकर्त्यांचे एक संमेलन उस्मानाबाद जिल्ह्यातील गुंजोटी येथे ७, ८, ९ फेब्रुवारीस होणार असून वैदिक सेवाश्रमात वार्षिकोत्सवाच्या निमित्ताने त्याबद्दलची एक बैठक घेण्यात आली. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून श्री. शेषराव वाघमारे यांची निवड झाली असून 'आंदोलन–मंत्री'पदाची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आलेली आहे. सदर संमेलनात मराठवाडा उपआर्य प्रतिनिधिसभा स्थापन करण्यात येणार असून प्रत्येक जिल्ह्यात एकेक उपदेशक नेमून आर्यसमाजाचे 'शुद्धी', 'संघटन' व अस्पृश्योद्धाराचे कार्य वाढविण्याचे ठरले.

## महात्मा फुले पुण्यतिथी

महात्मा ज्योतिराव फुले यांची पुण्यतिथी म्हणजे ब्राह्मणवर्गाला शिव्या देण्याची पर्वणी असा ग्रह मध्यंतरी या निमित्ताने जी भाषणे झाली होती त्यामुळे झाला होता. ज्योतिरावांचे एक चरित्रकार व जुन्या पिढीतील सामाजिक कार्यकर्ते खासदार पंढरीनाथराव पाटील (बुलढाणा) यांचे यशवंत कॉलेजमध्ये झालेले भाषण या दृष्टीने चांगले झाले. स्वर्ग–नरक यांसारख्या कल्पनांद्वारे अंधश्रद्धांना जन्म देऊन समाजाचे शोषण करणाऱ्यांचे स्वरूप महात्मा फुले यांनी पहिल्यांदा स्पष्ट केले असे सांगून सयाजीराव गायकवाड यांचे व महात्मा फुले यांचे संबंध किती जिव्हाळ्याचे होते यावर खासदार पाटील यांनी प्रकाश टाकला. बुद्धिप्रामाण्यवादी युगाचे आद्य प्रवर्तक म्हणून फुले यांची नोंद भावी इतिहासकाराला घ्यावी लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महात्मा फुल्यांसंबंधीचे नियोजित इंग्रजी चरित्र पुरे होऊ शकले नाही. अन्यथा त्यांच्या कामगिरीचे यथोचित मूल्यमापन झाले असते असेही खासदार पाटील यांनी सांगितले.

### सर्वोदयी उपद्व्याप

सर्वोदयाच्या नावाखाली गांधीजींच्या विधवा समजल्या जाणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये निदान घृणित स्वरूपाचा जातीयवाद तरी नसावा अशी अपेक्षा आहे. परंतु नांदेड जिल्हा सर्वोदय मंडळाचा संघटक म्हणविणारा नारायण सांगोळकर नामक तरुण कार्यकर्ता विनोबाजींच्या नावावर आमदार धोंडगे यांच्या जातिद्वेषी प्रचाराला तत्त्वज्ञानाचा टेकू देण्याचा प्रयत्न करीत आहे. रामदासांच्या पत्नीचे (?) काय झाले याबाबत अभूतपूर्व संशोधन (!) करणारे धोंडगेलिखित चोपडे विनोबाजींनी वाचले असून त्यात धोंडग्यांनी उपस्थित केलेला प्रश्न योग्य आहे असे प्रत्यक्ष भेटीत नारायण सांगोळकरला म्हणे विनोबांनी सांगितले. त्याने लगेच तसे पत्र धोंडग्यांना पाठविले, जे 'जयक्रांती' त छापण्यात आले आहे. विनोबाजींना पत्र पाठवून मी याबद्दलचा खुलासा मागितला आहे. विनोबा आता सूक्ष्मात गेले असून उत्तरे पाठविण्याच्या स्थितीत नाहीत असे त्यांच्यातर्फे जयदेव यांनी कळविले आहे. विनोबा काय म्हणाले कुणास ठाऊक, पण सांगोळकरसारखा 'सर्वोदयी संघटक' जातिद्वेषाच्या विघटनात्मक प्रवृत्ती वाढविण्याचा उपद्व्याप करीत आहे एवढे खरे!

### लायन्स क्लबचे स्पृहणीय कार्य

नांदेडच्या लायन्स क्लबने नुकतेच देगलूर येथे कर्करोग चिकित्सा शिबिर, तसेच मोफत रोगनिदान शिबिर घेतले. तीन हजारापेक्षा अधिक लोकांची तपासणी ११ तज्ज्ञ डॉक्टरांनी केली. अनेकांचे डोळे तपासण्यात आले. लायन्स क्लबतर्फे हा भरीव विधायक कार्यक्रम हाती घेण्यात आल्याने क्लबचे अध्यक्ष डॉ. सु. प्र. शेंदरकर यांचे नांदेडकर जनता अभिनंदन करून त्यांना धन्यवाद देत आहे. या शिबिरासाठी जात असताना मोटारीला अपघात होऊन डॉ. सौ. विद्या नेवासेकर व डॉ. सौ. चारी या जखमी झाल्या. त्यामुळे शिबिराच्या कामात काहीही व्यत्यय आला नाही ही बाब स्पृहणीय म्हणावी लागेल.

### श्री. वा. रा. कान्त यांचे काव्यवाचन

कविवर्य वा. रा. कान्त मूळचे नांदेडचेच असले तरी मुंबई येथे त्यांचा बराच काळ व्यतीत झाला व तेथेच ते स्थायिकही झाले. नांदेडच्या यशवंत कॉलेजात त्यांचा काव्यवाचनाचा कार्यक्रम झाला. त्यांनी 'मूर्तिभंजक', 'गुन्हेगार', 'चकमक झडली आहे', 'घाट' इत्यादी कविता म्हटल्या. काव्यवाचनाचा हा कार्यक्रम रंगतदार झाला. श्री. कान्त यांचा परिचय करून देताना प्रा. भु. द. वाडीकर यांनी श्री. कान्त यांच्या काव्याची वैशिष्ट्ये सांगितली. गटबाजीचा त्यांचा स्वभाव नाही व मराठवाडा साहित्य परिषदेने श्री. कान्त यांची योग्य ती बूज राखली नाही असे प्रा. वाडीकरांनी सांगितले व परिषदेच्या धुरिणांवर टीका केली.

◻ ◻ ◻

सु. ल. सोमण

# व्यर्थ न हो बलिदान !

काल चेंबूर ह्या मुंबईच्या उपनगरात कडकडीत हरताळ पाळण्यात आला. अगदी चित्रपटगृहे, हॉटेलेही बंद होती. कारण एका शिवसैनिकाचा अनैसर्गिक, अपमृत्यू ! एका मारामारीतून ओढवलेला ! ! मारामारीचे स्थळ–चेंबूरातलेच सहकार चित्रमंदिर ! शिवसैनिक कै. पुरंदरे ह्यांनी सिनेमा तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्याविरुद्ध दंड थोपटले. रविवारी, 'खामोशी' ह्या चित्रपटाची काळ्याबाजारात तिकीट-विक्री शिवसैनिक पुरंदऱ्यांनी अखेरपर्यंत होऊ दिली नाही. परिणामतः बाहेर " हाऊसफुल्ल " असूनही आत रांगांच्या रांगा रिकाम्या पडल्या होत्या. शिवसैनिकाचे हे स्तुत्य कृत्य अर्थातच सहजी पार पडले नाही. शिवसैनिक एका बाजूला व दुसऱ्या बाजूला काळाबाजार करणारे ह्यात मारामारी जुंपली. सोडा-वॉटरच्या बाटल्यांच्या वापरासकट. त्यात कै. पुरंदरे जखमी झाले व त्यातच त्यांचे देहावसान झाले !...

चित्रपटांच्या तिकिटांचा काळाबाजार ही नित्याचीच बाब होऊन बसली आहे. नवा चित्रपट असावा, काम करणारे गाजलेले असावेत–पटगृहांबाहेर दोन का चार, दो का छे वगैरे कुजबुजते स्वर सतत आढळत असतात. ह्यात काहींजवळ कधी तिकिटांची पुस्तकंच्या पुस्तकंदेखील असतात. काळ्या बाजारातली तिकीटविक्रीही अतिशय संघटितपणे होताना आढळते. बाजूलाच कित्येकदा पोलीसही आढळतात. परंतु तरीही बिचारे प्रेक्षक अगतिक होऊन जादा भावात तरी तिकिटे घेतात किंवा हताश होऊन चित्रपट न बघताच घरी तरी परततात ! परंतु काळ्याबाजारवाल्यांतर्फेची कोंडी मात्र विमनस्कपणे सहन करतात. त्यांनाही ठाऊक असते की, ह्या संघटित दंडेलीविरुद्ध ते काहीच करू शकणार नाहीत. ह्या संघटित दंडेलीला उत्तरही संघटितपणेच दिले जायला हवे होते. शिवसेनेने ते केले. तसे करताना त्यांचा एक शिवसैनिकही कामास आला. परंतु ह्याचा काही फायदा होईल का ?

काळाबाजार असो, दारूच्या भट्ट्या असोत किंवा चोरटी आयात असो–साऱ्यांच्याच मागे जबरदस्त घातकी संघटना उभ्या असतात. ह्या संघटनांना, त्या जिथे कार्य करतात तिथल्या कर्मचाऱ्यांचा, स्वार्थी पुढाऱ्यांचा, पोलिसांचाही कळत नकळत हातभार लागत असतो. म्हणूनच ह्या संघटनांच्या मुळाशी जाणे जड जाते.

संघटित प्रतिटोला ह्या प्रश्नांवर कडी करण्याचा एक मार्ग. शिवसेनेनं तो देऊन एक नवा धडा घालून दिला आहे. त्यांच्याशी राजकीय-वैचारिक मतभेद असले तरी ह्या उपक्रमाबद्दल शिवसैनिकांचे अभिनंदन मात्र केलेच पाहिजे !

पुढचे जनतेच्या शासनाच्या हाती !

## ब्लडी इंडियन्स !

---

दादर मधील एक शिप्याचं दुकान !

मित्राचे कपडे शिवून घ्यायचे होते म्हणून दुकानात गेलो होतो. दुकानात बरीच गर्दी होती. नि त्याचवेळी एक अद्ययावत् तरुण दुकानदाराला जेरीस आणू पहात होता. तंग उंच पँट, पॉईंटेड पॉलिश्ड शूज, झुपकेदार केस, साईड लॉक्स ओघानेच आले.. तोंडातनं सिगरेटचा धूर सोडत, तर कधी ओठाच्या कोपऱ्यात सिगरेट लोंबकळती ठेवत तो तरुण बोलत होता. टॉप स्टायलिश इंग्लिश मिक्स्ड हिंदी-मराठीत ! पँट कशी हवी हे तो समजावन सांगत होता. अन् त्याच्या प्रत्येक वाक्या-निशी, बिचारा दुकानदार कावून जात होता. त्यांचा संवाद, आम्हा बघ्यांना चटक-दार वाटत होता. आमची करमणूक करत होता.

"...ह्याचा शेप हा असा पाहिजे. आय् मीन इट शूट बी अँबसोल्यूट स्ट्रेट कट्. नो मिस्टेक. हे ब्लडी इंडियन् टेलर्स. एकदम् झूट... मुझे समझटा नही, ह्यांना धड मेझरमेंट्स् प्रमाणे कपडे शिवता कसे येत नाहीत. स्टाईल्स कळत कशा नाहीत...देअर इझ नो परफेक्शन अँट्टॉल !...इन् लांडान यूसी, एकदा कपडे शिवायला टाकले माप देऊन, की फिर नो फिक्र ! अँब्सोल्युट परफेक्शन यू सी ! हिअर इन् इंडिया, यू सी, ब्लडी प्रत्येक जण...कामच नको नीट करायला ! एव्हरीथींग होपलेस..."

जवळ जवळ पंधरा मिनिटं त्या " जस्ट बॅक फ्रॉम लांडान,' तरुणाच्या पँट-विषयक सूचना धंदेवाईक शांतपणानं ऐकून घेणारा तो दुकानदार आता मात्र भडकला. गिऱ्हाईकाने आणलेल्या कापडाची घडी करून त्याने ती गिऱ्हाईकाला परत दिली. शांतपणे तो म्हणाला, " साब, आप ऐसा किजिये, प्लेन चार्टर करा, लांडानला जा आनि तिथनंच घ्या कपडा सिलाई करून. ब्लडी इंडियात तुमच्या सारखा कालाआदमी नाय टिकू शकणार-ज्या सायब !" साहेब तणतणत निघून गेला. शिंपी पुढे बोलत राहिला, " साला लंडनची बात करते. लंडनची फी सांगि-तली तर डोळे पांढरे करील...खामोका साला, गिऱ्हायकाच्या टायमाला येळ बरबाद करतो ! "

□ □ □

विश्व हिंदु परिषद

# पंढरपूर संमेलन

विलास पतकी

पंढरपूरच्या चंद्रमागेला भगव्या पताकांचं काही नाविन्य नाही ! गेली कित्येक शतके वाळवंटातल्या वाळूच्या कणाकणालासुद्धा भगवी पताका सुपरिचित आहे. पण दिनांक ५ व ६ डिसेंबरला पंढरपूरला चंद्रभागेच्या वाळवंटात उभारलेल्या विश्व हिंदु परिषदेच्या पुंडलिक मंडपावर फडकणाऱ्या भगव्या झेंड्यांचा रंगच वेगळा होता ! गेली कित्येक शतके, भगवी पताका खांद्यावर टाकून वारकरी हिंदु धर्माची परंपरा अभावितपणे टिकवून धरत आला असला तरी त्यात हेतुपुरःसरता कमीच ! वारकऱ्याची माळ न तुटू देण्याच्या भाबडेपणाचेच त्यात आधिक्य ! अर्थात तुकाराम महाराज आणि तत्कालिन संत श्रेष्ठांनी मोठ्या जिद्दीने वारी चालवून बहुजनसमाजाला एकत्र केले. हिंदुधर्म टिकवून धरला व वाढीस लावला. मोगलधर्मीयांचे धर्माक्रमण थोपवून धरले. तथापि त्यांच्यामागे 'वारी' हा प्रकार कर्मकांडातच जमा होऊन बसला. भगव्या रंगाचा गडदपणा अंधश्रद्धेत फिकट होऊ लागला. आजच्या भौतिकयुगात, विज्ञाननिष्ठ युवक व प्रौढ समाजात त्याचा लोप होतो की काय अशी शंका येऊ लागल्यामुळे विश्व हिंदु परिषदेचे प्रयोजन ! ख्रिश्चनधर्मीयांचे धर्माक्रमण भारतातील काही प्रांतातून वाढल्यामुळे विस्कळीत हिंदुसमाजाला एकत्रित करून त्याविरुद्ध लढण्याचे आवाहन करण्यासाठी विश्व हिंदु परिषदेचे प्रयोजन ! नक्षलवादी, कम्युनिस्ट यांच्याकडून होणारे हिंदु संस्कृतीचे खच्चीकरण थांबविण्यासाठी हिंदुसमाजाला बद्धपरिकर राहण्याचे आवाहन करण्यासाठी विश्व हिंदु परिषदेचे प्रयोजन ! **तथापि हिंदु हा शब्द धर्मवाचक वापरावयाचा की राष्ट्रवाचक वापरावयाचा यावरच विश्वपरिषदेच्या पताकेचा भगवा रंग अवलंबून आहे ! यावरच विश्व हिंदु परिषदेचे मूल्यामूल्य अवलंबून आहे.**

चंद्रभागेच्या वाळवंटात भव्य पुंडलीक मंडप उभारलेला होता. मंडपाच्या चारी बाजूने भगव्या पताका. श्री विठ्ठलाचे चित्र काढलेल्या पडद्याची पार्श्वभूमी असलेले भव्य स्टेज. पंधरा ते वीस हजार प्रतिनिधींच्या उपस्थितीत शास्त्रोक्त वेदपठणाने परिषदेस प्रारंभ झाला. स्वागताच्या भाषणात स्वागताध्यक्ष प्रा. शिवाजीराव भोसले म्हणाले की, 'जीवनातील मलीनता, जडता, निष्क्रियता दूर करून जीवन समृद्ध करावयाचे असेल तर धर्मचक्राचे प्रवर्तन पुन्हा झाले पाहिजे, याच संदर्भात ते म्हणाले की 'धर्म म्हणजे रूढींची रास नव्हे, पोथ्यांची आरास नव्हे अन् पंडितांची मिरास नव्हे !' धर्म संपूर्ण समाजात भिनण्यासाठी, त्याबद्दल आपुलकी वाटण्यासाठी

धर्माची ' समाजवादी रचना ' यापेक्षा वेगळी ती कशी असावी ? पण हे आमच्या अंधभक्त श्रद्धावानास व डोळस पंडितास कसे समजावे ? प्रा. शिवाजीराव भोसले म्हणाले की ' धर्म हा विचार राजकारणापासून सर्वार्थाने मुक्त राहिला पाहिजे. ' वास्तविकत: धर्म आणि समाजकारण हातात हात घालून चालतात आणि समाजकारण व राजकारण खांद्यावर हात टाकून चालतात ! शिवाजीमहाराजांनी धर्मासाठीच राजकारण केले. विश्व हिंदु परिषदही ' राजकारणाचाच ' भाग आहे ! ! राजकारण म्हणजे इप्सित गोष्ट साध्य करण्यासाठी केलेली कृती ! ! !

समेलनाचे उद्घाटक श्री. जगजीतसिंग महाराज, शीखांचे नामधारी पंथाचे सद्गुरू होते. विश्व हिंदु परिषदेचे उद्घाटक म्हणून शीखांचे गुरू बोलवण्यात संयोजकांनी सूचकता दाखविली. तथापी या संमेलनात शीख प्रतिनिधींची संख्या अभावानेच आढळली ! श्री. जगजीतसिंग महाराज आपल्या भाषणात म्हणाले की ' भारतातील सर्व समाजामध्ये भारतीयत्वाची भावना निर्माण करणे आवश्यक आहे. हिंदुसमाज संघटीत व्हायलाच पाहिजे पण आपण सर्व भारतीय आहोत हे विसरता कामा नये.' याचा अर्थ हिंदु हा शब्द राष्ट्रवाचक नसून धर्म, समाजवाचक किंवा गटनिर्देशक आहे असे त्यांचे म्हणणे वाटते. हे जास्त संयुक्तिकही वाटते. कारण भारत राष्ट्र म्हणून जगण्याची कल्पना १९ व्या शतकातीलच व आज भारतात बहुसंख्य हिंदू असले तरी राष्ट्र म्हणून ' भारत 'च ओळखले जाते. यासाठी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीकोनातून, हिंदुत्वाच्या भावनेबरोबरच भारतीयत्वाची भावना बिंबविणे आवश्यक आहे.

केवळ धर्मधर्म म्हणताना अनेक हिंदु लोकांना विश्व हिंदु परिषद मुकणार आहे. कारण लोकांच्या धर्मकल्पना व धर्माकडूनच्या अपेक्षा बदललेल्या आहेत. ख्रिश्चन मिशनरी जर हॉस्पिटल्स व स्वस्त धान्य, मोफत अन्न, विहीरी खोदून देणे वगैरेसारखी जीवनोपयोगी कृत्ये सुरू करून दरिद्रीनारायण हिंदु जनतेला ख्रिश्चन करून घेत असतील तर हिंदु धर्माने या सर्व गोष्टींना तसेच सक्रीय उत्तर देऊन धर्मांक्रमण थांबविण्यासाठी कंबर कसली पाहिजे. या नंग्या-भुक्या लोकांना, ' गीता, गायत्री विद्यालये व महाविद्यालयात अभ्यासक्रमात ठेवावी ' किंवा ' संस्कृतचा त्रिभाषा सूत्रात समावेश करावा ' या आणि अशा ठरावांनी विश्व हिंदु परिषद धर्मांक्रमणापासून वाचवू शकणार नाही. या नंग्या-भुख्यांची गोष्ट सोडा पण चांगल्या, सुशिक्षित, तरुण विद्यार्थ्यांची गोष्ट सांगतो. परिषदेहून परत आल्यावर आमचं बोलणं झालं. तो म्हणाला, ' गीता हा एकच ग्रंथ हिंदुचे प्रतीक म्हणून का सांगता ? ख्रिश्चनांचा बायबल आहे म्हणून ? मुस्लिमांचा कुराण आहे म्हणून ? अरे, त्यांच्याकडे फार ग्रंथसंपदा झालीच नाही ! आणि गीतासुद्धा खूप मोठा ग्रंथ आहे हे मान्य पण तो आजच्या समाजरचनेशी सापेक्ष नाही ! गीता एकापेक्षा अनेक लेखकांनी त्यांच्या काळानुरूप कमीजास्त गोष्टी घालून लिहिलेली आहे याबद्दल दुमत नाही; मग

आजच्या भौतिक युगाचा एकोणिसावा अध्याय त्यात घाला! येऊ द्या त्यात हिंदु-समाजवादी रचनेची तत्त्वे. अठरा अध्यायांची गीता आम्हाला नको!'

## संस्कृतचा आग्रह

परिषदेच्या पहिल्या दिवशी श्री. विश्वेशतीर्थ यांचे अध्यक्षीय भाषण आक्रमक व सडेतोड झाले यात शंका नाही. त्यांनी आवाहन केले की 'सज्जनो, मेरा आपसे नम्र निवेदन है कि हम जाति, भाषा पारिवारिक संकुचितताके परिधियोमे अपनी सारी शक्तीको व्यर्थ न जाने दे।' स्वामीजींना मराठी येत नव्हते व हिंदी मोडके-तोडके येत होते. संस्कृत उत्तम रीतीने बोलता येत असूनही त्यांनी हिंदीचा वापर केला हे विशेष! कारण आपले विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचावेत ही त्यांची कळकळ होती. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी संस्कृतच्या ठरावास अनुमोदन देण्यासाठी स्वामीजींचे शिष्य अस्खलित मराठीत बोलू लागले. तथापि स्टेजवरच्या पं. वसंतराव गाडगीळ यांनी त्यांना सांगितले की इथे सर्वांना (?) संस्कृत समजते, तेव्हा संस्कृतमधूनच बोला! आणि ते सर्व भाषण आमच्या व अनेकांच्या डोक्यावरून गेले. या वेळेस मला स्वामीजींच्या मोडक्या-तोडक्या हिंदी भाषणाची तीव्र आठवण झाली.

सरकारवरती कोरडे ओढताना स्वामीजी म्हणाले, 'सज्जनो, ध्यान रखिए, इस समय हमारे सरकार धर्मपर कोई कम प्रहार नही कर रही है। ऐसी विरोधी शक्तीयाँ हमारे धर्मके लिये चुनौतीयाँ है। ऐसी अवस्थामे परधर्मसहिष्णुता के नामसे उदारता दिखाना पुरुषार्थ नही है।' हिंदूची व्याख्या करताना स्वामीजींनी स्पष्ट सांगितले की, 'प्रत्येकका कष्ट दूर करने के लिये प्रेम और दया के साथ उद्योग करनेवालाही हिंदू आदर्श कहलाता है। वह प्रेम केवल मानव तकही सीमीत नही है। चराचर तक इसकी व्याप्ति होनी चाहिए। चाहे कोई इसायी हो, चाहे कोई मुसलमान हो, मानवीय सेवाकी परिधिमे इन सबकी गणना होनी चाहिए।' या उदार व उदात्त विचारांच्या पार्श्वभूमीवर मिरजच्या मिशन हॉस्पिटलच्या मदतीसाठी लताबाईंनी 'लता मंगेशकर रजनी' ह्या योजलेल्या कार्यक्रमाचा बोजवारा स्थानिक लोकांनी कसा उडवला याची आठवण झाली. बोजवारा का उडवला तर हॉस्पिटल ख्रिश्चन मिशनचे म्हणून!

परिषदेच्या पहिल्या दिवशी आणखी एक भाषण चांगलेच लक्षात राहिले ते ना. शंकरराव मोहिते पाटील यांचे. 'संत वाङ्मय दर्शना'च्या प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून ते आले होते. ते म्हणाले, 'मी अडाणी शेतकरी माणूस, आमच्यासारखी माणसं इथं काय बोलणार?' जाता जाता एक टोला! 'आणि समजा बोललो तरी घोटाळा व्हायचा' असा स्वतःकडे कमीपणा घेऊन भाषणाला सुरुवात केली; त्यांनी एक किस्सा सांगितला. 'जपानला एक्स्पोसाठी मी व पत्नी गेलो होतो. हॉटेलात सकाळी स्नानासाठी मी व पत्नी बाहेर पडलो. मी पुरुषांच्या स्नानगृहाकडे गेलो. तिथं पाहिलं तर सात-आठ पुरुष एका बाथटबमध्ये डुंबत होते; आणि

सात-आठ काठावर होते. मला कसंसच झालं. कारण त्या एकाही पुरुषाच्या अंगावर बोटभर चिंधी नव्हती! मी परत फिरलो. स्नान केलंच नाही. तेवढ्यात पत्नी परत आली. तिनं विचारलं, 'एवढ्या लवकर अंघोळ झाली?' मी म्हणालो, 'स्नान केलंच नाही.' ती म्हणाली, 'का?' मी तिला सांगितलं, ते तुला सांगण्या-सारखं नाही! तिचं पण स्नान झालेलं नव्हतं. म्हणून मी विचारलं, 'का ग, तुझं पण स्नान झालेलं दिसत नाही?' ती म्हणाली, 'कारण तुम्हाला सांगण्यासारखं नाही!!' हा किस्सा सांगून आमदारसाहेब म्हणाले, 'हे असं आपल्या धर्मात नाही. म्हणून मला हिंदू धर्माचा अभिमान वाटतो!!!' ...या शेवटच्या वाक्या-वर टाळ्यांचा कडकडाट झाला. कोणत्या लोकांकडून कशा टाळ्या मिळवाव्या हे शास्त्र आहे हे निश्चित.

परिषदेच्या पहिल्याच दिवशी दुपारी महिला संमेलन होतं. मी काही गेलो नव्हतो. पंढरपूरला आल्यापासून गावात भटकलोच नव्हतो. प्रदक्षिणा रोडवरून जरा पुढे जातो तोच संयुक्त समाजवादी पक्षाचा भलमोठा बोर्ड 'चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणाऱ्या गोळवळकर गुरुजीचा निषेध करा' गुरुजींमधल्या 'जी' वर आदरार्थी बहुवचनाचा अनुस्वारसुद्धा नाही! अर्थात यात काहीच अनपेक्षित नव्हते. तरीपण या लोकांना एकदा भेटण्याचा विचार केला. प्रदक्षिणा रोडवरून भटकत असताना एक मोठी गंमतीशीर गोष्ट आढळली. ती म्हणजे या परिषदेच्या निमित्ताने हिंदुमहासभेचा पक्षप्रचार! अक्षरशः दहादहा फुटावर प्रत्येक खांबा-वरती हिंदुमहासभेची पोस्टर्स होती, 'हिंदुमहासभा बलवान करा' 'हिंदुमहासभेचे सभासद व्हा' वगैरे. इतकी असंख्य पोस्टर्स लावली होती की पंढरपुरांत नव्याने शिरणाऱ्यास वाटावे की विश्वहिंदु परिषद हा हिंदुमहासभेचाच भाग आहे! वास्तविकतः विश्व हिंदुपरिषद ही संघाचीच सुधारित आवृत्ती. परमपूज्य (गोळवळकर) गुरुजी हे तिच्या संस्थापकांपैकी. हे मी माझे सांगत नाही. विश्व हिंदू परिषदेचे महामंत्री श्री. दादासाहेब आपटे यांनीच सांगितले की 'परमपूज्य गुरुजी हे परिषदेचे संस्थापक आहेत' चौंडे महाराजांच्या नातवांनी याचा ओझरता उल्लेख आपल्या भाषणात केला होता. पण दुसऱ्या दिवशी श्री. गुरुजींच्या समा-रोपाच्या भाषणापूर्वी श्री. दादासाहेब आपटे यांनी तसे स्पष्टच सांगितले! विश्व हिंदू परिषद ही संघ-जनसंघाचीच आहे असा विचार फक्त तुमच्या-माझ्याच मनात येतो असे नाही तर पंढरपूरच्या नावाड्यांच्यासुद्धा मनात येतो. चंद्रभागेतून नौकानयन करताना नावाड्याशी इतर गप्पागोष्टी करताकरता माझ्या मित्रानी त्याला प्रश्न टाकला, 'काय हो, इथे दोन दिवस काय चाललंय, त्याला आला होता की नाही?' त्यानं उत्तर दिलं, 'हे काय आपलं, जनसंघाचंच शिबिर हाये, बडवे, खेर वगैरे जनसंघाचीच मंडळी दिसतात. अन् आपल्याला काय, धंदा मस्त चालला की बरं, काय?' पंढरपूरातले दुकानदार, मंदीरातले बडवे मंडळी सुद्धा

उदासीनच दिसली परिषदेबाबत. बडव्यांपैकी एकतर म्हणाला, "ही 'तुमची' परिषद आली म्हणून दर्शनाच्या वेळासुद्धा बदलल्या ! !'

## मूळ धरण्यासाठी

विश्व हिंदू परिषदेला संघाचीच सुधारित आवृत्ती एवढ्याचसाठी म्हणालो की या परिषदेचे बहुजन समाजाजवळ जाण्याचे प्रयत्न संघापेक्षा जास्त आहेत. आणि यादृष्टीने पंढरपूर हे परिषदेचे ठिकाण निवडण्यात संयोजकांनी सूचकता दाखवली. यामुळे पंढरपुरातील मठाधिपती व संतसंकिर्तन करणारे सत्पुरुष यांना अधिक जवळ आणण्यात यश आले. ह. भ. प. तनपुरेमहाराज, ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर वगैरेसारख्या लोकांनी परिषदेच्या कार्यास वाटून घेण्याचे ठरविले आहे. त्यामुळे बहुसंख्य वारकरीसमाज की जो ८० ते ९० टक्के बहुजनसमाजातूनच येतो, त्याची सहानुभूती परिषदेस मिळेल. एका हॉटेलात चहा घेत बसलो होतो. समोर साधारण खेडवळ मराठा गृहस्थ बसले होते. छातीला परिषदेचा प्रतिनिधिचा बिल्ला होता. म्हणून कुतुहलाने विचारले, 'काय, कोणत्या गावचे ?'

'तालुका माळशिरस.'

'व्यवसाय ?'

'शेतकरी हाये मी, अन् खरं सांगू का ? मी काय तुमच्या संघाचा वगैरे नाहीय...!'

मला आश्चर्यच वाटलं म्हणून विचारलं.

'मग परिषदेला कसे काय आलात ?'

'आमच्या गावात फडक्यांनी सांगितलं. त्यांना माहिती होती की हा गृहस्थ हिंदूप्रेमी आहे म्हणून. म्हणाले एक डाव येऊन तर पहा !'

'मग कसं काय वाटलं तुम्हाला दोन दिवस परिषदेचं स्वरूप.'

'आता हे काय इचारनं झालं ? अहो, हिंदू म्हणून जलमलो अन्...'

माझी भाषाच खुंटली.

'मी फडक्यांना म्हणालोच होतो की तुम्ही देशपांडे, दातार, कुळकर्णी यांना बोलवूच नका, ते येत्यातच ! पर आमच्यावाणी बहुजनसमाजातला दर गाव दोन-तीन तरी पकडायला पाहिजेत. हे तुमचं लोन बहुजनसमाजात पसरल्याबिगर मूळ नाय धरनार !' अगदी सत्य परिस्थिती आहे ही. संपूर्ण समाज एकजिनसी होण्यासाठी हे आवश्यकच आहे.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी श्री. दत्ता बाळ यांचे भाषण अतिशय जोषपूर्ण व आक्रमक स्वरूपाचे झाले. हिंदू धर्माची, संस्कृतिचो थोरवी गाताना ते म्हणाले की, विज्ञानाच्या लाटेने विझून जायला हिंदू धर्म म्हणजे काही दीप नव्हे, तो सूर्य आहे. ही व अशीच विधाने करून त्यांनी हिंदू रक्ताला पालवण्याचा प्रयत्न केला. शेवटी तर ते म्हणाले की तुमच्या हिंदू धर्मावर आघात करणाऱ्या विज्ञान-

वाद्यांशी, नक्षलवाद्यांशी वेळ आलीच तर शस्त्रानेसुद्धा लढा!! हिंदूंनी आता कडवे बनायला हवे वगैरे वगैरे!

दुसऱ्या दिवशी एक फार महत्त्वाचा ठराव संमत झाला. तो म्हणजे अस्पृश्यता नष्ट करण्याचा. नागपूरच्या श्री. नानासाहेब देशपांडे यांनी तो मांडला व मुंबईच्या श्री. वरळीकरांनी त्यास अनुमोदन दिले. त्याचवेळेस महामंत्री श्री. दादासाहेब आपटे यांनी सांगितले की अस्पृश्यतेस सर्व धर्मगुरूंचा विरोध आहे! आणि त्याचवेळेस एस्. एस्. पी. च्या मोर्च्यात घोषणा होत्या, 'चार्तुर्वर्ण्याचा पुरस्कार करणाऱ्या धर्मगुरूंचा धिक्कार असो!!'

अर्थात परिषदेच्या ठरावातील शब्द 'मयसभेतील पाण्यासारखे' नसावेत अशी आमची अपेक्षा आहे!

समारोपाच्या भाषणात श्री. गुरूजींनी अहिंदू व भोगवादी लोकांपासून हिंदू धर्मावर होणाऱ्या आक्रमणाची दखल घेण्यासाठी संघटीत होणे आवश्यक असल्याचे सांगितले. शेवटी पसायदान होऊन परिषदेचे अधिवेशन समाप्त झाले.

या अधिवेशनात अगदी जाणवण्यासारखी गोष्ट म्हणजे बहुसंख्य प्रतिनिधी हे चाळीशीच्या पुढचे होते. १६ ते २५ या गटातील युवक फारच कमी होते व जे होते ते सर्व स्वयंसेवक संघातलेच होते. २५ ते ३५ या गटातील प्रौढही शाखेचेच होते. हे सर्व मी पुणे शहर केंद्रातील प्रतिनिधींच्या संदर्भात बोलत आहे व या केंद्रातील माझे काही स्वयंसेवक मित्र जेव्हा इतर केंद्रातील लोकांशी बोलत तेव्हा त्यांची ओळख संघातीलच असे! हे सर्व लिहिण्याचे कारण इतकेच की सामान्य हिंदू नागरिक या परिषदेस फारच कमी संख्येने उपस्थित होता. अर्थात फक्त संघातीलच लोक बहुसंख्येने उपस्थित होते यास माझा अजिबात आक्षेप नाही. कारण एका झेंड्याखाली येऊन कार्य करणे एवढाच विश्व हिंदू परिषदेच्या स्थापनेमागचा उद्देश आहे. तथापि सामान्य, शहरी हिंदू नागरिकही परिषदेस येऊन कार्यास कसा लागेल या दृष्टीने विचार व्हावा.

विश्व हिंदू परिषद दोन दिवस होती. या दोनही दिवशी पुणे शहर केंद्रावर व इतरत्र सायंशाखा भरवल्या गेल्या! कशासाठी? त्यामुळे 'विश्व हिंदू परिषद ही संघाचीच शाखा आहे व संघावर बंदी आली की ते या नावाखाली कार्य करणार आहेत' असा ठोकताळा एखाद्या सामान्य हिंदू नागरिकांनी मला ऐकवला तर त्यात चूक काय होईल?

विश्व हिंदू परिषद संघस्वयंसेवकांनी आयोजित केली म्हणून बिघडत नाही. पण बहुजनसमाजाला जवळ करण्याचे दृष्टीने संघ विचार व आचार परिषदेपासून सर्वार्थाने दूर ठेवले पाहिजेत. अन्यथा एखाद्या मोटारसायकलला जशी साईडकार असावी तसा प्रकार परिषदेच्या बाबतीत घडणे अशक्य नाही!

□ □ □

# स्वप्नांकित

अविनाश जोग

संध्याकाळ.

दररोज संध्याकाळ होते, पण ती संध्याकाळ त्याला फार महत्वाची वाटली.

एप्रिलचा उन्हाळा. सूर्य सहस्रकरणानी आग ओकीत होता. दुपारचे चार वाजत आले होते. वारा साफ पडला होता. सर्वत्र भकास, रूक्ष वाटत होते. पावसाळयात हिरवा शेला लेवलेल्या टेकडया आता आपले भकास उघडे रूप दाखवत होत्या.

त्या वाटेवर आधी झाडे मोजकीच – त्यात जी होती त्यांची पाने झडून गेलेली. नुसते झाडांचे सांगाडे दोन्ही ओळींना उभे होते.

सुभाषच्या अंगातून घामाच्या धारा लागल्या होत्या. तरीही तो चालतच होता. चकचकणारा डांबरी रस्ता सुस्त अजगरासारखा पडला होता.

बस–स्टॉप जवळ येत चालला.

स्टॉपवरच्या शेडमध्ये लांबून त्याला एक स्त्री दिसली. तिच्या अंगावरचे झुळझुळीत कापड लांबूनही लक्ष वेधवून घेत होते.

सुभाष आणखी जरा पुढे आला.

आणि तो थबकलाच. ती लाल साडी म्हणजे स्मिता कर्णिक होती.

स्मिता कर्णिक.

कॉलेज क्वीन स्मिता कर्णिक.

सुभाष शेडमध्ये आला.

स्टॉपवर फक्त दोघेच होते.

स्मिता आणि सुभाष.

हिच्याशी बोलावे काय? काय बोलावे? कुठे चाललात? उन फार आहे, नाही? पेपर कसे गेले? की, कुठे बाहेरगावी गेला नाहीत सुट्टीत? काय बोलावे?

सुभाष मनातल्या मनात शब्दांची जुळवाजुळव करू लागला.

# स्वप्नांचा राजा परत चालला आहे....



" एस्क्यूज मी, तुम्ही आमच्या कॉलेजातच असता ना ?" मधुर शब्दांची पखरण झाली,

" हं. अं...हो...हो, " सुभाष चाचरत बोलला.

ती हसली. मंदशी.

हसताना किती छान खळी पडते हिच्या गालाला !

" तुमचे नाव ?"

" मी...सुभाष खरे. "

" म्हणजे गतवर्षी व्हर्सिटी फर्स्ट आला होता, ते तुम्हीच ?"

" हो. मीच, " आता कुठे सुभाष स्थिर होत चालला होता.

बस आली.

दोघेही आत चढल.

तिने चटकन एक जागा पकडली. सुभाप दुसऱ्या रांगेकडे गेला.

" अहो, इकडे येता का ? जागा आहे. " आपल्या शेजारच्या रिकाम्या सीटकडे बोट दाखवीत ती म्हटली.

सुभाष तिच्या शेजारी बसला.

"इकडे कोठे ?" स्मिताने विचारले.

"मी सर्व्हीसला असतो, मर्क्युरी इंडस्ट्रिजमध्ये, "सुभाष म्हणाला.

"या वेळेला तिकडे ?"

"हो. पाच ते एक शिफ्ट आहे माझी !

"दररोज याच बसने जाता ?"

"हो."

"मग तुमची आमची दररोज भेट होणार म्हणायची."

बस वळताना ती किंचित त्याच्या अंगावर कलंडली. एक गोड संवेदना त्याच्या शरीरभर चमकून गेली.

तिचा स्टॉप येताच ती उतरली. 'बाय' आपला गोरा हात उंचावत तिने सुभाषला अभिवादन केले.

'बाय' सुभाष चाचरतच म्हणाला.

नंतर दररोज त्या ठराविक वेळेला बसच्या शेडमध्ये आणि नंतर बसमध्ये त्याला स्मिता कर्णिकशी बोलायची संधी मिळे. किती विशाल मनाची आहे स्मिता ! इतकी सुंदर दिसते, लाडीक हसते, मधुर बोलते.. आणि तरीही कशाची ऐट नाही. स्मिता रेखीव चेहऱ्याची आहे. झालंच तर...तिचे उन्नत उरोज, डौलदार चाल.

रात्रंदिवस हा एकच विचार सुभाषच्या डोक्यात भिरभिरू लागला. स्मिता स्मिता. स्मिताच्या कानातला डोलणारा लोलक. तिच्या छातीवर विसावणारे लॉकेटमधील विमान. तिच्या गालांना पडणारी खळी. डिट्टो शर्मिला.

पावसाळा सुरू झाला. सगळे वातावरण रंगरंगोटी केलल्या घराप्रमाणे उजळून दिसू लागले. पाऊस. सतत पाऊस. आज स्मिता गाठ पडली नाही नेहमीच्या वेळेला. जवळजवळ महिन्याचा दिनक्रम चुकला. स्मिता. स्मिता. सुभाष ज्या कारखान्यात कामाला होता तेथे एक कच्चे बांधकाम असलेले यंत्र कोसळते.


सुभाषचा हात मोडला आहे.

कंपनीने कॉम्पेन्सेशन दिले.

सुभाषला नोकरीवरून दूर करण्यात आलं.

विन हाताचा सुभाष—थोटका सुभाष. सुभाषची पर्सनॅलिटी मोडून पडली आहे.

सुभाष कॉटवर तळमळत पडला होता. मित्र येत होते, सहानुभूतीचे चार शब्द सांगत—भिकाऱ्यापुढे भाकरीचे तुकडे टाकावेत तसे—जात. सगळयांच्या सहानुभूतीचे केंद्र—सुभाष. विनहाताचा सुभाष. वेळ जाण्यासाठी म्हणून सुभाषने काही मासिके



# घडीघडीला जमते रंगत, कोका-कोलाची जर संगत

खेळ म्हणजे मौजच मौज! खेळाडूंच्या अंगात हौस आणि उत्साह कसे नाचत असतात. त्यात कोका-कोलाची भर...मग काय, दुधात साखर! कोका-कोलाचा स्वाद असा रुचकर नि उत्साहदायक असतो की, पुन्हा पुन्हा कोका-कोलाच प्यावासा वाटतो. जगभर कुठेहि पहा, केव्हाहि पहा, कोका-कोला पिणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. वाहवा! कोका-कोला, अशी लज्जत एरवी कुठून मिळणार!

Enjoy Coca-Cola

मागविली. स्मिताची आठवण येतेय. कोणीच आले नाही. वाड्यात आपल्या शेजारी रहाणारी रेखा, तीसुद्धा एकदा येऊन गेली, नंतर फिरकलीसुद्धा नाही.

मासिकातील स्त्रियांची आकर्षक चित्रे सुभाषची नजर खेचून घेऊ लागली.

भिरभिरते डोळे, गोरापान रंग, लांबसडक मृदु केशकलाप. सुभाष डोळ्यापुढे स्वप्ने पाहू लागला.

मासिकातील चित्रे, कॅलेंडरवरची चित्रे, सिनेमांची पोस्टर्स यामधील व्यक्ती सजीव झाल्या. सुभाषशी बोलू लागल्या. स्वप्नात.

एक अफाट दालन सुभाषपुढे पसरले आहे. दुनिया. स्वप्नांची दुनिया.

आकाशगंगेचा पूल, मंद सुगंधित वारे, पाचुची हिरवळ, चांदण्यांची झुंबरे, बरसणारा पारिजात.

मादक तरुणी. मदिरेची नशा.

सुभाषचे वाचन वाढू लागले. तो पूर्वीपेक्षा जास्त वाचू लागला. रहस्य, शृंगार, विनोद...

काल स्वप्नात अंतू बर्वा भेटला, पु. लं. चा. 'कुणाकुणाचा रे अण्णु गोगट्या झाला?' विचारत होता.

चिमणराव आणि गुंड्याभाऊंना पहाताच सुभाषला फारच हसू आलं.

एका भुयारात उतरून धनंजय आणि छोटू काहीतरी शोधत होते.

वसंतसेना पावसात भिजत उभी होती. अंगाला चिकटून बसलेले ओले कपडे तिचे लावण्य खुलवीत होते.

अख्खी दुनिया सुभाषच्या हातात आली आहे.

पुस्तक वाचायचे.

झोपल्याबरोबर पुस्तकातल्या व्यक्ती स्वप्नात आपली हजेरी लाऊ लागल्या.

स्मिता कर्णिक.

किती छान दिसते स्मिता.

सुभाषने तिला मिठीत घेतले. तिच्या लालचुटुक ओठावर ओठ ठेवले.

कॉलेजातील रश्मी देसाई, स्नेहलता पाटणकर, विद्या जोशी. स्वप्नांच्या भुयारात सुभाष उतरला होता. खोल. खोल जात होता. चांदण्या उचलत होता. एक आकर्षक दुनिया त्याच्यापुढे साकार झाली होती.

सुभाष. बिन हातांचा सुभाष. ज्याच्याकडे कोणी ढुंकुनही बघणार नाही असा सुभाष.

सुभाष. स्वप्नांचा राजा, आकाशगंगेवर इंद्रधनुष्याचा पूल बांधून पुलाच्या दोन्ही काठावर चांदण्यांचे दिवे बसवणारा सुभाष. पाचुच्या हिरवळीवर, कल्पवृक्षांच्या छायेत स्मिता कर्णिकबरोबर गुलगुल बोलणारा सुभाष. रश्मी, स्नेहलता, विद्या... स्वप्नील दुनियेत सुभाष पूर्णपणे रममाण झाला आहे.

दहा–बाय बाराच्या खोलीत अख्खे विश्व उभे करू पहात आहे.

सुभाष त्या लांबलचक ब्यूकमध्ये बसला. शेजारी स्मिता होती. सुभाषने गाडी चालू केली. समोर रस्ता पडला आहे, अजगरासारखा, सुस्त. सुभाषने अॅक्सिलेटर दाबला, गाडी आणखी वेगात पळू लागली. भिंगरीसारखी. रस्त्यावरची रहदारी चुकवीत सुभाष कुशलतेने गाडी चालवत होता.

स्मिता त्याच्या बाजूला सरकली. तिचा स्पर्श होताच सुभाष मोहरून गेला. सुभाष तिच्या बाजूला झुकला. तिच्या कानातला लोलक हेलकावे घेत होता. तिच्या ओठावर त्याचे ओठ आले. "सुभाष ... सुभाष, समोर बघ" स्मिता एकदम ओरडली.

समोरून एक अजस्र लॉरी येत होती. जणू मृत्यूच येत होता. लेलॅन्ड नावाचा.

मी...मी...सुभाष भांबावला.

एक क्षण–ती ब्यूक बाजूच्या दरीत कोसळली, लॉरी चुकवता चुकवता-चक्काचूर.

सुभाष निश्चेष्ट पडला आहे. त्याचे डोळे सताड उघडे आहेत, तो अजूनही स्वप्न पहात असावा. कॉटभोवती माणसे जमली आहेत. सर्वांच्या डोळयात पाणी आले आहे. खोली अधिकच भकास दिसते आहे. स्वप्नांचा राजा परत चालला आहे.

□ □ □



007 007 007 007 007

## जेम्स बॉण्डचा जनक

# इअॅन फ्लेमिंग

**प्र. ग. बापट**

---

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा भाग असलेले पण थोडे दूर वसलेले, ओशावा हे खेडे ओन्टॅरिओ सरोवराच्या काठी आहे. सर विल्यम स्टीफन्सन त्यांच्या शेतावरील प्रशस्त घरातील एका खोलीत एकटेच बसले होते. दार लोटून आत येणाऱ्या इअॅन फ्लेमिंगला [ Ian Fleming ] तेथील गंभीर वातावरण जाणवले. तो खुर्चीवर बसल्यावर सर स्टीफन्सननी शांतपणे सुरुवात केली–

टोरॅन्टो या जवळच्या शहरातील बकाल वस्तीतील एका उपाहारगृहात शत्रूचा हेर रहात आहे. जीना चढून जाताच समोर दिसणारी खोली त्याच्याकडे आहे. खोलीत टेबल, खुर्ची व एक विजेचा दिवा आहे. तो निःशस्त्र हेर अत्यंत महत्त्वाचा असून त्याचा ताबडतोब निकाल लावण्याचा आदेश आला असून ते काम आपल्याला आज लगेच करावयाचे आहे. एवढे त्यास सर स्टीफन्सनकडून कळले. त्यांनी दिलेले. ३८ रिव्हॉल्व्हर त्याने भरून सज्ज केले व तो उभा राहिला.

शत्रु निःशस्त्र आहे. तो कोण आहे हे आपणास माहीत नाही. दार उघडून, दारातूनच विजेच्या चपळाईने रिव्हॉल्व्हर काढून आपणास त्याचा वेध घ्यावयाचा आहे, हे त्यास जाणवले.

ठरल्याप्रमाणे तो जीना चढून वर आला. समोरच्या खोलीचे दार बंद होते. खिशातील रिव्हॉल्व्हरचा स्पर्श त्याच्या हातास जाणवत होता. पण दार उघडून इअॅन त्या हेराचा बळी घेऊ शकला नाही. बराच वेळ दारापाशी उभे राहून शेवटी दार न उघडताच तो परतला.

जेम्स बॉण्डच्या निर्मात्याच्या जीवनातील हा एक प्रसंग होय. पुढे सर स्टीफन्सन-

**रहस्यकथांच्या क्षेत्रात नवीन युग निर्माण करणारा जेम्स बाँड**
**चित्रपट-निर्मात्याला मुद्रांचा खणखणाट ऐकवणारा जेम्स बाँड**
**क्रौर्य आणि कामवासना**
**धाडस, धैर्य आणि अपार छळ**
**यांच्या अतिरेकी मिश्रणातून निर्माण झालेला जेम्स बाँड**
**ही एका क्षणाची निर्मिती नाही.**
**यासाठी त्याच्या जनकाने अक्षरशः रक्ताचे पाणी केले.**

**त्याचीच ही कथा...**

---

जवळ अपयशाची कबूली देताना इअॅन म्हणाला, ' मी दार उघडूच शकलो नाही. अशा प्रकारे मी माणसाचा वध करू शकत नाही. ' डोके थंड ठेवून, बेदरकारपणे कोणऱ्याही क्षणी गोळ्यांची बरसात करणाऱ्या; कधीही न पाहिलेल्या व्यक्तीला आज्ञेनुसार नष्ट करण्यात तत्पर, प्रवीण व यशस्वी अशा जेम्स बॉण्डचा जनक प्रत्यक्षात मात्र तसा नव्हता.

टोरॅन्टो शहरातील वरील प्रसंग, गुप्तहेराच्या प्रशिक्षणानंतर परीक्षेतील शेवटचा भाग होता. उमेदवाराला जणुकाय आपण खऱ्या कामगिरीवर जात आहोत असेच वाटावे, असे वातावरण निर्माण केले जायचे. त्याला दिलेले रिव्हॉल्व्हर व काडतुसे खरी असायची. त्याच्या प्रत्येक हालचालीवर नजर ठेवण्यास जागोजागी निरीक्षक असायचे. खोलीत खरोखरीच एक माणूस रिव्हॉल्व्हरच्या गोळीची वाट पहात असायचा. पाच यार्डांवरून निघालेली गोळी कशी चुकवावी हे असामान्य कसब त्यास अवगत होते.

इअॅन फ्लेमिंगच्या कादंबऱ्या वाचणाऱ्या वाचकांना त्यातील विस्मयकारी कल्पनाशक्ती मोहीत करते. जेम्स बॉण्ड व अन्य पात्रांचा नवीन नवीन प्रकारच्या क्रूर पद्धतीने छळ करणाऱ्या खलनायकाचा राग येतो. छळाची सविस्तर वर्णने वाचताना अंगावर काटा उभा राहतो. जेम्स बॉण्डच्या धाडसावर तरुण प्रेम करू लागतात. प्रत्येक कादंबरीत नवीन तरुणींच्या बरोबर प्रेम करणाऱ्या व शृंगारात आणि उपभोगात प्रवीण अशा जेम्स बॉण्डची स्त्रीविषयक अलिप्त वृत्ती त्यांस गोंधळात पाडते. स्त्रीस केवळ शय्या सोबत करणारी भोग्यवस्तू मानणाऱ्या जेम्स

बॉण्डच्या स्त्रीविषयक तत्त्वज्ञानाचे त्यांस आकलन होत नाही.

'कॅसिनो रॉयल'मध्ये जो जेम्स बॉण्ड दिसतो, तोच इअॅन फ्लेमिंगच्या शेवटच्या 'दि मॅन विथ दि गोल्डन गन'मध्ये दिसतो. प्रसंग वेगळे, कथानक वेगळे, पात्रे वेगळी (जेम्स बॉण्ड सोडून) पण साचा तोच. जेम्स बॉण्डच्या स्वभावात, वृत्तीत फरक नाही. जणू काय पूर्णपणे परिपक्व झालेल्या आम्रफलाची चव, आपण कधी कापून ठेवलेल्या फोडी खात, कधी रस पीत, कधी आंब्याची वडी खात, कधी वाळलेले साठे चाखीत, कधी फ्रिजमध्ये ठेवलेला रस चाखीत घेत आहोत. रस तोच, चव तीच; फक्त आकारात फरक. कधी बशीत, कधी वाटीत पण शेवटी आंबाच.

याचे रहस्य इअॅन फ्लेमिंगच्या जीवनात साठवले आहे. वयाच्या ४२ व्या वर्षी त्याने पहिली कादंबरी लिहिली. जीवनातील विविध अनुभव, स्पष्ट स्वरूपाचे निश्चित असे स्त्रीविषयक तत्त्वज्ञान हे त्याने स्वतः आचरणात आणले होते. जीवनातील यशापयश, निश्चित महत्वाकांक्षा यांनी त्याचे जीवन पूर्ण झाले होते. जणू काय त्याच्या जीवनाची विकास पावण्याची; नवीन वेगळे अनुभव घेण्याची अवस्था संपली होती. इअॅनजवळ प्रथमपासूनच अफाट कल्पनाशक्ती होती. तिच्या साहाय्याने तो त्याचे मानसिक व प्रत्यक्ष अनुभव; जेम्स बॉण्डच्याद्वारे वाचकांना सांगतो.

उत्तम हेराला लागणारा बेदरकारपणा इअॅनजवळ नव्हता. सर स्टीफन्सन यांच्या मते धैर्य, संकटाला तोंड देण्याची हिंमत व अन्य गुण असूनसुद्धा; निर्विकार, थंड, बेदरकारपणाच्या अभावामुळे इअॅन उत्तम गुप्त हेर बनू शकला नसता.

इअॅन हा प्रथमपासूनच व्यक्तिपूजक होता. मेजर व्हॅलेंटाईन फ्लेमिंगशिवाय लॉर्ड बीव्हरब्रुक, नोएल कोआर्ड, सॉमरसेट मॉम हे त्याचे आदर्श होते. आरमारातील नेव्हल इंटलिजन्समध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या काळात काम करीत असताना १९४१ साली त्यास संयुक्त संस्थानांत जाण्याचा योग आला. कामानिमित्त त्याने सर विल्यम स्टीफन्सन यांची भेट घेतली. त्या वेळेपासून सर स्टीफन्सन यांना त्याच्या आदर्श व्यक्तींमध्ये स्थान मिळाले. घातपाती चळवळी निर्माण करण्यात सर स्टीफन्सन यांचा हातखंडा होता. ओशावा या खेड्यातील त्यांचे निवासस्थान म्हणजे हेरगिरीच्या प्रशिक्षणाचे केंद्र होते. इअॅन तेथे प्रथम आला, तो निरीक्षक म्हणून. पण त्याने तेथील अभ्यासक्रमात अन्य उमेदवारांप्रमाणे भाग घेण्यास सुरुवात केली. समुद्राच्या अंतरंगातून पोहणे, पिस्तुलाची नेमबाजी, ज्युडो आणि इतर प्रकारांतही त्याने आपले कौशल्य दाखविले. शत्रुपक्षाला फसवून आपले कार्य साधण्याचेही कौशल्य त्याच्यापाशी होते.

टोरॅन्टो शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी काल्पनिक बाँब ठेवण्याचा कार्यक्रम हा हेरगिरीच्या परीक्षेतील एक भाग होता. इअॅन व व अन्य काहींचेकडे टोरॅन्टो पॉवर स्टेशनमध्ये बॉम्ब ठेवण्याची कामगिरी आली. इअॅनचे साथीदार अयशस्वी झाले. इअॅनने उत्तम पोशाख चढविला. पॉवर स्टेशनच्या मॅनेजिंग डायरेक्टरलाच सरळ फोन करून स्वतःची ओळख करून दिली. इंग्लंडमधील एक इंजिनिअर आपली भेट घेऊ इच्छितो हे ऐकून त्याने भेटीसाठी दुपारची वेळ दिली. पॉवर स्टेशनच्या कार्यालयात भेटीसाठी गेलेल्या इअॅनने आपले काम पूर्ण केले.

हेरगिरीच्या जीवनाचा एवढाच अनुभव त्याच्यापाशी नव्हता. दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमू लागले तेव्हा डायरेक्टर ऑफ नेव्हल इंटलिजन्स अॅट अॅडमिरॅल्टी या पदावर रिअर-अॅडमिरल जॉन गॉडफ्रे याची नेमणूक झाली. त्यांनी वैयक्तिक मदतनीस म्हणून इअॅन फ्लेमिंगची निवड केली. लेफ्टनंट इअॅन फ्लेमिंगने १९३९ ते १९४५ नाविक दलात कार्य केले. या सहा वर्षांच्या काळात त्यास गुप्तहेरखात्याचे काम जवळून पाहता आले. काही योजना त्याने स्वतः सुचविल्या. स्वतः त्याने नाविक दलांतर्गत गुप्तहेरांची एक संघटना उभारली. त्यांचे मार्गदर्शन केले. गुप्त-हेराचे प्रशिक्षण कसे असावे ते ठरविले. थोडक्यात; जेम्स बॉण्डचा जन्म केवळ कल्पनाशक्तीच्या जोरावर झाला नाही. इअॅनचा सहा वर्षांचा अनुभवही जमेस धरणे आवश्यक आहे.

इअॅन फ्लेमिंगच्या मनात लहानपणापासून महान यश संपादन करण्याची इच्छा होती. महत्त्वाकांक्षा हा आजोबांचा गुण त्याच्यातही होता. पण विद्यार्थिदशेतील अपयशामुळे त्याचे व्यक्तीमत्त्व कौमार्यावस्थेतच गुंतागुंतीचे बनले.

रॉबर्ट फ्लेमिंग हा स्वकर्तृत्वावर लक्षाधीश बनला होता. आपल्या नेटलबेड या मूळ गावी त्याने जॉईस ग्रीव्ह या नावाचे प्रासादतुल्य निवासस्थान बांधले. या रॉबर्ट फ्लेमिंगचा इअॅन हा नातू होय. व्हॅलेंटाईन फ्लेमिंग या रॉबर्टच्या मुलाने वडिलां-पासून घराण्याबद्दल प्रेम, खेडयांतील सन्मान्य नागरिकांना मान्य अशा खेळाबद्दल आवड व शारीरिक सुदृढता प्राप्त केली होती. स्वकर्तव्याबद्दलची त्यांची निष्ठा ही विशेष गोष्ट होती. वडिलांप्रमाणे व्हॅलेंटाईन महत्त्वाकांक्षी नव्हते तरीही वडिलां-प्रमाणेच त्यांचे जीवन यशस्वी होते. इ. स. १९०६ मध्ये त्यांचा इव्हलिन या सुंदर व देखण्या मुलीशी विवाह झाला.

२८ मे १९०८ मध्ये सौ. व्हॅलेंटाईन यांनी दुसऱ्या मुलाला जन्म दिला. पुढे इअॅन लॅकेस्टर फ्लेमिंग हे त्याचे नामाभिधान झाले. इ. स. १९१० मध्ये व्हॅलेंटाईन फ्लेमिंग टोरीपक्षातर्फे पार्लमेंटच्या लोकसभेत निवडून आले. पार्लमेन्टचे सभा-सदत्व त्यांच्या कर्तव्यनिष्ठेआड आले नाही. इ. स. १९१४ मध्ये मेजर व्हॅलेंटाईन फ्लेमिंग युद्धावर गेले. इ. स. १९१७ मध्ये त्यांना फ्रान्सच्या रणभूमीवर वीरगती प्राप्त झाली. विन्स्टन चर्चिल यांनी मेजर व्हॅलेंटाईन फ्लेमिंग यांच्या मृत्यूनंतर,

त्यांच्या कार्याचा गौरव करणारा जो लेख 'टाईम्स' मध्ये लिहिला त्याचे कात्रण, इअॅनच्या झोपण्याच्या खोलीत मोठेपणीही लावलेले असे. इअॅनचे वडिलांवरील प्रेम व आदर यावरून स्पष्ट होते.

इअॅनला देवाने पुरुषी देखणेपणा व सौंदर्य याबरोबर शारीरिक शक्ती बहाल केली होती. त्याचे बालपण इप्सडेन येथील घरात मोठा भाऊ पीटर व धाकटे भाऊ रिचर्ड व मायकेल यांच्या सान्निध्यात गेले. मुळातच इअॅन सुदृढ व भरदार शरीरयष्टीचा पण स्वभावतः खोडकर होता. त्याची आवड व घरातील वातावरण परस्परविरोधी होते. कुटुंबातील सर्वांनी एकत्र येणे–विशेषकरून ख्रिसमसमध्ये राजकारणाची चवीने चर्चा, संगीताची आवड, जेथे वाढलो त्या भूमीबद्दल आत्मीयता इत्यादी ज्या ज्या गोष्टींबद्दल घरातील अन्य जनास प्रेम होते, त्या काळातील उच्चभ्रू लोकांच्याबद्दल त्यास नैसर्गिक नावड होती. त्यातच त्याच्यावर विशेष प्रेम असणाऱ्या त्याच्या आदर्श पित्याचा मृत्यू झाला.

मेजर फ्लेमिंग युद्धावर असल्याने मुलांच्या संगोपनाची व शिक्षणाची जबाबदारी इअॅनच्या आईवर पडली. श्रीमंत, निश्चयी व कर्तबगार आईने ती जबाबदारी योग्य अशा गंभीरतेने स्वीकारली. तिने त्यांच्यासाठी शाळेची अत्यंत काळजीपूर्वक, निवड केली. डर्नफोर्ड येथील शाळेमध्ये ८ वर्षांच्या पीटरचे व ७ वर्षांच्या इअॅनचे नाव दाखल करण्यात आले.

टॉम पेलेट या शिक्षकाचा इअॅन आवडता होता. उत्तम खेळाडू, देखणा, विनोदी इअॅन सर्वांना प्रिय होता. पण त्याच्याबरोबर असलेला त्याचा मोठा भाऊ अंगच्या गुणांमुळे हुशार व श्रेष्ठ मानला जाऊ लागला. इअॅनचे मन शेवटपर्यंत या शाळेत रमले नाही. डर्नफोर्ड येथे त्याचा अलिप्त स्वभाव स्थिर झाला. मनमोकळेपणाने न बोलणे, जास्त जवळीक दाखविणाऱ्याशी अतिसावधपणे वागणे हे स्वभावविशेष येथे निर्माण झाले व शेवटपर्यंत टिकले. अनिश्चितता व उद्विग्नता यांचीही निर्मिती येथेच झाली.

डर्नफोर्ड येथे असतानाच 'सॅपर'चे 'बुलडॉग ड्रुमॅण्ड' त्याच्या वाचनात आले. हा जेम्स बॉण्डचा वैचारिक जनक असे फ्लेमिंगच मानतो. याशिवाय सॅक्स रोहमर, बुकन, पो व स्टीव्हन्सन या लेखकांची मिळतील ती सर्व पुस्तके त्याने वाचली.

वयाच्या तेराव्या वर्षी १९२१ मध्ये इअॅन इटन येथे शिकायला गेला. इटन येथील पाच वर्षांच्या काळात त्याचे व हाऊस मास्टर स्लेटर यांचे सूत जमले नाही. पीटर व इअॅन यांच्या वयातील अंतर फार कमी होते. इटन येथे पीटर सर्व बक्षिसे मिळवीत, प्रशंसेस प्राप्त होत असतानाच, त्याच्याबरोबर असणारा त्याचा भाऊ इअॅन स्पर्धेत कुठेच टिकत नसे. रिचर्ड व मायकेल हेही पुढे मोठ्या भावाचे स्थान पटकावू शकले नाहीत. पण पीटरशी तुलना होऊन कमी ठरण्याच्या दुर्दैवात सापडला तो इअॅन.

वयात कमी अंतर असणाऱ्या इतर भावांप्रमाणेच हे दोन भाऊ एकमेकांशी स्पर्धा करावयाचे. पण त्यामुळे त्यांच्या प्रेमात अंतर पडले नाही. वडिलांच्या मृत्यूनंतर या दोन भावांच्या संबंधात नकळत नाजुक असा बदल झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर, त्यांची जागा घेणाऱ्या पीटरला इॲन आदर्श मानू लागला. ज्याला आपण मान देतो, ज्यावर आपले प्रेम आहे, जो घराचा प्रमुख आहे, त्यालाच प्रतिस्पर्धी मानून त्याच्याशी स्पर्धा करण्याची विचित्र परिस्थिती इॲनसमोर इटन येथे निर्माण झाली. या मानसिक संघर्षाला समजण्याचे इॲनचे वय नव्हते.

या संघर्षातून स्वतःची सुटका करण्याचा एकमेव मार्ग इॲनच्या बालमनाला दिसला. तो म्हणजे स्पर्धा न करणे. पीटरशी स्पर्धा न करणे म्हणजे ज्या क्षेत्रात पीटरला गती आहे त्यातून परावृत्त होणे. प्रगतीसाठी आवश्यक असलेली स्पर्धेची भावना नष्ट झाल्यावर अभ्यास करण्याचे, त्यासाठी कष्ट घेण्याचे त्याने सोडून दिले. यश मिळविण्याची महत्वाकांक्षा तो सोडू शकला नाही. श्रेष्ठ ठरल्यामुळे काय होते ? तो लोकांच्या चर्चेचा विषय होतो. लोक व बरोबरचे विद्यार्थी त्यास विसरू शकत नाहीत.

यशस्वी होण्याचा सोपा पण फसवा मार्ग अन्य कुमारांप्रमाणे त्याने शोधला. निसर्गाने बहाल केलेल्या सौंदर्याची व शरीरयष्टीची तो विशेष काळजी घेई. थोडासा नटवा, नखरेल, अक्कडबाज, विक्षिप्त या वैशिष्टयांबरोबरच कटू वाक्ताडन, विनोदी बुद्धी व आपल्याच विश्वात रममाण होणाऱ्या इॲनला त्यामुळे त्याचे सोबती कधीच विसरू शकले नाहीत. वयाच्या मानाने लवकर शारीरिक वाढ झालेल्या इॲनला मैदानी खेळात पीटर हरवू शकला नसता. इटन येथे इॲन उत्तम खेळाडू म्हणून गाजला व दोन वर्षे तर तो चॅम्पियन ठरला.

वयाच्या मानाने शारीरिक वाढ जास्त असलेला इॲन उत्तम खेळाडू म्हणून गाजला. या शारीरिक वाढीमुळे किंवा नैसर्गिक कलामुळे कारण कोणतेही असो पण मुलींचे आकर्षण त्याला जास्त होते.

या सर्व गोष्टींचा अपरिहार्य परिणाम म्हणजे अभ्यासाकडे दुर्लक्ष. शेवटच्या वर्षातील असमाधानकारक प्रगती पाहून आईने त्यास उच्च शिक्षणाकडे न पाठविता लष्करात पाठविण्याचे ठरविले.

शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी एक सत्र आधी तो कर्नल ट्रिव्हॉर यांच्या वर्गात दाखल झाला. लष्करी अधिकारी तयार करणाऱ्या सँढर्स्टच्या प्रवेशपरीक्षेची पूर्वतयारी या वर्गात करून घेतली जात असे. त्या काळात उच्च शिक्षणास अपात्र अशा मंदबुद्धीच्या मुलांसाठीच लष्करी शिक्षणाची निवड केली जात असे. अवखळ व वाया गेलेले पोर म्हणून घरात मान्यता मिळविण्यात किंवा स्पर्धेतून नेहमीसाठी अंग काढून घेण्याचा मार्ग यापैकी कोणतेही कारण असो, पण इॲनला यात समाधान वाटले असावे. कर्नल ट्रिव्हॉर यांच्या मते उत्तम सैनिक होण्यास लायक असे गुण

इअॅनमध्ये होते. पण त्यांच्याच मते-स्त्रियांपासून त्यास धोका होता. लष्करी शिक्षणाची त्याने मनापासून तयारी केली. सँढर्स्टच्या प्रवेशपरीक्षेत तो सहाव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. उच्च शिक्षणातील अपयश धुवून निघण्याची शक्यता त्यामुळे निर्माण झाली.

पण सँढर्स्टच्या कडक शिस्तीत त्याचे बंडखोर मन रमले नाही. मन मारून परिस्थितीशी जमवून घेण्याचा प्रयत्न प्रथम त्याने केला. पण पुढे तो प्रयत्नही त्याने सोडून दिला. त्यात कॅम्बर्ले येथील एक मुलगी त्यास आवडली. लंडनहून येणारा इअॅन, भिंत चढून कॉलेजच्या आवारात येताना सापडला. सहा महिन्याकरिता त्याच्या सर्व सवलती रद्द झाल्या. लष्करात राहावयाचे नाही असेच त्याने जणू काय ठरविले. मेजर लॉर्ड एल्विन यांनी दिलेल्या प्रगतिपुस्तकावरील शेऱ्यांकडे त्याने दुर्लक्ष केले. पण आई! मुलाच्या भवितव्याची काळजी करणाऱ्या आईने, सुट्टीचा काळ इअॅनने ऑस्ट्रियातील किटझ बुहेल येथे घालवावा असे ठरविले.

फॉरब्स डेनिस हे अपत्यहीन पण आदर्शवादी जोडपे तेथे राहत होते. टेनरहॉफ ही त्यांची संस्था. त्यांनी शैक्षणिक प्रयोगशाळा अधिक सामुदायिक जीवनाचे पाठ देणारी संस्था म्हणून स्थापन केली होती. तरुणांबद्दल गतिमान व प्रगत अशी सहानुभूती त्यांच्याजवळ होती. मानसशास्त्र व शैक्षणिक सिद्धान्त किती मोठ्या प्रमाणात राष्ट्रातील दोष व त्रुटी दूर करू शकतात हे पाहण्याची तीव्र लालसा त्यांच्या हृदयात होती. श्री. डेनिस यांचे अनेक भाषांवर प्रभुत्व होते. उच्चकुलोत्पन्न व संपन्न कुटुंबांतील ज्या मुलांना व्यापार, उच्च शिक्षण किंवा परराष्ट्रखात्यात नोकरी करावयाची आहे, असेच होतकरू विद्यार्थी त्यांच्याकडे जर्मन भाषा शिकावयास येत.



श्री. डेनिस यांची रेल्वे स्थानकावर १९२६ मध्ये इअॅनशी पहिली भेट झाली. त्यांच्या मते देखण्या, सुदृढ, व्यक्तीवादी, उद्धट व काटेरी स्वभावाच्या इअॅनच्या मनात खरोखरी काय आहे ते समजणे कठीण होते. त्याचा भूतकाळही त्यांच्या डोळ्यासमोर होता. शिकण्यासाठी कष्ट घेण्याची त्याच्या मनाची तयारी नव्हती याचीही त्यांना जाणीव होती.

तरीपण डेनिस दंपतीने भूतकाळाची कोणतीही कृष्णछाया त्याच्यावर पडू न देता, त्यास समाजाभिमुख केले. त्यांनी त्याच्यासमोर ध्येय ठेवले व आवश्यक ते प्रोत्साहन दिले. इअॅनहि त्या दोघांचे व फिलीस बॉटमचे ऋण मान्य करतो. प्रथम त्यास त्रास जरूर झाला. पण अभ्यासाची सवय लागली. परराष्ट्रखात्याची प्रवेश परीक्षा हे ध्येय, त्याचे दोष लक्षात घेता फारच मोठे होते. पण इअॅनसारख्या महत्त्वाकांक्षी तरुणासाठी असेच उच्च ध्येय आवश्यक होते. भाषेची आवड व त्यात गती त्यास अनुवांशिकरीत्या प्राप्त झाली होती. श्री. डेनिस यांच्या मार्गदर्शनाने त्याने जर्मन, फ्रेंच, रशियन या भाषावर प्रभुत्व संपादिले. शेक्सपियर टेनिसन, स्विफ्ट व पोप हे इंग्रज ग्रंथकार त्याने वाचले. सिमेनॉन हा गुप्तहेर कथालेखक त्या वेळी त्याचा आवडता होता. अभ्यासाची गती जसजशी वाढली तसतसे त्याचे मन त्यात रमू लागले. सामाजिक इतिहास, मानववंशशास्त्र व तांत्रिक ज्ञान यांचा इतिहास या विषयांचा अंतर्भाव त्याच्या अभ्यासक्रमात झाला. श्री. डेनिस यांनी त्यास कामाची व कष्टाची आवड लावली व त्यांच्या पत्नीने लिहिण्याची.

तरुणींसंबंधीचे आकर्षण त्यास याही काळात होतेच. अभ्यासाचे विश्व व विषयवासनेचे विश्व यांना वेगळे ठेवण्याचे व परस्पर परिणामी होऊ न देण्याची काळजी त्याने घेतली. शेवटपर्यंत त्याची ही दोन विश्वे अलगच राहिली. जेम्स बॉण्डच्या जीवनात ती जशी वेगळी होती तशीच. श्री. डेनिस यांच्या सल्यानुसार तो म्युनिच व जिनिव्हा येथे त्या त्या विद्यापीठांचा बहिःशाल विद्यार्थी म्हणून काही काळ राहिला. परराष्ट्र खात्याच्या स्पर्धा परीक्षेची तयारी तो आत्मविश्वासाने व नेटाने करीत होता.

श्री. डेनिस यांच्या मते इअॅनचा आत्मविश्वास त्यास परत प्राप्त झाला होता. विकासाच्या अत्यंत कठीण अशा–१९ व्या–वर्षाच्या अवस्थेतून जाणाऱ्या इअॅनजवळ आता शारीरिक व बौद्धिक समज होती. पण मानसिक शिस्त व जीवनासाठी आवश्यक असे निश्चित तत्त्वज्ञान अजून त्याच्यापाशी नव्हते. म्हणूनच त्याच्या जीवनास स्थैर्य व निश्चित दिशा नव्हती. कामात मन रमे, पण त्यास अजून कामात आनंद प्राप्त होत नव्हता. शाळेतील मुलांना वरिष्ठांबद्दल जी भीती असते, त्याच्या बाहेर तो अजून आला नव्हता. अशा भीतीचे अपत्य म्हणजे मानसिक खोटेपणा. तोही त्याच्या जवळ होता. निश्चित अशा ध्येयासाठी स्वतःच्या मानसिक ऊर्मींना दुय्यम स्थान देण्यास तो शिकला नव्हता.

वयाच्या १९ व्या वर्षी जीवन जगण्यास लायक असा आपला मुलगा बनावा म्हणून जाणीवपूर्वक कार्य करणारी; मुलाची काळजी घेणारी संपन्न आई व डेनिस दांपत्यासारखे गुरू लाभणे या दोन गोष्टीत इअॅनच्या भाग्याचा हेवा कोणा तरुणास वाटणार नाही ? पण दुर्दैवाने त्याची पाठ सोडली नव्हती.

अनेक मैत्रिणींच्या सहवासात रममाण होणाऱ्या पण प्रेमभावनेपासून कटाक्षाने अलिप्त राहणाऱ्या इअॅनच्या हृदयाच्या तावा जिनिव्हा येथील एका तरुणीने घेतला. लग्नाची वचने दिली व घेतली गेली. तो वाट पाहत होता आपल्या पायावर खंबीरपणे उभे राहण्याच्या क्षणाची. परराष्ट्र खात्यात निवड होताच, त्याचे आईवरील परावलंबी जीवन संपणार होते. समाजात मान्यता प्राप्त अशी नोकरी मिळणार होती. आपल्या हृदयेश्वरीबरोबर विवाह करून चारचौघांसारखे प्रतिष्ठित जीवन तो जगू लागणार होता. पण नियतीच्या मनात त्यास जेम्स बॉण्डचा जनक बनवायचे होते. ६२ उमेदवार परीक्षेस बसले. दोघांची किंवा तिघांचीच निवड होणार होती. कारण तेवढयाच जागा होत्या. स्पर्धा परीक्षेत त्याचा पंचवीसावा क्रमांक आला.

इ. स. १९३१ मधील या अपयशाने त्याचा आत्मविश्वास ढासळला. आईच्या छत्राखाली राहण्याचा पुन्हा प्रसंग आला. स्वतंत्रतेचे स्वप्न विरले. आईच्या विरोधामुळे व नकारामुळे पहिल्या वहिल्या नाजूक प्रेमभावनेची कळी कोमेजली. आपली प्रेमभंगाची निराशा व्यक्त करताना इअॅन मित्राला कडवडपणे म्हणतो, " I am going to be quite bloody minded about women from now on. I am just going to take what I want without any scruples at all. "

नोकरीच्या शोधात असणाऱ्या इअॅनला पुन्हा आईनेच मदत केली. रायटर वृत्तसंस्थेचे चालक सर रॉडरिक जोन्स यांना दिमाखदार, उत्साही व सुसंस्कृत अशा तरुणांची गरज होती. आईच्या वशिल्याने तो तेथे पोहोचला. आपल्याला आवश्यक अशा गुणांनीयुक्त असे प्रभावी व्यक्तिमत्त्व पाहून सर रॉडरिक जोन्स यांनी इअॅनची नेमणूक सहा महिन्यासाठी, वर्षाला ३०० पौंड, या पगारावर केली. १९३३ पर्यंत इअॅन वृत्तसंस्थेच्या कार्यालयात उपसंपादकाचे जे काम, तेच करीत होता. अंगची तडफ, हुशारी व कर्तृत्व दाखविण्याची संधी त्यास १९३३ मध्ये मिळाली. ' मेट्रोपॉलटिन–व्हिकर्स इलेक्ट्रिकल्स ' या कंपनीच्या सहा ब्रिटीश इंजिनियर्सना साम्यवादी रशियात हेरगिरीच्या आरोपावरून अटक झाली. मास्को येथे खुल्या न्यायालयात त्यांच्यावर खटला भरण्यात आला. साम्यवादी रशियात, परकीय नागरिकावरील खटल्याचे कामकाज पाहण्याची ही पहिली संधी अन्य देशांना होती. ब्रिटिश लोकमताचा क्षोभ शिगेला पोहोचला होता. जगातील सर्व प्रमुख वृत्तपत्रसंस्थांनी आपापले खास प्रतिनिधी त्यासाठी पाठविले होते. रायटरतर्फे

इअनची खास वार्ताहिर म्हणून नेमणूक झाली. मॉस्को खटल्यानंतर अन्य संस्थांच्या वार्ताहिरांनी रायटर प्रमुखाला तार करून त्यांच्या नवोदित वार्ताहिराचे कौतुक केले. इअॅनच्या कामगिरीची यशस्वीता यावरून स्पष्ट होते.

संपत्ती मिळविण्याच्या उद्देशाने त्याने वृत्तपत्र व्यवसायास रामराम ठोकला. तो प्रथम व्यापारी अधिकोषात शिरला व नंतर तो स्टॉक ब्रोकरच्या व्यवसायाकडे वळला. पण १९३३ ते १९३९ या सहा वर्षांच्या काळात त्याची श्रीमंत होण्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली नाही.

पण या व्यवसायामुळे त्यास दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आरमारात एक महत्त्वपूर्ण जागा मिळाली. सर रेजिनॉल्ड हॉल, भूतपूर्व डायरेक्टर ऑफ नेव्हल इंटलीजन्स, यांच्या मते वैयक्तिक मदतनीस म्हणून आरामारातील अधिकाऱ्यापेक्षा, उत्साही, स्वयंस्फूर्तीने काम करणारे पण बाहेरचे तरुण जास्त उपयोगी पडतात. स्टॉक ब्रोकर व्यवसायातील लोकांचे मित्रमंडळ मोठे व विविध क्षेत्रातील असते. विविध व भिन्न प्रवृत्तीच्या माणसांशी जमवून घेण्याचे कौशल्य त्यांच्या अंगी असते. त्यांनी स्टॉक ब्रोकरचीच निवड केली होती. रिअर-अॅडमिरल जॉन गॉडफ्रे, डायरेक्टर ऑफ नेव्हल इंटलिजन्स यांनी जेव्हा सर रेजिनॉल्ड हॉल यांचा सल्ला घेतला तेव्हा साहजिकच जॉन गॉडफ्रे यांनी स्टॉक ब्रोकरचीच निवड करावी असे त्यांनी सुचविले. वैयक्तिक सल्लागार या पदासाठी नाव सुचवावे अशी विनंती जॉन गॉडफ्रे यांना केली. 'बँक ऑफ इंग्लंड'च्या अध्यक्षांनी इअॅन फ्लेमिंगचे नाव सुचविले. त्यांची व इअॅनची प्रत्यक्ष ओळख नव्हती. पण इअॅनचे मित्रमंडळ मोठे होते. रोवे अॅन्ड पिटमन या फर्ममध्ये इअॅन होता. त्यामुळे दुय्यम डायरेक्टर ऑफ नेव्हल इंटलिजन्स त्यास ओळखत होते. ह्या फर्मचा एक भागीदार ह्युगो पिटमन शहरातील मान्यवर व्यक्ती व इअॅनचा दोस्त होता. जॉन गॉडफ्रे यांनी दुसरा सल्ला बारिंग बंधूंचा घेतला. रॉबर्ट फ्लेमिंगच्या फर्मशी बारिंग बंधूंचे जुने संबंध होते. पहिल्या महायुद्धाच्या वेळचे वैयक्तिक मदनीस सर क्लॉ सेरकोल्ड (Sir Claude Serocold) फ्लेमिंग घराण्यास अनेक वर्षांपासून ओळखत होते. एकतीस वर्षांच्या इअॅन फ्लेमिंगचे व्यक्तिमत्त्व, दोन भेटीत गॉडफ्रे यांना मान्य झाले.

खोली क्र. ३९ मध्ये युद्धकाळात लेफ्टनंट फ्लेमिंगचे कार्यालय होते. युद्धाच्या शेवटच्या वर्षी इअॅनने पुढील जीवनाचा विचार करण्यास सुरुवात केली. इंग्लंड सोडून, एखाद्या रम्य ठिकाणी राहावे या विचारात असताना १९४४ मध्ये जमेका येथे तो गेला. तेथील निसर्ग व वातावरण याने तो मोहित झाला. त्याने तेथे एक घर विकत घेतले. घर व आजूबाजूच्या जमिनीला त्याच्या मनासारखे रूप त्याने दिले.

गोल्डन आय (Goldeneye) या जमेका येथील घरात तो पुढे दरवर्षी दोन महिन्यांची सुट्टी घालवी. पुढे या दोन महिन्याच्या सुट्टीचे कालात गोल्डन आय

येथेच त्याने जेम्स बॉण्डवरील बहुतेक सर्व कादंबऱ्या लिहिल्या.

१९४५ मध्ये नाविकदलातील नोकरी संपली. या काळात पुस्तके लिहिण्यापासून तर पुन्हा स्टॉक ब्रोकर बनण्यापर्यंत अनेक विचार त्याया डोक्यात घोळत होते.

पण परत तो वृत्तपत्र व्यवसायातच शिरला. लॉर्ड केम्सले यांची अनेक साखळी वृत्तपत्रे होती. परराष्ट्रीय बातम्या मिळविणे, त्यांचे संकलन करणे व या वृत्तपत्रांना पुरविणे यासाठी 'फॉरेन न्यूज सर्व्हिस' नावाची संघटना इअॅनने स्थिर करावी व त्याचे काम पहावे म्हणून मॅनेजर या पदावर त्याची नियुक्ती करण्यात आली. वर्षाला ५००० पौंड पगार, अधिक खर्च व दोन महिने वर्षाला पगारी सुट्टी या अटींवर तो कामावर रुजू झाला.

पुन्हा एकदा रशियास जाण्याची त्यास संधी मिळाली. वृत्तपत्र व्यवसायात असतानाच त्याने जेम्स बॉण्डला निर्माण केले. वृत्तपत्रासाठी म्हणून बाहेर जाण्याच्या प्रत्येक संधीचा त्याने फायदा घेतला. त्याने ज्या ज्या शहरांना भेटी दिल्या, ज्या ज्या व्यक्ती त्याला आवडल्या, त्यांचा त्याने आपल्या कादंबऱ्यात अप्रत्यक्षपणे उपयोग केला. गोल्डन आय येथे लिहिलेले हस्तलिखित तो पुन्हा पुन्हा वाची व किरकोळ चुकही राहू नये याची काळजी घेई. त्याचा आवडता गोल्फ खेळही त्याच्या एका कादंबरीत विस्ताराने त्याने आणला.

भूमिगत चळवळ करणाऱ्या नेत्याप्रमाणे, चळवळीच्या अगोदर अनेक वर्षे, पुढे उपयोगी पडणाऱ्या लोकांशी प्रयत्नपूर्वक संपर्क ठेवण्याचे तंत्र इअॅनने आत्मसात केले होते. वृत्तपत्रसृष्टी, बुद्धिवानांचे वर्तुळ, वाङ्मयसेवक व परराष्ट्रीय खाते यामध्ये त्याची ओळख होती. स्टॉक ब्रोकर असताना ओळखी वाढत होत्या व इअॅन त्या प्रयत्नपूर्वक टिकवीत होता. १९४८ पासून त्याने प्रयत्नपूर्वक वाङ्मयीन क्षेत्रातील व्यक्तींची ओळख वाढविली.

सिरील कॉनोली (Cyril Connolly); विल्यम पॉमर, (William Polmer) पॉपस्की (Popski); पॉल गॅलिको (Paul Gallico); डेम इडिथ सिटवेल (Dama Edith Sitwell); सॉमरसेट मॉम या लेखक लेखिकांप्रमाणे जोनॅथन केप (Jonathan Cape) हा प्रकाशकही त्याच्या मित्रमंळापैकी होता.

जमेका येथे वयाच्या ४२ व्या वर्षी लेखक व गृहस्थाश्रमी इअॅनचा जन्म झाला. ३ जानेवारी ५२ ते १८ मार्च ५२ या काळात त्याने त्याचे पहिले पुस्तक 'कॅसिनो रॉयल' पूर्ण केले. २४ मार्च १९५२ मध्ये लेडी रोदर मिअरशी त्याचा विवाह झाला. 'लीव्ह अॅन्ड लेट देम डाय,' 'मूनरॅकर,' 'डायमंडस आर फॉर एव्हर,' 'फ्रॉम रशिया विथ लव्ह,' 'गोल्डफिंगर' आणि 'थंडरबॉल' अशा जेम्स बॉण्डवरील कादंबऱ्या त्याने पुढे लिहिल्या. जेम्स बॉण्ड नायक असलेल्या कथानकावर चित्रपट काढण्याचा प्रथम प्रयत्न याच काळात त्याने केला. पण पुढे तो सोडून

दिला. 'कॅसिनो रॉयल' या पहिल्या पुस्तकापासूनच, त्याच्या कादंबऱ्यांचा खप चांगला होता. वृत्तपत्रांतून उत्तम अभिप्राय आले. मॉमसारख्या लेखकांनी त्याचे कौतुक केले. पण अतिभव्य यशाचे व लक्षाधीश बनण्याचे जे स्वप्न तो पाहत होता ते त्याच्यापासून दूरच राहिले. १९५५ मध्ये जेम्स बॉण्डला इअॅनच्या मते अमेरिकेतील प्रकाशकांनी व वाचकांनी जरा दूरच ठेवले होते.

तारुण्यातील अतिरेक, रोजच्या सत्तर सिगारेटस् व जिनची पाव बाटली संपविणाऱ्या इअॅनच्या सुदृढ शरीरानेही किती साथ घ्यावयाची? १९४६ मध्ये त्याची प्रकृती प्रथम ढासळली; जणू काय शरीरसामर्थ्याने दिलेला हा पहिला इशारा होता. कष्ट, व्यसन, किंवा ताण यापैकी कशाचाही अतिरेक आता शरीराला नको होता. यशामागे लागलेल्या इअॅनने त्याकडे लक्ष दिले, पण पुरेसे व आवश्यक तेवढे ते नव्हते. तरीही त्याने १९६१ साली आयुष्यातील अत्यंत यश व अत्यंत संकटे अनुभविली.

राष्ट्राध्यक्ष केनेडी यांच्या वाचनाच्या आवडीवर 'लाईफ'मध्ये एक लेख आला. राष्ट्राध्यक्षांच्या दहा आवडत्या पुस्तकांत 'फ्रॉम रशिया विथ लव्ह'चा नामनिर्देश होता. इअॅनच्या पुस्तकांचा अमेरिकेत खप त्यामुळे वाढला. याच वर्षी त्याच्या 'थंडरबॉल'ची प्रकाशनपूर्व प्रत योगायोगाने केव्हिन मॅकलोरी यांच्या वाचनात आली. 'थंडरबॉल'मुळे संयुक्त कॉपी राईटचा भंग झाला म्हणून केव्हिन मॅकलोरी यांनी उच्च न्यायालयांत फिर्याद गुदरली. १२ एप्रिलला त्यास 'सन्डे टाईम्स'ची कॉन्फरन्स सुरू असतानाच लंडन येथे हृदयविकाराचा झटका आला. तरीही १९६२ मध्ये 'यू ओनली लीव्ह ट्वाईस' (You Only Live Twice) त्याने पूर्ण केले. १९६४ मध्ये गोल्डन आय येथे त्याने 'दि मॅन विथ दि गोल्डन गन' पूर्ण केले. तो इंग्लंडला परतला. पण 'दि मॅन विथ दि गोल्डन गन'वर तो शेवटचा हात फिरवू शकला नाही. ऑगस्ट १९६४ मध्ये प्रकृती चांगली नसतानाही तो गोल्फ क्लबच्या सभेला हजर राहिला. पण दुसऱ्याच दिवशी १२ ऑगस्ट १९६४ ला कॅन्टबरी हॉस्पिटलमध्ये मध्यरात्री १ वाजता जेम्स बॉण्डच्या निर्मात्याची प्राणज्योत मावळली.

सुएज संघर्षानंतर विश्रांतीकरिता त्या वेळचे इंग्लंडचे पंतप्रधान सर अॅन्थनी ईडन जमेका येथे गेले. त्यांचे वास्तव्य 'गोल्डन आय' येथे होते. इअॅनच्या मरणापूर्वीच त्याचे आवडते निवासस्थान जागतिक प्रसिद्धीच्या झोतात आलेले त्याने पाहिले. त्याच्या मरणापूर्वी जेम्स बॉण्ड जगविख्यात झाला होता. त्याच्या पुस्तकांच्या ४० मिलीयन प्रती विकल्या गेल्या होत्या. १९६० ते १९६४ च्या दरम्यान त्याचे उत्पन्न दसपटीने वाढले होते. 'डॉ. नो' व 'फ्रॉम रशिया विथ लव्ह' यांवर चित्रपट निघाले होते. लक्षाधीश बनण्याचे, सन्मानित बनण्याचे, प्रसिद्ध बनण्याचे त्याचे स्वप्न सत्यसृष्टीत अवतरले होते. जेम्स बॉण्ड शर्टस, जोडे, पेये आणि खेळणी

पृष्ठ ४६ वर

'विज्ञानखबरी'

श्रीकांत आंबेकर

दूरचे तारे । लेखांक पाच

# समस्थानी चलनयंत्रे (Isotope Motors)

शालान्त परीक्षेची दीक्षा घेऊन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला 'समस्थानी' किंवा 'आयसोटोप' हे नाव ऐकून माहीत असतेच. एवढेच नव्हे, तर समस्थानी म्हणजे एकाच मूलद्रव्याचे पण वेगवेगळे 'आण्विक वजन' असणारे परमाणु होत हेही त्याला ठाऊक असते. त्यानंतर कॉलेजच्या पहिल्या वर्षीची पुस्तके हे सांगून जातात की मेंडेलिफच्या पिरिऑडिक टेबलमधील ८३ नंबरच्या मूलद्रव्यापासून पुढचा प्रत्येक चौरस हा किरणोत्सर्गी मूलद्रव्यांच्या समस्थानींनी व्यापलेला आहे. ही किरणोत्सर्गी मूलद्रव्ये विलक्षण झपाट्याने किरणोत्सर्जन करीत असतात.

आजकाल शेकडो, नव्हे हजारो लोक व्यवहारात या ना त्या मार्गाने समस्थानींचा वापर करीत असतात. तेव्हा समस्थानी अग्नियानासाठी इंधन म्हणून सुचविले गेले तर त्यात विशेष आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही.

समस्थानी इंधन म्हणून वापरणाऱ्या चलनयंत्रांचा पहिला फायदा म्हणजे धुराविराची कटकट त्यात रहाणार नाही. आगीचे भय नाही. कारण कुठे काही 'पेटण्याचा' संबंधच नाही. जरुरी असणारा अधोदाब किरणोत्सर्गाद्वारे निर्माण केला जाईल.

किरणोत्सर्गी मूलद्रव्यांच्या किरणोत्सर्जनातून तीन महत्त्वाची उत्पादने बाहेर पडतात एक म्हणजे अल्फा कण. हे म्हणजे दुसरे तिसरे काही नसून हेलियमची अणुकेंद्रे असतात. नंतर बीटा किरण म्हणजे ऋणाणुकांचा झोत आणि अखेरीस गॅमा किरण. पैकी परिचालक (propellant) म्हणून सर्वात जास्त कार्यक्षम आहेत अल्फा कण. ते जड असून ऋणाणुकांच्या १०,००० पट अधिक अधोदाब ते निर्माण करू शकतात. गॅमा किरणांपासून मिळणारा अधोदाब दुर्लक्षणीय असतो.

या कारणांसाठीच, दोन ब्रिटीश शास्त्रज्ञांनी त्यांच्या अंतरिक्षयानात इंधन म्हणून थोरियमच्या एका समस्थानीची निवड केली आहे. या समस्थानीचे आण्विक वजन

(atomic weight) आहे २२८. त्याचा ऱ्हास अथवा नाश हा अल्फा कणांच्या उत्सर्जनाद्वारा होतो. या समस्थानीचा आणखी एक महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे त्याचे अर्धायुष्य [ किरणोत्सर्गी मूलद्रव्यांच्या एकूण परमाणुंच्या पैकी निम्म्या परमाणुंचे संपूर्णपणे विभाजन होण्यासाठी लागणाऱ्या काळास त्या मूलद्रव्याचे अर्धायुष्य म्हणतात ] आहे तब्बल २२ महिन्यांचे ! याचा अर्थ असा की, प्रवासाच्या संपूर्ण काळात किरणोत्सर्गाचा स्रोत पुरेसा शक्तिशाली व नियमित राहील.

१२ मीटर व्यासाची थोरियमची तबकडी अग्नियानाला मंगळापर्यंत पोचावयास जरूर एवढा अल्फा कणांचा स्रोत पुरवील. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, अशा प्रकारच्या परिचालन यंत्रणेचा अधोदाब टनात न मोजता ग्रॅममध्ये मोजला जाईल. द्रव-इंधन वापरून शेकडो, हजारो टनांचा अधोदाब निर्माण करणाऱ्या आजकालच्या अग्नियान चलनयंत्रांच्या पार्श्वभूमीवर हे चित्र काहीसं विचित्रच भासेल. पण त्याचबरोबर समस्थानी अग्नियानामध्ये चलनयंत्रे ही यान इष्टस्थळी पोचेपर्यंत सतत कार्यरत रहाणार आहेत; तर आजची 'परंपरागत' अग्नियान-चलनयंत्रे त्यांना पदोपदी पुरविण्यात येणारे इंधन काही मिनिटातच गिळून शांत होतात हे विसरून चालणार नाही. यात आणखी भरीला भर म्हणजे समस्थानी चलनयंत्रणेची निर्गमन गती रासायनिक इंधन वापरणाऱ्या अग्नियानाहून तीन ते चार हजार पटीने अधिक राहील.

एकदा थोरियम तबकडी इंधन म्हणून वापरण्याचे ठरविल्यावर या योजनेत जे दोष येतील त्यांचे निराकरण करायलाच पाहिजे. कोणते दोष ? पहिला दोष हा की वापरण्यात येणाऱ्या थोरियम तबकडीमधून अल्फा कणांचे उत्सर्जन नैसर्गिकपणे सर्व दिशांनीच चालू राहील. पण अधोदाब तर त्यावेळीच निर्माण होईल, ज्यावेळी गुंतागुंतीच्या वा साध्या, तात्कालिक वा बऱ्याच काळपर्यंत चालू रहाणाऱ्या अशा–एकूण सर्व क्रियाप्रक्रियावर निर्माण होणारा अल्फा कणांचा स्रोत एकाच कोणत्यातरी दिशेने मिळत राहील. म्हणून हा दोष टाळला गेलाच पाहिजे–नव्हे जाईलच! कारण उपाय आताच तज्ज्ञांना ठाऊक आहे. कोणता उपाय ? सरळ बेरिलियम धातूचा अल्फा-कण शोषक म्हणून वापर करणे हा उपाय ! हा बेरिलियम-शोषक थोरियम तबकडीच्या एका बाजूस बसविण्यात येईल. त्यामुळे यानाच्या प्रवासाच्या दिशेनेच वाहणारा अल्फा कणांचा स्रोत आपोआपच थोपविला जाईल.

समस्थानी हे इंधन म्हणून वापरणाऱ्या अग्निबाणाची रचना तशी साधीच राहील. त्याच्यात फक्त प्रवाशांचे वाहकयान, बेरिलियम–शोषक आणि थोरियम तबकडी एवढ्याच गोष्टींचा समावेश असेल. साहजिकच यानाचे वजन बरेच कमी असेल; रचना साधी सोपी असेल अन् कार्यक्षमता उत्कृष्ट असेल. याहून आणखी काय अपेक्षा ठेवाव्यात ?

आता अशा प्रकारच्या यानात आणखी एक तसा महत्त्वाचा दोष रहाणार आहे

म्हणा. तो म्हणजे या यानाला पृथ्वीवरून उड्डाण करता यायचं नाही. त्यासाठी त्याला पुन्हा द्रव इंधनाचीच मनधरणी करावी लागेल. द्रव इंधनावर चालणारा अग्निबाण या यानाला पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्यापलीकडे घेऊन जाईल अन् तिथून त्याचा 'स्वयं-प्रवास' चालू होईल.

कमी वजन व उत्कृष्ट कार्यक्षमता यामुळे समस्थानी परिचालकाचा उपयोग कृत्रिम उपग्रहांसाठी करून घेणे मोलाचे ठरणार आहे. ही यंत्रे बऱ्याच काळपर्यंत कार्यरत राहू शकतात. मुख्य म्हणजे अवकाशातील उल्कापासून त्यांना फारसा धोका पोहोचण्याचा संभव नसतोच. कारण चुकून एखाद्या उल्केच्या तडाख्याने त्या थोरियम तबकडीचा एखादा तुकडा मोडला गेला तरी तिचे किरणोत्सर्जन थांबायचे नाही अन् प्रवासही अडून रहायचा नाही.

## प्लाझ्म्यासंबंधी काही शब्द ...

प्लाझ्म्याचा आणि आपला विशेष परिचय आहे तो, तो रक्तातील एक घटक आहे म्हणून ! पण रक्तघटक प्लाझ्मा आणि सध्या ज्याचा विचार करायचा आहे तो प्लाझ्मा यांचा काडीमात्रही संबंध नाही. आपल्याला हे ठाऊकच आहे की पदार्थाच्या तीन स्थिती असतात : घन, द्रव, वायुरूप. त्यामध्ये प्लाझ्मा या पदार्थाच्या चौथ्या स्थितीची भर पडलेली आहे. चौथ्या दिशेच्या जोडीला चौथी स्थिती सापडणे हा विसाव्या शतकातील चमत्कारच म्हटला पाहिजे.

पहिल्या तीन स्थितींपासून ही चौथी स्थिती वेगळी एवढ्याचसाठी आहे की या स्थितीत प्रत्यक्ष पदार्थाच्या परमाणुतच फेरबदल घडून आलेले असतात. पहिल्या तिन्ही स्थितीत ही गोष्ट संभवत नाही. प्लाझ्मा स्थितीत असलेल्या पदार्थाच्या परमाणुंमधले ऋणाणुक हे अणुकेंद्रांपासून 'मुक्त' होऊन स्वतंत्ररीत्या भ्रमण करीत असतात. या स्थितीत घनभार (+ ve charge) धारण करणाऱ्या अणुकेंद्राची संख्या व ऋणभारवाल्या ऋणाणुकांची संख्या समानच असल्याने बाह्यतः प्लाझ्मा हा विद्युतभारविरहित म्हणजे न्यूट्रल असतो.

प्लाझ्मा हा थंड असू शकतो तसाच उष्णही ! अणुऔष्णिक प्रक्रियेवर नियंत्रण घालण्याचे मार्ग शोधत असलेले शास्त्रज्ञ लाखो अंश सेंटिग्रेड तपमानाचा 'उष्ण' प्लाझ्मा पसंत करतात. तर अवकाशयानासाठी प्लाझ्मा हाताळणारे तज्ञ 'थंड' प्लाझ्म्याचे सहाय्य घेतात. या थंड प्लाझ्म्याला हळूच हात लावून पहायला सक्त हरकत असते. कारण त्याचं तपमान–तसं काही फार प्रचंड नसते उगाच आपले कुठेतरी ३,५०० ते १०,०००° सें. एवढेसेच असते. बस्स ! सांगायची

गोष्ट म्हणजे या थंड प्लाझ्म्याचे प्रताप तुम्ही आम्ही नेहमीच पण नकळत पहात असतो. सिनेमे न पाहणारी व्यक्ती आजतरी म्युझियमची भर ठरणारीच ठरेल. पूर्वी फक्त राजेराजवाडे व श्रीमंत लोक यांच्यासाठी खास राखून ठेवण्यात आलेला बाया नाचवण्याचा षोक सध्याच्या समाजवादी धोरणानुसार सामान्यांपर्यंत पोचवण्यासाठीच चलतचित्रांची निर्मिती झाली आहे. तेव्हा फक्त रुपये वाजवून (अर्थात एक, दोन ! खुलासा एवढ्यासाठीच की चालू जमान्यात रुपायाची सद्दी संपून दहा रुपये सुद्धा 'वाजायला' लागले आहेत.) हेलनसारख्या बाईचा कमरतोड डान्स पाहण्यासाठी तरी 'मी, आम्ही, तू, तुम्ही.' पासून थेट 'तो, ती, ते' आणि 'ते, त्या, ती' पर्यंत सारेजण चलतचित्रपट पाहतोच ! हा चित्रपट ज्या प्रकाशस्रोतामुळे आपण पाहू शकतो तो निर्माण होत असतो प्रोजेक्टरमधील दोन, कर्ब विद्युत्‌अग्रां (electrodes) मध्ये तयार झालेल्या प्लाझ्मा स्तंभातून !

कुठल्याही रासायनिक प्रक्रियेतून मिळणाऱ्या उष्णतेहून कितीतरी पट अधिक उष्णता विद्युत्‌कमानी (electric arc) द्वारा मिळू शकते. अशा प्रकारच्या विद्युन्‌कमानींच्या स्रोतात जर इंधन म्हणून वापरण्यात आलेला कुठलाही वायुरूप पदार्थ 'तापवून' यानाच्या पुच्छछिद्रावाटे जाऊ दिला तर १५ ते २० किलोमीटर्स प्रती सेकंद एवढी निर्गमन गती मिळू शकेल. सर्वोत्कृष्ट रासायनिक इंधनावर चालणाऱ्या अग्नियानांहून ही गती पाच पटीने अधिक आहे महत्त्वाचे म्हणजे बाहेर पडणाऱ्या वायुच्या स्रोतावर योग्य नियंत्रण ठेवणे अशा प्रकारच्या विद्युत-प्लाझ्मा चलनयंत्रात अधिक सोपे जाणार आहे.

१०० किलोमीटर्स प्रती सेकंद एवढी निर्गमन गती गाठता येणे सहज शक्य होणार आहे. त्यासाठी वापरावी लागतील विद्युत्‌चुंबकीय प्लाझ्मा चलनयंत्रे ! अशी यंत्रे तयार करण्यासाठी आरेखनतज्ञ (designer) प्लाझ्माच्या एका मौलिक गुणाचा फायदा उचलीत आहेत. प्लाझ्मा हा उत्कृष्ट विद्युतवाहक आहे. विद्युतप्रवाह वाहून नेत असलेल्या विद्युतवाहकाला चुंबकीय क्षेत्रात गती मिळते हे सर्वश्रुत आहे. याच तत्त्वावर विद्युतचुंबकीय-प्लाझ्मा चलनयंत्रे कार्य करतील. सरळ सांगायचं तर प्लाझ्मा चुंबकीय क्षेत्रात ठेऊन त्यातून विद्युत्‌प्रवाह सोडण्यात येईल. त्यानंतर विद्युतसंबंधीच्या अभ्यासात शिकलेल्या 'डाव्या हाताच्या नियमा'-नुसार (Left Hand Rule) पुढील साऱ्या गोष्टी घडून येतील.

या प्रकारच्या चलनयंत्रांनी सुसज्ज केलेल्या यानाला विद्युत पुरवठ्याची चांगलीच जरुरी भासेल. हा विद्युतपुरवठाही प्रचंड प्रमाणात करावा लागेल. निर्माण होणाऱ्या अधोदाबाच्या प्रत्येक किलोग्रॅममागे १०० किलोवॅट विद्युत पुरवावी लागेल असा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. त्यामुळे अर्थातच विद्युत निर्मितीचा प्रश्न समोर उभा राहतो. हा प्रश्न तसा किचकट वा सुटण्यास अशक्यप्राय असा नाही; उलट तो सोडविण्याचे अनेक मार्ग आज उपलब्ध आहेत. पहिला मार्ग

म्हणजे सरळ छोटी अणुभट्टी वापरणे किंवा आरशांच्या सहाय्याने सूर्यप्रकाश केंद्रित करून त्याचा उपयोग पाण्याची वाफ करून घेण्यासाठी करून घेणे. ही वाफ जनित्र फिरवून विद्युतनिर्मिती करील. याहूनही सोपा मार्ग म्हणजे प्रकाशापासून वा उष्णतेपासून थेट विद्युतनिर्मिती करणाऱ्या सेल्सचा वापर करणे.

या प्रकारची अग्नियाने जेव्हा प्रत्यक्षात येतील तेव्हा ती अंतरिक्षमोहीमात विलक्षण क्रांतीच घडवून आणतील. या यानांना रासायनिक इंधने वापरणाऱ्या अग्नियानांहून भलतेच कमी इंधन पुरेल. साहजिकच त्यांचे वजन कमी असेल. व ती बरीच दूरवर जाऊन येऊ शकतील. या गुणी अग्नियानातसुद्धा एक दोष आहेच. दोष तोच, जो समस्थानी व अयन अग्नियानातदेखील असणार आहे–या प्रकारच्या यानांना पृथ्वीवरून उड्डाण करता येणार नाही. रासायनिक इंधने वापरणाऱ्या अग्नियानाच्या सहाय्याने त्यांना अंतरिक्षात फेकावे लागेल. किंवा भावी काळात पृथ्वीभोवती फिरत ठेवण्यात आलेल्या अंतरिक्षस्थानकावरच त्यांची बांधणी करण्यात येऊन तिथूनच प्रवासाला सुरुवात करण्यात येईल.

(क्रमशः)

---

## इअॅन फ्लेमिंग

पृष्ठ ४१ वरून

यांचे युग निर्माण झाले होते. महत्त्वाकांक्षा पूर्ण झाल्याचे भाग्य त्यास लाभले, पण त्याचा आनंद तो उपभोगू शकला नाही.

रहस्यकथांच्या क्षेत्रात नवीन युग निर्माण करणारा जेम्स बॉण्ड, चित्रपट निर्मात्याला हमखास सुवर्णमुद्रांचा खणखणाट ऐकविणारा जेम्स बॉण्ड, क्रौर्य आणि कामवासना, धाडस, धैर्य आणि अपार छळ यांच्या अतिरेकी मिश्रणातून निर्माण झालेला गुप्तहेर ००७ ही एका क्षणाची निर्मिती नाही. जेम्स बॉण्डचे जीवन कल्पनातीत अद्भुत आहे पण त्याचा आत्मा काल्पनिक नाही, नकली नाही. जेम्स बॉण्ड ही भ्रष्ट नक्कल तर नाहीच नाही.

जेम्स बॉण्डच्या लेखकाने जन्मभर पाहिलेल्या स्वप्नांचा, त्याच्या कल्पनासृष्टीचा, जगलेल्या जीवनाचा, अनुभवलेल्या अनुभवांचा, स्वतःसाठी मान्य केलेल्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा, त्याच्या गुणदोषांचा, महत्त्वाकांक्षेच्या सिद्धीसाठी त्याने केलेल्या धडपडीचा, त्याच्या आवडीनिवडीचा परिपाक म्हणजे जेम्स बॉण्ड. जेम्स बॉण्ड टिकविण्यासाठी इअॅनने अक्षरशः रक्ताचे पाणी केले. स्वतःच्या जीवनावर अनुभवाच्या कुशल हाताने, त्याने कल्पनाशक्तीच्या अद्भुत व अदृश्य जादूने जेम्स बॉण्डचे कलम केले. आश्चर्य हे की जेम्स बॉण्डचे जीवन फुलू लागले, बहरू लागले व लेखकाचे इअॅनचे– जीवन कोमेजले. ◻ ◻ ◻

[ 'दि लाईफ ऑफ इअॅन फ्लेमिंग – क्रीएटर ऑफ जेम्स बॉण्ड' या जॉन पिअरसन (John Pearson) यांच्या चरित्र ग्रंथाच्या आधारे ]

क्रीडांगण । नरेंद्र दाभोळकर

धुळे येथील कबड्डीच्या

# महाराष्ट्र राज्य चाचणी स्पर्धा

कबड्डीचा महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्यासाठी धुळे येथे जे आंतर जिल्हा चाचणी सामने या महिन्याच्या सुरवातीला पार पडले ते अनेकार्थानि गाजले. प्रथमश्रेणीची कबड्डी स्पर्धा प्रथमच पाहणाऱ्या धुळयाच्या क्रीडाशौकीनांना मनमोकळेपणे दिलेली दाद आणि खेळाडूंचे ठेवलेले चोख आदरातिथ्य, बलाढ्य संघाचे अनपेक्षितपणे झालेले पराभव आणि निवडसमितीने सर्वांना दिलेले धक्के या सर्व घटनांनी स्पर्धा गाजविण्यात आपापला वाटा उचलला.

स्पर्धेच्या उद्घाटनाचे संचलन शानदार झाले. गणवेषाअभावी अथवा संघ वेळेवर न आल्याने मागील वर्षी काही संघांनी संचलनात भागच घेतला नव्हता, तर साधना मंडळासारख्या पुण्याच्या मान्यवर संघाने सूचना देऊनही स्वतःचा ध्वज न आणता पुठ्ठ्याच्या छोटया तुकड्यावरच संघाचे नाव लिहून वेळ मारून नेली होती. या साऱ्या गोष्टी यावर्षी कटाक्षाने टाळण्यात आल्या. स्पर्धा वेळेवर सुरू करण्याचा संयोजकांचा मानस मात्र उद्घाटन करावयाला मान्यवर मंत्री महाशयच दीड तास उशीरा आल्याने फसला.

अखिल भारतीय कबड्डी संघटनात महाराष्ट्र राज्याची कबड्डी संघटनाच सर्वात अधिक प्रभावी आणि कार्यक्षम समजण्यात येते आणि ते खरे आहे. असे असूनही महाराष्ट्रातल्या फक्त तेरा जिल्ह्यानीच स्पर्धेत भाग घ्यावा हे तितकेसे भूषणावह नाही. महिला कबड्डीचा प्रचार तर पुण्या-मुंबई बाहेर गेलेलाच नाही त्यामुळे त्यांच्या निवड सामन्यात तर वैयक्तिक संघच भाग घेतात. पुरुषांच्या संघांची विभागणी तीन विभागात आणि स्त्रियांच्या संघाची दोन विभागात केली होती.

अ गटात मुंबई, सातारा, उस्मानाबाद आणि नाशिक या चार संघांचा समावेश होता. योगायोगाची गोष्ट म्हणजे गेल्यावर्षीच्या सांगलीच्या चाचणी स्पर्धेतही पहिले

तीन जिल्हे एकाच गटात होते. मात्र मागीलवर्षी मुंबईच्या संघावर मात करून सातारकरांनी पहिल्यांदाच विभागाचे अजिंक्यपद मिळविले होते. मुंबईकरांनी यावर्षी त्याची सव्याज परत फेड केली. अर्थात सातारा जिल्ह्याचा संघही यावर्षी मागच्या तुलनेने बराच कमकुवत होता. उस्मानाबादकरांनी दोन वर्षापूर्वीच्या चाचणी स्पर्धेत उत्पांत्य फेरीपर्यंत धडक मारली होती, पण मागच्यावर्षी मात्र विभागातील साऱ्याच संघाकडून त्यांना नामोहरम व्हावे लागले होते. यंदा त्यांनी आपला फॉर्म पुन्हा मिळवला. सातारा संघावर त्यांनी सहजपणे मात केलीच पण अजिंक्यपद मिळवणाऱ्या मुंबई संघालाही त्यांनी चांगलेच झुंजविले. वसंत सूद अथवा विजू पेणकर यांना निदान रेषेवर यशस्वीपणे पकडणे सोपे खासच नव्हे पण आपल्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाने त्यांनी ते साध्य करून दाखविले. जाल कारभारीचा मध्य-रक्षकाने काढलेला एकेरी पट खेळाडूचे मर्मस्थान अचूक ओळखण्याची झलक दाखवून गेला. थोडी घाई नडली म्हणून नाहीतर मुंबईकरांवर बाका प्रसंग ओढवला असता. नाशिकच्या नवशिक्या संघाचा पराभव करताना साताररच्या किसन काळेचा खेळ चांगला झाला.

ब गटात सोलापूर, सांगली, धुळे आणि औरंगाबाद या चार संघांचा समावेश होता. सोलापूर जिल्ह्याचा संघ नेहमीच बलवान असतो त्याप्रमाणे तो यंदाही होता. बच्चू हलवाई, घोडगे, पापा शिंदे यांच्या पुनरागमनामुळे सांगलीचा संघही मजबूत झाला होता. (मागल्यावर्षी काही अंतर्गत वादामुळे हे खेळाडू खेळलेले नव्हते) धुळ्याचा संघ अगदीच मामुली तर औरंगाबादचा साधारण होता. अर्थातच या दोन्ही संघांचा फारसा टिकाव सांगली, सोलापूरपुढे लागला नाही. यंदापासून केलेल्या नवीन नियमाप्रमाणे विभागातून फक्त एकच संघ वर घ्यावयाचा असल्या-मुळे सांगली-सोलापूर या तुल्यबल संघातला सामना अटीतटीचा ठरणार ही अटकळ होती. दोन बलाढ्य संघातला सामना ' रडचा ' होतो हा अनुभव पहिल्या चाळीस मिनिटाच्या डावात आला. मग पुन्हा दुसरा चाळीस मिनिटाचा डाव खेळवण्यात आला. नाणेफेकीचा बोनस गुण सांगलीला मिळूनही सामना सोलापूरकरांनी जिंकला. दामोदर सहस्त्रबुद्धे सारखा सुज्ञ खेळाडू दोनदा फायर लाईनला स्पर्श होऊन बाद व्हावा हे त्या संघाचे दुर्दैव. आपला संघ वाचविण्यासाठी पापा शिंदेने केलेला प्रयत्न कौतुकास्पद होता. आपल्या चढायाच्या कौशल्याने एकेक गडी बाद करत एकूण चार गुण त्याने मिळविले. पण त्याची ही एकाकी लढत पराभवाचे विजयात रूपांतर मात्र करू शकली नाही.

पुणे, ठाणे, कुलाबा, जळगाव या जिल्ह्याच्या गटात पहिले दोनच संघ खरे· सोलापूरच्या संघाचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश करण्याचा मान ठाण्याने मागच्यावर्षी पहिल्यांदा मिळविला आणि पुण्याच्या मातबर संघाचा पराभव करून यंदा तो कायम राखला. वीस फूटावर जाऊन गडी बाद केल्यावर स्वतःचाच पाय

पायात अडकून बाळ कोंडाळकर पडला आणि पहिल्या गुणाच्या बाबतीत ठाणेकर नशिबवान ठरले. पुणे संघात भरंवशाचे आणखी चढाईबहाद्दर नव्हते (आणि नसतातच हे कटु पण सत्य) त्यामुळे त्यांनी निदान रेषा बंद करण्याचा हुकमी डाव टाकला. ज्योतिबा पाटीलने शिवाजी जगतापच्या अंगावरून सफाईदार उडी घेतली आणि तो डाव पुणेकरांच्यावरच उलटला. पहिल्या गुणावर मिळालेली आघाडी ठाणेकरांनी कायम राखली खरी पण पुण्याच्या पंढरीनाथ जाधवच्या त्यांनी केलेल्या पकडीत त्यांना पुन्हा एकदा नशिबाने हात दिला हे मान्य करावयास हवे.

बाद पद्धतीच्या स्पर्धेत मागील वर्षीची मुंबई-ठाणे ही जोडी पुन्हा उपांत्य फेरीत भेटली आणि मागील वर्षीप्रमाणेच मुंबईने ठाण्यावर एकतर्फी मात केली. अंतिम सामना झाला मुंबई आणि सोलापूरमध्ये. मुंबईकरांनी पहिला गुण पकडीवर मिळवला आणि त्यानंतर दोन्ही आघाड्यांवर बराच वेळ सामसूम होती. मुंबईच्या

## कटुता टाळणे शक्य आहे

मागील वर्षी महाराष्ट्र राज्याला आपल्या संघनायकत्वाखाली अखिल भारतीय अजिंक्यपद मिळवून देणारा मधू पाटील यंदा मुंबई जिल्ह्याचाही संघनायक होऊ शकला नाही, तर मागील वर्षी मुंबई जिल्ह्याच्या बारा खेळाडूंमध्येही न बसल्याने चाचणी स्पर्धेतही न उतरलेला वसंत ढवण यंदा प्रथम मुंबई जिल्ह्याचा आणि मग महाराष्ट्राचा संघनायक म्हणून निवडला गेला. खेळामध्ये मधू सरस आहेच पण विशेषतः कप्तान म्हणून त्याची बरोबरी करणारा एकही खेळाडू आज महाराष्ट्रात नाही हे सारे खेळाडू आणि तज्ज्ञ मनमोकळेपणे मान्य करतात. या मानहानीमुळे मधू रागावला असेल तर मी ते योग्य म्हणेन. खांदेपालट पाहिजे होता तर ताज्या दमाचा वसंत सूदसारखा सर्वोत्कृष्ट खेळाडू का नको ! नेतृत्वात तो तुलनेने मधूला कमी असेल पण तरीही मुंबईच्या या हंगामातील आतापर्यंतच तीन अजिंक्य-पदे स्वकर्तृत्वावर संपादून आपला विशिष्ट दर्जा त्याने निश्चितच सिद्ध केला आहे. निवड करताना खेळाशी संबंधित बाबींचाच विचार केला जावा ही रास्त अपेक्षा. मुंबईमध्ये खूप गुणवान खेळाडू आहेत हे मान्य करूनही आणि त्यामुळे काहींची नाराजी स्वाभाविक समजूनही निवड निःपक्षपाती होतेच असा विश्वास आज सर्वसामान्य खेळाडू व्यक्त करत नाही. लक्ष्मण पिरवड-करला या आधीच्या दोन वर्षांत ज्या पद्धतीने आणि ज्या कारणाने डावलले जाते ते याला पुरावाच देतात. निवड समितीला संपूर्ण स्वातंत्र्य असले तरी ज्या निकषाच्या साहाय्याने निवड होते त्यांची सर्वमान्य रूपरेखा झाल्यास विनाकारण वाढणारी कटुता टाळण्यास निश्चितच मदत होईल.

कोपरारक्षकाने गुराप्पा पारशेट्टीला पायात सूर मारून पकडण्याचा प्रयत्न अगदीच अकारण केला आणि स्वतःबरोबर सूदचा मोलाचा गुणही तो गमावून बसला. शेखर शेट्टीने पुढच्याच चढाईत लाथेने बाद करून मिळवलेला गडी हा केवळ जोरदार अपीलाचा (आणि गड्याला स्पर्श न झालेला चपळ हालचालीचा) बळी होता. वसंत सूदने त्यानंतर कोपऱ्यावरून पळत जाऊन मौला इनामदाराची केलेली पकड ही मात्र अगदी खासच प्रेक्षणीय होती.

मुंबईकडून या सर्वच सामन्यांत वसंत सूद चढाई आणि क्षेत्ररक्षण या दोन्ही आघाड्यांवर मिळून सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला. शेखर शेट्टी आणि विजू पेणकर यांनी त्याला उत्कृष्ट साथ दिली.

महिला सामन्यांत बरेच सामने झाले. एकतर्फी, एखादा अगदी बचावात्मक आणि थोडे रंगतदार. धुळे अथवा उस्मानाबादचे महिला संघ हे अगदीच नवशिके तर राणाप्रताप आणि जॉफ्रे मॅनर्स या संघांनी चाळीस मिनिटांच्या सामन्यानंतरही गुणफलक कोरा ठेवून आम्ही पुरुषांच्या मागे नाही हे सिद्ध केले. नवयुग क्रीडा मंडळ आणि राणाप्रताप, पुणे, अथवा विश्वशांती मुंबई हे काही गाजलेले सामने. पहिल्या सामन्यात चित्रा नाबरच्या चढायांना मध्यंतरानंतर नीलिमा पुसाळकर आणि हेमा गोडसेने चोख उत्तर दिले आणि सामना १२–१२ असा समान गुणांवर आणला. विश्वशांती आणि साधना मंडळ पुणे हा उपांत्य आणि नंतर नवयुग क्रीडा मंडळाशी अंतिम सामना गाजवला विश्वशांतीच्या छाया बांदोडकरने. तिच्या चढाईच्या खेळाचा खास उल्लेख करावा लागेल. अर्थात नवयुगक्रीडाच्या मृदुला मडईकरे आणि क्रांती व चित्रा नाबर या भगिनींनी सामना १४–३ असा जिंकून मुंबईच्या दादोबा गावडे ढाल स्पर्धेतील पराभवाचा वचपा काढला हे मात्र खरे.

पुरुषांच्या महाराष्ट्राच्या संघाची निवड याबाबत भरपूर वावड्या उठत होत्या.


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.


**वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)**

कर्णधार म्हणून मुंबईचा वसंत ढवण, वसंत सूर आणि शेवटी शेवटी जाल कारभारी. त्याबरोबरच सोलापूरच्या गुराप्पा पारशेट्टीचे नाव घेतले जात होते. चढाई आणि क्षेत्ररक्षण या दोन्हीमधील खेळाडूंची चाचणी स्पर्धेतील कामगिरी, त्यांचा या सीझनमधील फॉर्म, नेतृत्वाची कुवत या गोष्टींचाच प्रामुख्याने विचार करावा असे मला वाटते. या सर्व कसोटयांवर वसंत सूद हा वसंत ढवणला उजवा असल्याने त्याला हा मान का दिला नाही हे माझ्याप्रमाणेच अनेक जणांचे प्रश्नचिन्ह आहे. इंदूर, नागपूर, मुंबई या गेल्या तीन वर्षातील अखिल भारतीय स्पर्धेत महाराष्ट्र संघातही ज्याचा समावेश घेऊ शकला नाही त्या वसंत ढवणचा फॉर्म यंदा एकदम सुधारला काय ? आणि तसे असेल तर चाचणी स्पर्धेत त्याचे प्रत्यंतर यावयास नको काय ! का तरुण रक्ताला वाव देण्याची घोषणाबाजी सर्व क्षेत्राप्रमाणे याही क्षेत्रात चालू आहे ? गुराप्पा पारशेट्टीची उपकर्णधार म्हणून झालेली निवड हो या स्पर्धेतील त्याचा खेळ पाहता योग्यच म्हणावी लागेल (अर्थात उपसंघनायक हाही काही सामन्यांच्या वेळेस पद्धतशीरपणे बाहेर ठेवण्यात येतो हा यापूर्वी आलेला कटु अनुभव त्याला येणार नाही ही आशा.)

महिला संघाची कर्णधार म्हणून चित्रा नावरच्या झालेल्या निवडीबद्दलही विस्मय वाटतो. तिच्या आक्रमक चढाईबद्दल दुमत नाही पण परिस्थितीप्रमाणे संघाचे धोरण आखणे आणि सर्व खेळाडूंना बरोबर घेऊन ते संयमित आणि नेमकेपणे कार्यान्वित करणे यामध्ये ती या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू होती असे मला वाटत नाही. नीलिमा पुसाळकरकडे नेतृत्व येणार ही शेवटी हूल ठरली. का मागच्या वर्षी पुण्याची वासंती सातव झाल्यावर यंदा मुंबईकडेच मानाचे पान जावयास हवे असे आहे ?

महाराष्ट्र संघाचे दार अनेक वर्षे ठोठावणाऱ्या सांगलीच्या पापा शिंदेने चढाई आणि पकडीचा चतुरस्त्र खेळ करूनही त्याची निवड न करण्यात मला त्याच्यावर अन्याय झाला असे वाटते. विजू पेणकरला पण डावलावयास नको होते.

सांगली, सातारा आणि पुणे जिल्हे एकूण बरेच नाराज दिसले. या नाराजीची कारणे कबड्डी संघटक प्रामाणिकपणे शोधतील आणि खेळाडूही कटुता विसरून महाराष्ट्रात आणि भारतात कबड्डीची शान वाढविण्यास धडपडतील ही अपेक्षा !



शरद गोखले



चाळीस वर्षे नाट्यव्यवसायात असूनही झोताबाहेर राहिलेले

# डॉक्टर नेरकर

डॉ. नेरकर यांचा आज संध्याकाळी अप्पासाहेब फडके यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार आहे. सत्कार समितीचे एक सदस्य माझ्याशी फोनवर बोलत होते. 'माणूस 'ने या कार्यक्रमाची दखल घेतली पाहिजे, अशी माझी इच्छा आहे.

कार्यक्रमाला हजर राहण्याचे आश्वासन देऊन मी चटकन मोकळा होतो.

भरत नाट्य मंदिरामधील हा कार्यक्रम मोठा झकास झाला. कार्यक्रमाला घरगुती स्वरूप होते. निष्ठेने नाट्यव्यवसायात वावरलेल्या डॉक्टर नेरकर यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. डॉक्टर नेरकर यांनी ज्यांच्याबरोबर दीर्घकाल काम केले अशी अनेक मंडळी कार्यक्रमाला उपस्थित होती. प्रामुख्याने बोलले ते श्री स्टार्सचे बाबूराव गोखले आणि अध्यक्ष अप्पासाहेब फडके. बाबूरावांनी रवींद्र स्टार्सच्या अनेक जुन्या आठवणी सांगितल्या.

अप्पासाहेब फडके यांचे भाषण नेहमीसारखे रंगले. आज नाटकाला चांगले दिवस आले आहेत. अनेक मंडळी एक फायद्याचा व्यवसाय म्हणून या व्यवसायाकडे आकृष्ट होत आहेत. परंतु डॉक्टर नेरकर यांचे वैशिष्ट्य हे की ज्या वेळी नाट्यव्यवसायातील मंडळी अन्य व्यवसाय शोधत होती, अशा मंदीच्या काळात दुसऱ्या व्यवसायात सुस्थिर असलेले डॉक्टर कलेच्या प्रेमापोटी,

रकाम्या पोटाने काम करण्याची तयारी ठेवन नाटचव्यवसायाकडे आले, अशा शब्दात त्यांनी डॉक्टरांचा गौरव केला. कलाकार म्हणून डॉक्टरांना फार मोठे यश मिळाले नाही. परंतु नाटचव्यवस्थापक म्हणून मात्र त्यांनी मोठे यश संपादन केले आहे. या यशाचा गौरवपूर्ण उल्लेख करताना बाबूराव गोखले म्हणाले, माणसे जोडण्याची प्रवृत्ती आणि व्यवहारातील प्रामाणिकपणा, यामुळे डॉक्टरांनी व्यवस्थापक म्हणून यश मिळवले.

डॉक्टरांचा आणि माझा प्रत्यक्ष परिचय नव्हता. सत्काराच्या निमित्ताने त्यांना मुद्दाम भेटून त्यांच्याशी बातचीत केली.

नाटचव्यवस्थापनाच्या या क्षेत्रात ते गेली अनेक वर्षे वावरत आहेत. तसे हे काम खरोखरच जिकीरीचे. त्यातून पुण्या-मुंबईत चालणारे नाटक असेल तर ठीक, पण लांब दौऱ्याचे प्रयोग असतील, तर कामाची गुंतागुंत जास्त वाढते. कलाकारांच्या तारखा मिळून प्रयोगांची निश्चिती झाली, की ज्या गावातून दौरा असेल, तिथे उतरण्याची व्यवस्था बरोबर आहे की नाही, जाहिरात व्यवस्थित चालू आहे की नाही, तिकीट-विक्री कुठपर्यंत आहे, रंगमंचाचे स्वरूप कसे आहे. नाटकाचे साहित्य वेळेवर पोचते की नाही–एक ना अनेक बाबी. या सर्वांवर देखरेख ठेवून निर्माता आणि कलाकार यांना निश्चित ठेवणारा हा प्राणी म्हणजे निर्मिती-व्यवस्थापक. डॉक्टर नेरकर हे जिकीरीचे काम मोठ्या हौसेने गेली अनेक वर्षे करीत आहेत. मान्यवर निर्मात्यांचा, नाटचसंस्थांचा विश्वास त्यांनी संपादन केला आहे. अत्रे थिएटर्सच्या 'तो मी नव्हेच'च्या दौऱ्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीपण पार पाडली. सचीन शंकर यांच्या 'कथा राम जानकीची' या नृत्यनाटचाचे व्यवस्थापनही त्यांच्याकडे होते. सध्या श्री. वि. गो. नमाडे यांच्या नाटचधरित्री या नाटचसंस्थेमार्फत चालू असलेल्या 'लवंगी मिरची कोल्हापूर'ची या लोकनाटचाची व्यवस्थापकीय जबाबदारी त्यांच्याकडे आहे.

डॉ. नेरकर मूळचे विदर्भाकडचे. त्यांचे शिक्षण अमरावती येथेच झाले. घरच्या वडीलांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केला असला, तरी हा व्यवसाय त्यांना मानवला नाही. रंगभूमीवरील प्रेमापोटी ते पुण्यात यऊन दाखल झाले. १९३५ साली रवींद्र स्टार्स ही नाटचसंस्था स्थापन झाली. त्यामध्ये त्यांचा पुढाकार होता. कलाकार म्हणून पुढे यशस्वी ठरलेली राजा परांजपे, बाबूराव गोखले आदी मंडळी रवींद्र स्टार्समध्ये होती. रवींद्र स्टार्सने १९३६ साली 'बेबी' नावाचे नाटक रंगभूमीवर आणून बऱ्यापैकी यशस्वी केले. माधवराव जोशी यांच्या 'पैसाच पैसा' या नाटकाचे प्रयोगही रवींद्र स्टार्सने सादर केले. व्यावसायिक रंगभूमीवर आल्यावर बाबूराव गोखले यांनी श्री स्टार्स ही संस्था स्थापन केली. डॉ. नेरकर श्री स्टार्समध्ये दाखल झाले. रवींद्र स्टार्सचे ते चिटणीस असले, तरी नाटकातून लहान मोठ्या भूमिका ते सतत करीत. ना. सी. फडके यांचे 'काळे

गोरे ' हे नाटक रवींद्र स्टार्सने रंगभूमीवर आणले. त्यातील नवरे मास्तराची भूमिका डॉ. नेरकर करीत असत. अन् झाले भलतेच, खुनाला वाचा फुटली, एक होता राजा, आदी नाटकांतून तसेच अच्युत रानडे यांच्या फूल और काटे या चित्रपटात त्यांनी काम केले. राजा गोसावीची गोष्ट, जिवाचा सखा, आणि अगदी अलीकडे मुक्काम पोस्ट ढेबेवाडी, या चित्रपटांतून त्यांनी लहान मोठ्या भूमिका केल्या. मात्र डॉक्टर नेरकर यांना खरा लौकिक मिळाला, तो नाट्यव्यवस्थापन क्षेत्रात.

रंगभूमीवरील किंवा रुपेरी पडद्यावरील, कलाकार म्हणून त्यांनी केलेली कामगिरी त्या मानाने दुय्यम स्वरूपाची. दुय्यम स्वरूपाच्या भूमिका करणाऱ्या कलाकारांबाबत बोलताना ते म्हणाले, "या कलाकारांना सापत्नभावाची वागणूक मिळते. त्यांचा मोबदलाही पूर्ण दिला जात नाही. प्रमुख कलावंताच्या प्रत्येक गरजेबाबत जागरूक असणारा नाट्य-निर्माता, या दुय्यम कलाकारांबाबत बेफिकीर असतो. दुय्यम भूमिका करीत असली, तरी ही मंडळीही कलाकार असतात. किमान त्यांच्या आर्थिक बाबींच्या संदर्भात निर्मात्यांकडून जास्त सहानुभूतीची वागणूक मिळावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

रंगभूमीवर यशस्वी ठरलेल्या कलाकारांचे सत्कार-समारंभ नेहमीच होतात. शिवाय रंगभूमीवर प्रत्यक्ष वावरल्याने ही मंडळी प्रसिद्धीच्या प्रकाशझोतात सतत वावरत असतातच. तथापि पडद्यामागे राहून व्यवस्थापकीय बाजू सांभाळणाऱ्या डॉक्टर नेरकर यांच्या नाट्यसेवेचा उचित गौरव केला, ही अवश्य नमूद करण्यासारखी बाब आहे.

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

# अंदाज

१९ ते २५ डिसेंबर १९७०

**मेष** : शनिवारी घरातील कारणावरून मनःशांती बिघडेल. आरोग्य चांगले राहील. धनस्थितीत निश्चित सुधारणा होईल. भागीदार मदतीला धावून येतील. पत्नीबरोबर अत्यंत सुखात दिवस जातील. प्रेमसंबंध दृढ होतील.

विद्याभ्यासात यश मिळेल. लेखन व्यवसायात सरकारी साह्य मिळेल. परदेश-गमनाचा योग येईल. मातुल घराण्याकडून मदत होईल. मित्रांकडून फसवणूक होईल. वडीलभावंडांशी जमणार नाही. धंदाव्यवसाय चांगला चालेल.

चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. बुधवार-गुरुवार विवाहास चांगले दिवस आहेत. शुक्रवारी अचानक धनलाभ होईल. घरात वडील अगर माता आजारी पडण्याचा संभव आहे. शुभ तारखा २२।२३।२४.

**वृषभ** : शनिवारी प्रवासात शारीरिक व मानसिक त्रास होईल. प्रवास टाळावा. धनस्थिती चांगलीच सुधारेल. मंगळ-शुक्रांचा योग एखाद्या प्रेमाच्या प्रकरणात ओढील. बुधवार-गुरुवार नवीन व्यवसाय हाती घेण्याला चांगले आहेत. मित्रांची सर्व कामात मदत होईल.

विद्याभ्यासात जरा पिछेहाट होण्याचा संभव जास्त आहे. प्रकाशक, लेखक साहित्यिक यांना दिवस तितकेसे चांगले नाहीत. व्यवसाय नीट चालणार नाही. सार्वजनिक मानमान्यतेला तडा जाण्याचा संभव आहे. गुरू अडचणीतून सुखरूप बाहेर आणील.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. सोमवार-मंगळवार पराक्रमाला चांगले आहेत. कोणतेही बौद्धिक काम सुरू करण्याला दिवस चांगले आहेत. शुभ तारखा २१।२२।२३।२४.

**मिथुन** : आरोग्य चांगले राहील. धनस्थिती बिघडेल. स्थावराबद्दल अडचणी निर्माण होतील. प्रवास टाळावा. पराक्रमाला चांगले दिवस आहेत. भावंडांशी भांडणे होण्याची शक्यता आहे, अपचनाचे विकार वाढतील. मुलांच्या विवाहाचे बेत ठरण्याला बुधवार, गुरुवार चांगले आहेत.

विद्याभ्यासात यशःप्राप्ती होईल. शास्त्रीय शिक्षणातील विद्यार्थी, लेखक, प्रकाशक, यांना प्रगतिपथावर नेणारे दिवस आहेत. भागीदार चांगलीच मदत

करतील. उद्योगधंदा चांगला चालेल. सरकारी कामे सहज मिळतील. त्यात चांगला फायदा होईल.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. शनिवारी जरा धाकट्या भावंडांशी मतभेद होईल. सोमवार-मंगळवारी घरात काहीतरी शुभ समारंभ होऊन दिवस आनंदात जातील. शुभ तारखा २१ ते २५.

**कर्क** : शरीर प्रकृतीला जपावे. वडिलार्जित संपत्तीबद्दल भांडणे निर्माण होतील. पैशाची अडचण फार येईल. पंचमातील गुरू व चतुर्थातील शुक्र, मंगळ यातून पार पाडतील. भागीदारांकडून त्रास दिला जाईल. शनिवारी हा त्रास जास्त जाणवेल. घरातील मंगलकार्यामुळे बुधवार-गुरुवार आनंदात जातील.

विद्याभ्यासात अनपेक्षित यश प्राप्त होईल. शास्त्रीय संशोधक, लेखक, प्रकाशक यांना दिवस फारच चांगले आहेत. वडील आजारी पडण्याचा संभव आहे. संततीकरता प्रवासयोग येईल. त्यात फायदा होईल. संतती चांगली वागेल. सायन्सच्या विद्यार्थ्यांना जास्त प्रगतिकारक दिवस आहेत.

चंद्राचे भ्रमण २।३।४ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. बुधवार-गुरुवारी कोणतेही काम हातात घ्यावे, यशःप्राप्ती होईल. शुभ तारखा २१ ते २५.

**सिंह** : शनिवार-रविवारी राग अनावर होईल. जपून वागावे. धनस्थिती चांगली राहील. सरकारातून येणाऱ्या रकमा सोमवार, मंगळवारी येण्याचा योग आहे. भावंडांतील कोणाचं तरी लग्न जमण्याचा योग येईल. घराबद्दलच्या कटकटी कायमच्या मिटतील.

विद्याभ्यासात यश प्राप्त होईल. लेखक, प्रकाशक यांना सरकारकडून सहानुभूतिपूर्वक मदत होईल. पेंटस्, सेंटस्, फॅन्सी तयार कपड्यांचे व्यापारी यांना अमाप फायदा होईल. वडीलभावंडांकडून व मित्रांकडून सर्व तऱ्हेची मदत होईल.

भागीदार फसवे व्यवहार करावयाला भाग पाडतील. चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. अचानक धनलाभ गुरुवार, शुक्रवारी होईल. शुभतारखा १९ ते २५.

**कन्या** : शरीरप्रकृती चांगली राहील. धनस्थिती चांगली राहील. शनिवार–रविवारी शत्रूंचा त्रास होईल त्यामुळे मानसिक अस्वस्थता येईल. पराक्रमाला दिवस चांगले आहेत. शत्रूंनी पाडण्याचा कितीही प्रयत्न केला तरी सरकार पाठीशी उभे राहील.

विद्याभ्यासात अपयश येईल. संततीकडून व मातुल घराण्याकडून त्रासदायक वागणूक दिली जाईल. भागीदार मदत करतील. वृत्तपत्रकार, लेखक, प्रकाशक विशेषतः ज्यांची वये ३२ ते ३६ च्या दरम्यान आहेत; त्यांना अमाप फायदा होईल.

चंद्राचे भ्रमण १२–१–२ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शनिवार-रविवारी मित्र वाईट वागतील. अचानक धनलाभ शुक्रवारी होईल. शुभतारखा २१ ते २५.

**तूळ :** शनिवारी अचानक धनलाभाचा योग आहे. शुक्र- गळ लग्नेश-सप्तमेश लग्नात आहेत. त्यामुळे अविवाहितांचे विवाह जमून येतील. अष्टमेश लग्नी व धनात गुरू यांमुळे अचानक धनलाभ होईल. सरकारी कामात भाग्योदयकारक घटना घडतील.

विद्याभ्यासात अचानक अडचणी शनिवार-रविवारी येतील. घरातील मंडळींशी विनाकारण भांडणे होतील. व्यापारधंद्यात अनिश्चितता निर्माण होईल. जवाहिराचा व्यापार करणारांना दिवस प्रगतिकारक आहेत. २४ ते २७ वयातील व्यक्तींना याचा अनुभव जास्त येईल.

चंद्राचे भ्रमण ११–१२–१ या स्थानातून आहे. ते साधारणच आहे. शुभतारखा २१ ते २५.

**वृश्चिक :** भोळसटपणाने अडचणीत पडण्याचा संभव आहे. सार्वजनिक कार्यात मानहानी होण्याचा योग आहे. भागीदारांशी कलह होईल. काहीजण भागीदारी काढून घेतील. त्यापासून फायदाच होईल. सुखात व्यत्यय येईल.

संततीचा उत्कर्ष होण्याचा योग आहे. पैशाच्या बाबतीत भरपूर मदत करतील. विद्याभ्यासात यश येईल. धनलाभ अमाप होईल. इंडिकेटची राशी आहे. सरकार नेहमी मदत करील. स्त्रियांपासून जपावे. २७ ते ३२ वयातील व्यक्तींनी जास्त काळजी घ्यावी.

चंद्राचे भ्रमण १०–११–१२ या स्थानातून होत आहे. ते चांगले आहे. शनिवार-रविवारी जरा मानसिक त्रास होईल. शुभ तारखा २१ ते २५.

**धनु :** भाग्येश, सप्तमेश, दशमेश रवी-बुध लग्नात आहेत. हा योग चांगला आहे. शनिवार-रविवारी अचानक विवाहाची मागणी येईल. २१ ते २७ या वयातील व्यक्तींना हा योग विशेष अनुभवाला येईल. भावंडांशी मतभेद होण्याचा योग आहे. प्रवासयोग येईल त्यात जरासा त्रास होईल.

विद्याभ्यासात अपयश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. मेडिकल व मिलिटरीत असणाऱ्या मुलांना प्रमोशन मिळेल. प्रेमविवाहात अडथळे येतील. बौद्धिक व्यवसायात प्रगती होण्याचा योग आहे. कलाकार, गायक, नाटककार यांना आपापल्या व्यवसायात प्रगतिपथावर नेणारा आठवडा आहे.

चंद्राचे भ्रमण ९–१०–११ या स्थानातून होत आहे. ते फारच चांगले आहे. सर्व आठवडाच प्रगतिपथावर नेणारा आहे. सर्वच दिवस शुभ आहेत.

**मकर :** शरीरप्रकृती चांगली राहील. बोलण्यात उद्धटपणा येईल. धनस्थिती बिघडेल. शनिवार-रविवारी भागीदारांशी भांडण होईल. पति-पत्नीत मतभेद होऊन गृहस्वास्थ्य बिघडेल. त्या दिवशी दोन्ही ग्रह रवी-चंद्र अशुभ स्थानात आहेत.

विद्याभ्यासात घवघवीत यश:प्राप्ती होईल. संपतीचा उत्कर्ष होईल. धंदाव्यवसाय चांगला चालेल. शुक्रवारी घरात शुभसमारंभ होईल. मानमान्यता वाढेल. मित्र उपयोगी पडतील. सरकारी कामे लांबणीवर टाकावीत.

चंद्राचे भ्रमण ८–९–१० या स्थानातून आहे. ते तितकेसे चांगले नाही. शुभ तारखा २१ ते २५.

**कुंभ :** आरोग्य चांगले राहील. धनस्थिती सुधारण्याच्या मार्गावर राहील. शनिवार-रविवार पति-पत्नीत मतभेद होईल. जरा नमते घ्यावे. नवीन व्यवसायाचा मार्ग दिसेल. बौद्धिक व्यवसाय करणारांची प्रगती होईल. चित्रकार, फॅन्सी वस्तूंचे व्यापारी, सुवासिक तेलांचे व्यापारी यांची प्रगती होईल.

वि ाभ्यासात चांगलेच यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. ९।१०।११ घरातील पंचग्रही एकदम समाजापुढे येण्याचा योग आणील. हातात घेतलेले कोणतेही कार्य पार पडेल. अनेक शुभ घटना घरात घडतील. सर्व बाजूंनी प्रगती होईल.

चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून आहे. ते फार चांगले आहे. शत्रूच्या सर्व कारवाया नाहीशा होतील. शुभ तारखा २१ ते २५.

**मीन :** शरीरप्रकृती सुधारण्याच्या मार्गावर असेल. थोडीशी वाचाशुद्धी कमी होईल. पैशाची ओढाताण होईल. नसते खर्च उपस्थित होतील. घरात काहीतरी शुभसमारभ होईल. पत्नीकडून व भागीदारांकडून सर्व व्यवहारात मदत होईल.

भाग्यातील गुरू व दशमातील रवी-बुध मानमान्यता वाढवतील. अष्टमातील शुक्र-मंगळ अचानक, अनपेक्षित धनलाभ घडवून आणतील. विद्याभ्यासात चांगले पुढे पाऊल पडेल. कन्यासंततीचा भाग्योदय होईल. हा योग २१।२२ ला येईल. शत्रूनाश संपूर्ण होईल.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ या स्थानातून आहे. ते चांगलेच आहे. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

◻ ◻ ◻

पृष्ठ ७ वरून

आदी कितीतरी गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे. म्हणून नंतर नागपूरला जाऊन विरोधकांनी ठरविले की या प्रश्नांपुरते मर्यादित असलेल्या ठराविक कामकाजाला वगळून इतर बाबतीत विधानमंडळावर बहिष्कार घालायचा. काँग्रेसला तेच हवे असते. सभागृहात विरोधी पक्ष नसला की कामकाज कसे चुटकीसरशी पार पडते. वादविवाद कोण करणार ? चर्चेत भाग घेण्याचा काँग्रेसजनांना आधीच उल्हास नसतो. विरोधकांना उत्तर देण्यासाठी मारून मुटकून एक-दोघांना उभे केले जाते. त्यात आता विरोधकच नाही. मग चर्चाच कशाला.

तेव्हा अशा तऱ्हेने सीमाप्रश्न अडकून पडला आहे. दोन्ही बाजूंनी हात टेकले आहेत. आता डोळे आहेत दिल्लीकडे. दिल्लीच काय करायचे ते करील किंवा करणारही नाही. दरम्यान सत्तर साल जातेच आहे. एकाहत्तरही जाईल आणि बहात्तर येईल. मग विचारायलाच नको.

म्हणूनच श्री. नाईक आणि पाटील यांच्या दिल्ली वाऱ्या. अकरा तारखेला अ. भा. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत हा प्रश्न संसदेवर सोपवायचा की काय करायचे हा निर्णय घेण्यात येणार होता. त्यासाठी नाईकांनी पुन्हा दिल्लीची वारी केली.

त्याचप्रमाणे म्हैसूरचे मुख्यमंत्री वीरेन्द्र पाटील यांनीही मुख्यमंत्री वसंतराव नाईकांना आपल्या राज्यात बोलविले आहे. आता हे बोलावणे केवळ शिकारीसाठी आहे की सीमाप्रश्नावर चर्चा करण्यासाठी आहे ते सध्या तरी गुलदस्तात आहे. दिल्लीच्या वर्किंग कमिटीत काय ठरते त्यावर ते अवलंबन आहे. आणि वर्किंग कमिटीचा निर्णय अंतिम असणार नाहीच. त्यावर पुढे बरेच सोपस्कार व्हावे लागतील.

## पाणी-तंटा

सीमा-प्रश्नाच्या आरडा ओरड्यात इतर महत्त्वाच्या समस्या कशा पार्श्वभूमीवर जातात याचे उत्तम उदाहरण म्हणजे कृष्ण-गोदावरी पाणी-तंटा. या नद्यांच्या पाण्याच्या वाटपासंबंधी महाराष्ट्र, म्हैसूर, आंध्र आणि मद्रास यांच्यात भांडणे आहेत. म्हणून एका लवादाची नेमणूक झाली आहे. पण त्यामुळे या नद्यांशी संबंधित असलेल्या कित्येक सिंचन योजनांना मंजुरीच मिळत नाही. जानेवारी १९७० ते ऑक्टोबर १९७० च्या दरम्यान महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे मंजुरीसाठी पाठविलेल्या अडतीस सिंचन योजना दप्तरात पडून आहेत. केंद्र

सरकारचे म्हणणे आहे की लवादाच्या निकाल लागेपर्यंत अशा योजनांना मंजुरी देणे शक्य नाही. म्हणजे अशा भांडणापायी लाखो एकर जमिनीला पाणी पुरवून शेती-उत्पन्न वाढविणाऱ्या योजना मागे पडताहेत.

केंद्राकडून या योजनांना शक्य तेवढ्या लवकर मंजुरी मिळावी म्हणून महाराष्ट्र शासनाचे प्रयत्न चालू असतात. त्यांचा परिणाम म्हणून अखेर पाच वर्षांपेक्षा जास्त काळ ज्या योजना दप्तरी पडून राहिल्या असतील त्यांना मंजुरी देण्याचे केंद्राने कबूल केले आहे. त्यात वर्धा, पैनगंगा आणि दूधगंगा या योजनांचा समावेश आहे.

सिंचन योजनांच्या बाबतीत महाराष्ट्राचे एक गंभीर गाऱ्हाणे आहे आणि ते वीज व सिंचनमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी अनेक वेळ बोलूनही दाखविले आहे. त्यांचे म्हणणे असे की सिंचन योजनांच्या बाबतीत महाराष्ट्रावर जाणून बुजून अन्याय केला जातो. (याचे कारण केंद्रीय सिंचन खात्याचे मंत्री डॉ. के. एल. राव हे आंध्राचे आहेत.) पाणी तंटा म्हणून केन्द्र सरकार आमच्या लहान-सहान योजनांची मंजुरी अडवून ठेवते. एवढेच नव्हे तर ज्या योजनांचा या तंट्याशी संबंध नाही त्यांचीही मंजुरी लवकर मिळत नाही. केंद्राने दिलेले या बाबतीतील सर्व आदेश महाराष्ट्र शासन पाळते. पण आंध्र आणि म्हैसूर सरकारांच्या बाबतीत मात्र केंद्र सरकार ढिला हात सोडते. नागार्जुनसागरच्या दरवाज्यांची उंची वाढवायची नाही असा केंद्राचा हुकूम असताना तो धुडकावून लावून आंध्र सरकारने आपल्याला करायचे ते केले. पण केंद्र सरकार गप्प बसून राहते. याचा अर्थ महाराष्ट्रावर अन्याय होतो नाही तर काय ? नागार्जुनसागरची उंची वाढविण्यात येत आहे हे कळल्याबरोबर महाराष्ट्र सरकारने निषेध नोंदविला होता व केंद्र सरकारने मनाई केली होती. पण आंध्रने फिकीर केली नाही. पण महाराष्ट्र सरकार मात्र सर्व नीती-नियमांना चिकटून बसते. तोटा होतो महाराष्ट्रातील लोकांचा.

दरम्यान वर्षानुवर्षे कुजत पडलेला हा पाणी-तंटा अजून लांबतच चाललेला आहे. लवादाचे कामकाज सुरू होऊन बरेच दिवस झालेत. लवादासमोर सर्व बाजू मांडण्यात येत आहेत. निर्णय लागायला किती वेळ लागेल हे सांगता येत नाही.

कृष्णा-गोदावरी तंट्यापेक्षा मोठा तंटा आहे नर्मदेच्या पाण्याचा. अर्थात या पाण्यापासून महाराष्ट्राचा फार कमी फायदा होणार आहे. या तंट्यात प्रमुख दावेदार आहेत मध्य प्रदेश, गुजरात आणि राजस्थान. नर्मदा ही अद्याप ' व्हर्जिन ' नदी आहे. म्हणजे अद्याप तिच्या पाण्याच्या महान शक्तीचा कोणीच वापर केलेला नाही. नर्मदा ही प्रचंड नदी आहे. नर्मदा खोऱ्याच्या ज्या योजना आखल्या जात आहेत त्यामुळे मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्रामधील काही भाग यांचा चेहरा-मोहराच पार बदलून जाईल आणि हा भाग धन-धान्यांनी सुफलित होऊन जाईल. पण गेली सोळा वर्षे या पाण्याच्या वाटपावरून तंटा चालू आहे.

त्याचा निकाल लागत नाही. राज्याचे मुख्य मंत्री एकमेकांना भेटतात. बोलतात, पुन्हा भेटतात. प्रगती मात्र होत नाही.

निव्वळ राजकारणावर भर दिल्याने देशातील उत्पादन शक्ती वाढवून देशाला समृद्ध करणाऱ्या या बड्या बड्या योजना मागे पडल्या आहेत. या योजनांमुळे नोकऱ्यांचे प्रमाण वाढेल, शेती वाढेल, वीज-उत्पादनामुळे अनेक उद्योग-धंदे निर्माण होतील आणि नोकऱ्यांचे प्रमाण आणखी वाढेल. पण ज्या आविर्भावाने सीमा-प्रश्नावर आरडाओरडा केला जातो त्याच्या निम्मा जोरही या प्रश्नांच्या बाबतीत बोलताना कोणत्याही पक्षाकडे नसतो. सध्याचे राजकारणच असे झाले आहे. खुर्च्यांना चिकटून बसायचे, अमुक सरकार पाडायचे, तमुक सरकारला टेकू द्यायचा. या पक्षाला टांग मारायची, त्या पक्षाशी दोन दिवस मधुचंद्र करायचा वगैरे. या महान भानगडींमध्ये सामान्य लोकांचे कल्याण करणाऱ्या भौतिक सिंचन योजनांकडे लक्ष द्यायला कुणाला वेळ आहे ?

विदर्भ-वाद्यांनी यंदा जोर धरण्याचा आव आणला होता. पण तो फुसका ठरला. सात डिसेंबरला त्यांनी जाहीर केलेला 'नागपूर बंद' जवळ जवळ अयशस्वी झाला. त्याचे मुख्य कारण हे की या चळवळीला विदर्भातील जनतेचा कृतिशील पाठिंबा नाही. पूर्व महाराष्ट्रातील हा भाग पश्चिम महाराष्ट्रावर रागावून आहे हे निश्चित. याचे कारण विदर्भावर अन्याय होत असल्याची भावना. विशेषत: विदर्भातील बुद्धीवादी वर्गातील एक मोठा गट स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीला सहानुभती दाखवितो. पण एकूण चळवळीला काही ठराविक हितसंबंधीय सोडले तर कुणाचाच कृतिशील पाठिंबा नाही.

विदर्भाला पाच मंत्री दिले आणि नागपूरला उद्योग-धंदे उभारले म्हणजे विदर्भाचा विकास झाला असे समजण्यात अर्थ नाही. अनेक वर्षे मध्य प्रदेशात असताना विदर्भात एकही मोठी जलसिंचन योजना आली नाही. त्यानंतर महाराष्ट्रात आल्यावरही कोणती मोठी योजना अद्यापपर्यंत हाती घेतली नव्हती. एक नागपूर सोडले तर दुसरीकडे कोठे नाव घेण्यासारखा उद्योगधंदा नाही. रस्त्यांच्या बाबतीतही विदर्भ मागासलेला आहे. थोडक्यात म्हणजे विदर्भाची जी गाऱ्हाणी आहेत ती खरी आहेत. प्रयत्न केल्यास ती मिटविता येतील.

पण काहींना स्वतंत्र विदर्भ हवा आहे. व्यापारी, नोकरवर्ग की ज्यांचा स्वतत्र विदर्भाच्या निर्मितीला फायदा होणार आहे तेच या चळवळीत भाग घेतात. स्वतंत्र विदर्भ झाला की नागपूरचे महत्त्व वाढेल, व्यापार वाढेल, स्वतंत्र हायकोर्ट होईल (म्हणून वकीलवर्गही सहानुभूती दाखवितो), स्वतंत्र सचिवालय होईल. या गोष्टींपासून ज्यांना फायदा होईल तेच या चळवळीच्या मागे आहेत. इतर जनता जरी पश्चिम महाराष्ट्रावर रागावून असली तरी महाराष्ट्रातून फुटून स्वतंत्र चूल स्थापण्याकडे तिचा कल नाही. परवा अयशस्वी झालेल्या 'नागपूर बंद'ने हे दाखवून दिले.

□ □ □

 पृष्ठ १२ वरून

अ हे त्यामुळे पूर्व पाकिस्तानच्या आर्थिक विकासाकडे आतापर्यंत दुर्लक्ष करण्यात आले. या कटू अनुभवामुळेच आर्थिक नियोजन केंद्राकडे सोपविण्यास पूर्व पाकच्या नेत्यांचा विरोध आहे. पण तसे यापुढे होणार नाही. पूर्व पाकच्या विकासाच्या योजना तेथील नेत्यांच्या सल्ल्यानेच निश्चित करण्यात येतील असे आश्वासन पश्चिम पाकच्या नेत्यांनी दिल्यास आर्थिक नियोजन केंद्राकडे सोपविण्यास पूर्व पाकचे नेते तयार होतील.

## उभयमान्य तडजोड

पूर्व पाकचे वर्चस्व पश्चिम पाकवर प्रस्थापित होईल ही पश्चिम पाकच्या नेत्यांना वाटणारी भीतीही पूर्व पाकच्या नेत्यांनी दूर केली पाहिजे. पश्चिम पाकिस्तानच्या हितसंबंधांशी निगडित असलेल्या प्रश्नांवरील निर्णय नॅशनल असेंब्लीत केवळ साध्या बहुमताने घेतले न जाता दोन तृतीयांश बहुमताने घेतले जातील किंवा साध्या बहुमताने ते घेतले तरी पश्चिम पाकिस्तानातील विधिमंडळांची मते अजमावून त्यांची संमती मिळाल्यावरच हे निर्णय अंमलात येतील, अशी काहीतरी तरतूद घटनेत करण्याचे आश्वासन पूर्व पाकच्या नेत्यांनी दिल्यास पश्चिम पाकच्या नेत्यांचे समाधान होईल. अशा वृत्तीने कामकाज झाले तरच दोन्ही विभागांना मान्य अशी घटना तयार होऊ शकेल आणि याह्याखानांना हस्तक्षेप करण्याची संधी मिळणार नाही.

पूर्व आणि पश्चिम पाकच्या नेत्यांत एकमत होऊ शकले नाही तर पाकिस्तानात पुन: लष्करी हुकूमशाही येईल; पण लष्करी दडपशाहीनेही पूर्व पाकिस्तानातील जनतेची स्वायत्ततेची चळवळ दडपून टाकता येणार नाही. या दडपशाहीचे पर्यवसान अखेर पूर्व पाकिस्तान फुटून वेगळा निघण्यात होईल. पाकच्या नेत्यांना या धोक्याची कल्पना असल्याने ते शक्यतो पूर्व पाकच्या नेत्यांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतील. पूर्व पाकिस्तान फुटणे पश्चिम पाकला आर्थिक दृष्ट्या परवडणारे नाही. कारण पाकिस्तानला, मोठ्या प्रमाणावर परकीय चलन पूर्व पाकिस्तान मिळवून देतो.

भारताच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न म्हणजे निवडणुकीनंतर भारत-पाक संबंध सुधारून दोन्ही देशांच्या संबंधांत काही नवे युग सुरू होईल काय हा आहे. भारताविषयीच्या धोरणाबाबत रहमान व भुट्टो यांच्यांत एकमत नाही. भारताशी संबंध सुधारावेत अशी रहमान यांची भूमिका आहे. निदान दोन्ही देशांत व्यापारी संबंध सुधारावेत असा त्यांचा प्रयत्न राहील. पण भुट्टो कट्टर हिंदद्वेष्टे व चीनधार्जिणे आहेत.

त्यांची निवडणूक प्रचार मोहीम हिंदद्वेषावर आधारलेली होती. पण सध्या तरी रहमान यांचा पक्ष मोठा असल्याने व सत्तेवर राहण्यासाठी त्याचे सहकार्य आवश्यक असल्याने आपले हिंदद्वेषाचे घोडे भुट्टो यांना फारसे पुढे दामटता येणार नाही. पण या दोन्ही नेत्यांत सहकार्य होऊ शकले नाही तर हेच भुट्टो हिंद-द्वेषाची जोरदार मोहीम उघडून पाकिस्तानी जनतेच्या भावना चेतवून पाकच्या राजकारणावर प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न करतील. व्यापारी संबंध थोडे सुधारण्यापलीकडे सध्या तरी या निवडणुकीपासून भारताचा विशेष फायदा होण्याचा संभव नाही.

भारत-पाक संबंध सुधारणे हे पाकिस्तानात खरी लोकशाही रुजण्यावर अवलंबून आहे. या निवडणुकीने त्याची सुरुवात झाली आहे. धर्मवेडाने आपले प्रश्न सुटत नाहीत हे पाकिस्तानी जनतेने धर्मवेड्या पक्षांना निवडणुकीत धूळ चारून दाखवून दिले आहे. प्रगतीच्या दृष्टीने हे आशादायक पाऊल आहे.

□ □ □

## दोन पाकिस्तानांतील विषमता

लोकसंख्येच्या दृष्टीने पाकिस्तानचा सर्वांत मोठा घटक असलेल्या पूर्व पाकिस्तानला पाकमध्ये सापत्नभावाने वागविण्यात येते. विजेचा वापर पश्चिम पाकमध्ये पूर्व पाकच्या एकोणीसपट होतो. चहा व पेट्रोलचा खर्च आठपट होतो. सिगारेट सहापट जास्त आणि कापड व साखर तिप्पट जास्त खपते. पूर्व पाकपेक्षा पश्चिम पाकमध्ये दहापट जास्त मोटारी व सातपट जास्त रेडिओ आहेत.

पाकच्या आर्थिक योजनेत शेती-पाट-बंधारे, वीज, खाणी, रस्ते, दळणवळण, शिक्षण या क्षेत्रातील विकासासाठी पश्चिम पाकिस्तानला ६२२ कोटी २६ लाख रु. व पूर्व पाकिस्तानला ४५७ कोटी ९ लाख रु. मंजूर करण्यात आले. एकूण खासगी भांडवल-गुंतवणुकीच्या फक्त १० टक्के वाटा पूर्व बंगालला मिळाला आणि आयात केलेल्या यंत्रसामग्रीपैकी फक्त २८ टक्के यंत्रसामग्री त्याच्या वाट्यास आली.

पाकिस्तानला ५८ टक्के परदेशी चलन पूर्व पाक मिळवून देतो असे असताही औद्योगिक विकासासाठी त्याच्या वाट्यास मात्र फक्त २७ टक्के परदेशी चलन येते. परदेशी मदतीच्या बाबतीत तोच पक्षपात. एकूण परदेशी मदतीपैकी फक्त २० टक्के मदत पूर्व पाकला दिली जाते. शिक्षणाच्या बाबतीत तोच अनुभव. पश्चिम पाकमध्ये चार विद्यापीठे आहेत पण पूर्व पाकमध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त असूनही फक्त दोनच विद्यापीठे आहेत. गॅझेटेड अधिकाऱ्यांमधील ३५००० सीनियर गॅझेटेड अधिकारी पश्चिम पाकिस्तानचे आहेत तर पूर्व पाकच्या अधिकाऱ्यांची संख्या अवघी ११,००० आहे.

रशियन राज्यक्रांतिविषयी प्रचारात्मक साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

**वि. स. वाळिंबे**

**अठरा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

**पुणे**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# लोकमान्य स्मृती समितीची वाटचाल

लोकमान्य स्मृती स्मारक समितीच्या कार्याला सुरुवात झाल्यापासून समितीला पुढील प्रमाणे देणग्या मिळाल्या आहेत.

| | |
|---|---|
| डॉ. द. भा. मनोहर, दाभोळ | ५१ रु. |
| श्री. नारायणराव काजरोळकर, मुंबई | १०१ ,, |
| श्री. त्रि. ना. भागवत, डोंबिवली | १० ,, |
| श्री. माधव वामन कासरळकर, मुंबई | २५ ,, |
| इयत्ता ८ वी अ. न्यू इं. स्कूल, दाभोळ | ५ ,, |
| राजहंस प्रकाशन, पुणे. शिवचरित्राचे श्री. ब. मो. पुरंदरे लिखित ११ संच | ४६२ ,, |
| मेधा फार्मसी, सोलापूर यांचे कडून औषधाच्या रुपाने | ७५ ,, |

मुंबई येथील सौ. सुशीला जोग यांनी लोकमान्यांचा दोन फूट उंचीचा एक पुतळा समितीस विनामूल्य दिला आहे. त्यांच्या उभारणीसाठी चिखलगाव येथे लोकमान्यांच्या घरावर चौथरा उभारण्याचे काम सुरू आहे.

त्याचप्रमाणे डॉ. चंद्रकांत मोकल यांच्या समितीमार्फत सुरू करण्यात आलेल्या साप्ताहिक दवाखान्याचे कामही सुरू झाले आहे. औषधे व आर्थिक मदतीची सर्व टिळकप्रेमी महाराष्ट्राकडून समितीस अपेक्षा आहे.

रतनलाल भंडारी

२–१२–७० चिटणीस. स्मृती स्मारक समिती